CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, ११ डिसेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ३५ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती आहे

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com

Honoured to be listed in
FORTUNE 500 INDIA
LARGEST INDIAN COMPANIES 2024 & THE ELITE CLUB
of billion-dollar companies by income and profit.


& Service Variety

P. N. GADGIL & SONS 1832
Gold | Silver | Diamonds

www.pngadgilandsons.com

## महत्त्वाचे

### सेन्सेक्स-निफ्टी सपाट; स्मॉलकॅप सलग तेजीत



**मुंबई** : भारतीय शेअर बाजारात मंगळवारच्या सत्रात सुस्त स्थिती राहिली. आज चढ- उतारानंतर सेन्सेक्स आणि निफ्टी सपाट पातळीवर बंद झाले. या आठवड्यात जाहीर होणाऱ्या अमेरिका आणि भारताच्या ग्राहक किंमत निर्देशांक आकडेवारीपूर्वी गुंतवणूकदारांची सावध भूमिका दिसून आली. सेन्सेक्स-निफ्टी सपाट पातळीवर बंद झाले. सेन्सेक्स १.५ अंकाच्या किरकोळ वाढीसह ८१,५१० वर बंद झाला, तर निफ्टी ८.९ अंकांच्या किरकोळ घसरणीसह २४,६१० वर स्थिरावला. शेअर बाजारातील सुरुवातीला तेजी राहिली. दुपारच्या व्यवहारातील नफेखोरीमुळे शेअर बाजार लाल रंगात गेला. आज मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्समध्ये गेल्या ११ दिवसांपासून सुरू असलेली तेजी आज १२ व्या दिवशीही कायम राहिली.

### यूपीएससी मुख्य परीक्षेत २,८४५ उमेदवार उत्तीर्ण

**नवी दिल्ली** : केंद्रीय लोकसेवा आयोग म्हणजेच यूपीएससीने नागरी सेवा परीक्षा (सीएसई) मुख्य परीक्षेचा निकाल जाहीर केला. यात २,८४५ उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत. उमेदवार अधिकृत संकेतस्थळावर निकाल पाहू शकतात. मेन्स उत्तीर्ण झालेल्या सर्व उमेदवारांना मुलाखतीच्या फेरीतून जावे लागेल. हे सर्व उमेदवार १३ ते १९ डिसेंबर या कालावधीत अर्ज भरतील. या आधारावर त्यांची दिल्लीतील यूपीएससीमध्ये मुलाखत होणार आहे. यूपीएससी लवकरच अधिकृत संकेतस्थळावर मुलाखतीच्या तारखा जाहीर करेल. मुलाखतीनंतर, अंतिम निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सर्व उमेदवारांच्या मार्कशीट आयोगाच्या संकेतस्थळावर अपलोड केल्या जातील.

### आता ॲमेझॉनही उतरणार जलद व्यापारात

**मुंबई** : भारतीय बाजारपेठेत जलद व्यापार अर्थात् क्वीक कॉमर्स (१० ते ३० मिनिटांत डिलिव्हरी) झपाट्याने विस्तारत आहे. त्यामुळेच ई-कॉमर्स मार्केट प्लेस ॲमेझॉन इंडियानेही या क्षेत्रात उतरण्याची तयारी केली आहे. या महिन्याच्या अखेरीस ही सेवा सुरू करण्याची कंपनीची योजना आहे. सुरुवातीला कंपनी बंगळुरू येथून १५ मिनिटांची डिलिव्हरी सेवा सुरू करेल. झपाट्याने वाढणाऱ्या क्वीट कॉमर्स क्षेत्रात हे त्यांचे पदार्पण असेल. यापूर्वीच बाजारात ब्लिंकीट, बिग बास्केट आणि इन्स्टामार्टसारख्या कंपन्या कार्यरत आहेत.

### 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ'चे मानकरी ठरले माधव गाडगीळ

**नवी दिल्ली** : पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन क्षेत्रातील उल्लेखनीय कामासाठी संयुक्त राष्ट्रसंघ पर्यावरण कार्यक्रमांतर्गत 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' हा पुरस्कार देऊन संशोधक आणि अभ्यासकांना सन्मानित करते. हा पुरस्कार ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ माधव गाडगीळ जाहीर झाला आहे. २००५ पासून या पुरस्काराने १२२ संशोधकांना त्यांच्या उल्लेखनीय आणि प्रेरणादायी पर्यावरणीय नेतृत्व आणि कामासाठी गौरविले आहे. यावर्षी माधव गाडगीळ यांना त्यांच्या पर्यावरणीय कामगिरीसाठी हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. गाडगीळ मागील अनेक दशके संशोधन आणि सामुदायिक सहभागाच्या माध्यमातून लोक आणि पर्यावरणाचे संरक्षण करतात. त्यांच्या कार्याचा लोकमतावर आणि नैसर्गिक संसाधनांच्या संरक्षणासाठीच्या शासकीय धोरणांवर मोठा प्रभाव पडला आहे. भारताच्या पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील आणि जैवविविधतेचे केंद्र असलेल्या पश्चिम घाटावरील त्यांचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे.

# धनकड यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल

**• इतिहासातील पहिलीच घटना • ६० खासदारांनी केल्या स्वाक्षऱ्या**

**◆ नवी दिल्ली, १० डिसेंबर**



उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनकड यांच्याविरुद्ध विरोधकांनी आज अविश्वास प्रस्ताव दाखल केला. उपराष्ट्रपतींविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल होण्याची संसदीय लोकशाहीच्या इतिहासातील ही पहिलीच घटना आहे. उपराष्ट्रपती राज्यसभेचे पदसिद्ध सभापती असतात.

संविधानाच्या ६७ ब कलमानुसार विरोधी पक्षांनी धनकड यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आणला आहे. काँग्रेसचे जयराम रमेश आणि प्रमोद तिवारी तसेच तृणमूल काँग्रेसचे नदीम उल हक आणि सागरिका घोष यांनी राज्यसभा महासचिवांच्या दालनात आज दुपारी अविश्वास प्रस्ताव दाखल केला. या अविश्वास प्रस्तावावर विरोधी पक्षांच्या ६० खासदारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

विशेष म्हणजे, विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे, काँग्रेसच्या सोनिया गांधी यांच्यासह राज्यसभेतील विरोधी पक्षांच्या कोणत्याही गटनेत्यांच्या या प्रस्तावावर स्वाक्षऱ्या नाहीत. सर्व पक्षांच्या सर्वसामान्य सदस्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या. अध्यक्ष विरोधी सदस्यांना बोलू देत नाही, भेदभाव करतात, असा आरोप विरोधी पक्षांनी केला. आम्ही अतिशय दु:खद अंतकरणाने संसदीय लोकशाहीच्या हितासाठी हा अविश्वास प्रस्ताव दाखल केला, असे जयराम रमेश सोशल मीडिया एक्सवर म्हटले. अध्यक्षांनी सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांना बोलण्याची संधी दिली, पण खडगे बोलत असताना त्यांना मध्येच रोखण्यात आले, याकडे लक्ष वेधण्यात आले.

**आम्ही इंडिया आघाडीत नाही : बिजद**

अविश्वास प्रस्तावावर काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, शरद पवार गट, उबाठा, समाजवादी पक्ष, आम आदमी पक्ष तसेच डाव्या पक्षाच्या सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. बिजू जनता दलाने या प्रस्तावापासून स्वत:ला दूर ठेवले आहे. अविश्वास प्रस्ताव इंडिया आघाडीतील पक्षांनी आणला आहे, आम्ही इंडिया आघाडीत नाही, असे बिजू जनता दलाचे सस्मित पात्रा यांनी सांगितले. ◀(तभा वृत्तसेवा)

### लोकसभा अध्यक्षांविरुद्ध तीन वेळा आला प्रस्ताव

लोकसभेत सभापतींच्या विरोधात आतापर्यंत तीनदा अविश्वास प्रस्ताव आला, पण राज्यसभेत उपराष्ट्रपतींविरुद्ध प्रथमच अविश्वास प्रस्ताव दाखल झाला आहे. अविश्वास प्रस्ताव दाखल करण्यासाठी १४ दिवसांची नोटीस द्यावी लागते. अविश्वास प्रस्ताव राज्यसभेत पारित झाल्यानंतर तो लोकसभेत पाठवण्यात येतो. तेथेही तो पारित करावा लागतो. राज्यसभेत सत्ताधारी पक्षाचे म्हणजे रालोआचे बहुमत असल्यामुळे हा प्रस्ताव फेटाळला जाणार, हे निश्चित आहे. पावसाळी अधिवेशनातही धनकड यांच्यावर विरोधी पक्ष अविश्वास आणणार अशी चर्चा होती. पण, तेव्हा विरोधी पक्षांनी ती कल्पना सोडून दिली.

# बेस्ट बस अपघातातील बळीसंख्या सहा

**मुंबई, १० डिसेंबर**




मुंबईतील बेस्ट बस अपघातातील बळीसंख्या सहा झाली असून, आणखी तीन जण गंभीर असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी मंगळवारी दिली. कुर्ला परिसरात सोमवारी रात्री ९:३० च्या सुमारास घडलेल्या या घटनेत ४३ जण जखमी झाले आहेत.

चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला—. बस चालक संजय मोरे याला ताब्यात घेण्यात आले आहे. अपघातस्थळावरून तिघांना मृतावस्थेत जवळच्या भाभा रुग्णालयात आणण्यात आले. मृतांचा आकडा सहा झाल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली. कुर्ला स्थानकातून साकीनाकाकडे जात असताना बेस्ट बसच्या चालकाचे नियंत्रण सुटले. परिणामी, बस पादचाऱ्यांवर तसेच काही वाहनांवर धडकली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

मृतांच्या वारसांना ५ लाखांची मदत

अपघात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना ५ लाखांची मदत दिली जाणार आहे तसेच जखमींच्या उपचाराचा खर्च मुंबई महानगर पालिका आणि बेस्टकडून केला जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी याबाबतची घोषणा केली आहे.

### चालकावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

कुर्ला बेस्ट अपघातातील आरोपी बस चालक संजय मोरे याला कुर्ला न्यायालयाने २१ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. सदोष मनुष्य वध, मारपीट असे गुन्हे संजय मोरेवर दाखल करण्यात आले आहेत. तो दारूच्या नशेत बस चालवत होता, असेही तपासात उघड झाले आहे.

# मंत्रिमंडळ विस्ताराचा मुहूर्त ठरला!

### १४ तारखेला शक्यता

**◆ मुंबई, १० डिसेंबर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वातील महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ विस्ताराचा मुहूर्त अखेर ठरल्याचे बोलले जात आहे. येत्या १४ तारखेला विस्तार होण्याची शक्यता आहे.

महायुतीने राज्यपालांना सरकार स्थापनेचा प्रस्ताव सादर केला आणि पाच डिसेंबर रोजी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी शपथ घेतली. त्यानंतर ७ ते ९ डिसेंबर दरम्यान विशेष अधिवेशन बोलविण्यात आले. यात नवनिर्वाचित आमदारांना पद आणि गोपनीयतेची शपथ देण्यात आली. त्यानंतर विशेष अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी ९ डिसेंबर रोजी विधानसभा अध्यक्षांची निवड करण्यात आली. त्यानंतर सरकारने विश्वासदर्शक ठराव प्रचंड बहुमताने जिंकला.

मात्र, अद्याप देवेंद्र फडणवीस यांचे मंत्रिमंडळ पूर्ण झालेले नाही. आता फडणवीस आपले कॅबिनेट कधी तयार करतात, याकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागलेले आहे. दरम्यान, देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळाचा विस्तार होईल असे सूतोवाच आणि विधिमंडळाचे अधिवेश संस्थगित करताना पुढील अधिवेशन १६ डिसेंबरपासून नागपुरात होणार असल्याची घोषणा केली. त्यामुळे १६ डिसेंबर पूर्वी आता मंत्रिमंडळाचा विस्तार होणार हे निश्चित मानले जात आहे. त्यामुळे १४ तारखेला हा शपथविधी होणार असे अंदाज बांधले जात आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

### गौतम अदानींनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट



अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी मंगळवारी थेट सागर बंगाल्यावर पोहोचत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या दिमाखदार शपथविधी सोहळ्याचे गौतम अदानींना निमंत्रण देण्यात आले होते. मात्र, या शाही सोहळ्याला अदानी व्यस्ततेमुळे येऊ शकले नव्हते. त्यामुळे त्यांनी आज सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास सागर बंगला गाठत देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली आणि त्यांचे अभिनंदन केल्याचे सांगितले जात आहे. या बैठकीवेळी दोघांमध्ये अदानी समूहाच्या माध्यमातून महाराष्ट्रात केल्या जाणाऱ्या विविध विकास कामांच्या बाबतीत चर्चा झाल्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# एस. एम. कृष्णा यांचे निधन

### पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केला शोक

**◆ बंगळुरू, १० डिसेंबर**



माजी परराष्ट्र मंत्री, कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे माजी राज्यपाल एस. एम. कृष्णा यांचे मंगळवारी दीर्घ आजाराने निधन झाले. ते ९२ वर्षांचे होते. कृष्णा यांच्या निधनाच्या पृष्ठभूमीवर कर्नाटक सरकारने तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर केला आहे. कृष्णा यांच्या सन्मानार्थ प्रमुख सरकारी कार्यालयांवरील राष्ट्रध्वज अर्ध्यावर आणण्यात आला आहे.

कृष्णा यांच्यावर त्यांच्या मूळ गावी मद्दूर येथे बुधवारी सायंकाळी ४ वाजता शासकीय इतमामात अन्त्यसंस्कार करण्यात येणार आहे. कृष्णा यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री ते देशाचे परराष्ट्र मंत्री, महाराष्ट्राचे राज्यपाल आणि भारतीय राज्यकारणात १० वेगवेगळी पदे भूषविली होती. महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा त्यांनी २००८ रोजी राजीनामा दिला होता. २००९ मधील तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या मंत्रिमंडळात ते परराष्ट्र व्यवहार मंत्री होते. मार्च २०१७ मध्ये अधिकृतपणे भाजपात प्रवेश केला होता. २००९ ते २०१२ पर्यंत ते केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्री होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एस. एम. कृष्णा यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केले आहे. एस. एम. कृष्णा हे एक असामान्य नेते होते. कृष्णा हे एक विपुल वाचक आणि विचारवंत होते, असे पंतप्रधान मोदी यांनी शोकसंदेशात म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

### इंडिया आघाडीच्या नेतृत्वावरून विरोधकांमध्ये फूट

**◆ नवी दिल्ली, १० डिसेंबर**

लोकसभेतील विजयानंतर काही प्रमाणात हुरळून गेलेल्या इंडिया आघाडीमध्ये आता नेतृत्वाच्या मुद्यावरून उभी फूट पडल्याचे चित्र आहे. काही पक्ष ममता बॅनर्जींना नेतृत्व सोपविण्यास तयार असले, तरी काँग्रेसने विरोध केला आहे. काँग्रेसने आता मन मोठे करायला हवे, असे म्हणत आघाडीतील घटक पक्षांनी सोनिया आणि राहुल गांधींना लक्ष्य केले आहे.

तृणमूलचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी या सर्व घडामोडींबाबत सांगितले की, काँग्रेसच्या नेतृत्वात इंडिया आघाडी अपयशी ठरली आहे, हे काँग्रेसने समजून घेतले पाहिजे. काँग्रेसने आपला अहंकार सोडला पाहिजे. ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत म्हणाले की, इंडिया आघाडी या मुद्यावर चर्चा करीत आहे. काँग्रेससोबत आमचे चांगले संबंध आहेत. काँग्रेस एक राष्ट्रीय पक्ष आहे. त्यांचे लोकसभेत सर्वाधिक खासदार आहेत. मात्र, आम्ही अशा व्यक्तीबाबत चर्चा करीत आहोत, जी इंडिया आघाडीच्या नेतृत्वाला वेळ देऊ शकते. ◀(वृत्तसंस्था)

# धवलसिंह मोहिते-पाटील यांचा काँग्रेसला रामराम

### काँग्रेसमध्ये घुसमट होत असल्याने राजीनामा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० डिसेंबर-**

काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते पाटील यांनी अखेर आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. विधानसभा निवडणुकीनंतर जिल्ह्यातील काँग्रेसला यामुळे मोठा धक्का बसला आहे. डॉ. धवलसिंह यांनी आपल्या जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे दिला आहे.



धवलसिंह यांनी आपला सहा पानाचा राजीनामा पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांकडे सुपूर्द करताना काँग्रेस पक्षामध्ये आपली होत असलेली घुसमट आणि खदखद त्यांनी या राजीनामा पत्रातून व्यक्त केली आहे. जिल्ह्यातील काँग्रेस ही पूर्वीची काँग्रेस राहिलेली नसून शिंदे यांची काँग्रेस झालेली आहे असा सरळ सरळ आरोप त्यांनी या माध्यमातून केला आहे. लोकसभा निवडणुकीदरम्यान त्यांची थेट भाजपचे उमेदवार रणजितसिंह निंबाळकर यांचा प्रचार केल्याचे पाहायला मिळाले होते. त्यामुळे आता धवलसिंह हे भारतीय जनता पार्टीमध्ये जाणार का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू असून भाजप राष्ट्रवादीच्या मोहिते पाटील यांना दाबण्यासाठी धवलसिंह मोहिते पाटील यांना विधान परिषदेवर घेतील अशीही चर्चा आहे.

### अर्थव्यवस्थेसाठी सर्वोत्तम करू : मल्होत्रा

**◆ नवी दिल्ली, १० डिसेंबर**

रिझर्व्ह बँकेचा गव्हर्नर म्हणून ११ डिसेंबर रोजी पदभार स्वीकारल्यानंतर सर्व दृष्टिकोन समजून घेऊन अर्थव्यवस्थेसाठी सर्वोत्तम काय राहील, ते काम करू, अस आरबीआयचे नवनिर्वाचित गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी मंगळवारी सांगितले.

ते अर्थमंत्रालयाबाहेर पत्रकारांशी बोलत होते. संजय मल्होत्रा सध्या अर्थ मंत्रालयात वित्त सचिव असून, सोमवारी सायंकाळी त्यांची रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी नियुक्ती करण्यात आली. ते शक्तिकांत दास यांची जागा घेणार आहेत. ◀(वृत्तसंस्था)


# बारावीत अभ्यास न केलेल्या विषयांतही सीयूईटी-यूजी

### यूजीसीची माहिती

**नवी दिल्ली, १० डिसेंबर**

सीयूईटी-यूजी ही २०२५ पासून केवळ संगणक-आधारित चाचणी (सीबीटी) म्हणून घेतली जाईल आणि विद्यार्थ्यांना बारावीत अभ्यास न केलेल्या विषयांतही बसण्याची परवानगी दिली जाईल, अशी माहिती विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात् यूजीसीचे अध्यक्ष जगदेशकुमार यांनी दिली.

विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या तज्ज्ञ पॅनलने परीक्षेचा आढावा घेतला आणि अनेक बदल सुचवले. ही परीक्षा २०२५ पासून मागील वर्षीच्या हायब्रीड मोडवर नव्हे, तर सीबीटी मोडवर घेतली जाईल. आम्ही विषयांची संख्या ६३ वरून ३७ पर्यंत कमी केली आहे आणि सोडलेल्या विषयांचे प्रवेश सामान्य अभियोग्यता चाचणीच्या (जीएटी) गुणांच्या आधारे घेतले जातील, असे कुमार यांनी सांगितले.



उमेदवारांना सीयूईटी-यूजीत बारावीत अभ्यास न केलेले विषय निवडण्याचीही परवानगी दिली जाणार आहे. या माध्यमातून उमेदवारांना उच्च शिक्षणातील कठोर शिस्तबद्ध सीमा ओलांडता येईल, असे जगदेशकुमार म्हणाले. परीक्षेच्या आवृत्तीतील बदलांचे स्पष्टीकरण देताना कुमार म्हणाले की, विद्यार्थी सीयूईटी-यूजीसाठी आधीच्या सहाऐवजी जास्तीत जास्त पाच विषयांमध्ये बसू शकतील. २०२२ मध्ये परीक्षेच्या पहिल्या आवृत्तीत सीयूईटी-यूजीत मोठ्या प्रमाणात तांत्रिक त्रुटी निर्माण झाल्या होत्या. एका विषयासाटी अनेक पाळ्यांमध्ये घेण्यात येणाऱ्या चाचण्यांचे परिणाम म्हणून निकाल जाहीर करताना गुण सामान्य करणे आवश्यक होते. २०२४ मध्ये प्रथमच ही परीक्षा हायब्रीड पद्धतीने घेण्यात आली होती. ती काही कारणास्तव आयोजित होण्याच्या एक रात्र आधी नवी दिल्लीत रद्द करण्यात आली होती.

### आता सर्वच प्रश्न अनिवार्य

इतकेच नव्हे तर, विषयानुसार ४५ मिनिटांपासून ते ६० मिनिटांपर्यंत बदलणारा परीक्षेचा कालावधी ६० मिनिटे म्हणून प्रमाणित करण्यात आला आहे. परीक्षेतील ऐच्छिक प्रश्नांची संकल्पनाही काढून टाकण्यात आली आहे. आता सर्वच प्रश्न अनिवार्य असतील, असे जगदेशकुमार यांनी सांगितले.

# एमबीबीएस परीक्षेचे चारही पेपर फुटले

**◆ मुंबई, १० डिसेंबर**

परीक्षेतील पेपर फुटण्याच्या प्रकारांना आळा घालण्यात यंत्रणेला यश आलेले दिसत नाही. राज्यात सुरू असलेल्या एमबीबीएसच्या परीक्षेत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गेल्या सोमवारपासून सुरू झालेल्या परीक्षेत चारही पेपर फुटल्याचे निदर्शनास आले असून, त्यामुळे पेपर बदलण्याची नामुष्की आरोग्य विद्यापीठावर आली आहे.

पेपर फुटल्याच्या प्रकारामुळे आरोग्य विद्यापीठाने काही ठिकाणी पुनर्परीक्षा घेतली. फार्माकॉलॉजी आणि पॅथॉलॉजी या दोन्ही प्रश्नपत्रिकांच्या दोन्ही भागांमध्ये हा प्रकार घडल्याने परीक्षा वेळेवर सुरू झाली नाही. गैरप्रकारांमुळे या परीक्षांना अर्धा ते पाऊण तास उशिरा सुरू होत असल्याची तक्रार परीक्षार्थी करीत आहेत. या प्रकरणी आरोग्य विद्यापीठाने तक्रार दाखल केली आहे.

सोमवारी पॅथॉलॉजी दोनचा पेपर लीक झाल्याची अफवा पसरली होती. त्यामुळे तो पेपरही वेळेवर बदलण्यात आला. गेल्या आठवड्यात बुधवारी पॅथॉलॉजी विषयाची प्रश्नपत्रिका लीक झाल्याने वेळेवर दुसरी प्रश्नपत्रिका देण्यात आली आणि परीक्षा पार पडली. २ डिसेंबरला आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या फार्माकोलॉजी एकचा पेपर लीक झाला होता. ती परीक्षा रद्द करून पुनर्परीक्षा घेण्यात येणार असल्याचे नंतर जाहीर करण्यात आले होते. ◀(वृत्तसंस्था)

## संक्षिप्त वृत्त



### डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेच्या वतीने उपमुख्यमंत्री अजितदादांचा सत्कार

**मुंबई, दि. १० डिसेंबर-**

डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्रच्या वतीने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व श्री.विठ्ठल-रुक्मिणींची मूर्ती भेट देवून सत्कार करण्यात आला.संघटनेचे राजा माने,राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत, मुंबई अध्यक्ष संजय भैरे व राज्य कार्यकारिणी सदस्य दिपक नलावडे यांनी आज उपमुख्यमंत्री अजितदादा यांनी त्यांच्या देवगिरी या शासकीय निवासस्थानी भेट घेतली.पत्रकार सन्मान योजना मानथन वाढ, डिजिटल मिडियाच्या विविध समस्या आणि पत्रकार अथिस्वीकृती तसेच पत्रकार पेन्शन योजना नियमावली संदर्भातील प्रश्नी लक्ष घातल्याबद्दल अजितदादांचे आभार मानले.



### शिवप्रताप दिनानिमित्त शिवाजी महाराजांना मानवंदना

**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी, शके १९४६ म्हणजेच ८ डिसेंबर रोजी तिथीप्रमाणे शिवप्रताप दिन व शिवसेवक प्रतिष्ठान हिंदुस्थान या संस्थेचा वर्धापन दिनानिमित्त शिवस्मारक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करण्यात आले. स्वराज्य व धर्माच्या आड येऊन हिंदुचे मंदिरांची तोड फोड करत रयतेवर अन्याय करणारा यवन राक्षस विजापूरहून स्वराज्यावर आक्रमण करण्यासाठी निघाला. आणि पंढरपूर, तुळजापूर येथे देवस्थानाची तोड फोड, करून वाई प्रांतात येऊन धडकला. छत्रपती शिवाजी महारांजानी अफजलखानास संपवण्यासाठी युक्तीचा वापर करुन, प्रतापगडच्या पायथ्याला या यवन राक्षसास संपवून केलेल्या रक्षणाचा विजयोत्सव म्हणून शिवप्रताप दिन हा दिन महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. यावेळी संस्थापक अध्यक्ष मारुती सुरवसे, स्वप्नील सावळगी, समर्थ हंचाटे, अभि पवा, इरण्णा मठपती, कार्तिक संगमनुर, संदीप निराळे, विठ्ठल जमादार आदी शिवसेवक व युवती उपस्थित होते.

# रुपाभवानी मंदीराजवळील नाल्यात मृत अर्भक आढळले

### जनावरांनी तोडले अर्भकाचे लचके

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

शहरातील तुळजापूर रोडवरील रुपा भवानी मंदीराजवळील नाल्याच्या कोपऱ्यांमध्ये पुरुष जातीचे नवजात मृत अर्भक मंगळवारी दुपारी अडीचच्या सुमारास आढळून आले. या मृत अर्भकाच्या पायाचे कोणत्यातरी जनावराने लचके तोडल्याचे दिसून आले. जोडभावी पेठ पोलिसांनी मृत अर्भकाला उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठविले असून याबाबतचा पुढील तपास केला जात आहे.

जुना तुळजापूर नाका परिसरात असलेल्या रुपा भवानी मंदीरजवळील विद्युत कार्यालयाशेजारील नाल्याच्या कोपऱ्यामध्ये एका कडेला मंगळवारी दुपारी अडीचच्या सुमारास पुरुष जातीचे नवजात अर्भक जखमी व बेशुध्दावस्थेत दिसून आले. याची माहिती जोडभावी पेठ पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी येऊन पाहणी केली असता हे नवजात अर्भक पुरुष जातीचे असून त्याच्या पायाचे लचके तोडल्याचे दिसून आले. त्यामुळे पोलिस हवालदार व्हि पी पैकेकरी यांनी तात्काळ रुग्णवाहिकेला बोलावून अर्भकाला शासकीय रुग्णालयात हलविले. त्यावेळी हे अर्भक मृत झाल्याचे डॉ. राजदिपसिंग भिसे यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

मृत अर्भकाचे पाय हे कोणत्यातरी जनावराने किंवा कुत्र्यांनी खाल्ले असल्याचा संशय पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. हे अर्भक कोणाचे आहे, ते नाल्यात का टाकून दिले याबाबतचा तपास जोडभावी पेठ पोलिसांकडून करण्यात येत आहे. यापूर्वीही शहरातील अनेक भागातील नाल्यामध्ये अशाप्रकारचे नवजात मृत अर्भके टाकून देण्यात आल्याच्या घटना उघडकीस आलेल्या आहेत.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ठार

### टेंभुर्णी-कुर्डुवाडी रोडवर अपघात

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १० डिसेंबर-**

अज्ञात वाहनाच्या चालकाने दुचाकीला समोरून दिलेल्या धडकेत दुचाकीवरील एकजण ठार तर एकजण जखमी झाला आहे. ही घटना रविवार दि. ८ डिसेंबर रोजी रा.११.३० वा सुमारास टेंभुर्णी-कुर्डुवाडी रोडवर पिंपळनेर शिवारातील एका मंगल कार्यालयासमोर घडली. याबाबत मृताचा भाऊ गणेश धोंडीराम गायकवाड रा.मिरे ता.माळशिरस यांनी अज्ञात वाहनाच्या चालकावर कुर्डुवाडी पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे. तुषार धोंडीराम गायकवाड वय २२ रा.मिरे ता.माळशिरस असे अपघातात मृत झालेल्या तरुणाचे नाव असून सार्थक धनाजी पेठकर असे जखमीचे नाव आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादीचा भाऊ तुषार गायकवाड हा टेंभुर्णी एमआयडी सी येथे कामास होता. रविवार दि.७ रोजी फिर्यादीचा भाऊ तुषार याने फिर्यादीचा मेव्हणा सोमनाथ खडके ( रा.खडकेवस्ती माढा) यांना फोनवरून मौजे पिंपळनेर ता.माढा येथील गावची जत्रा आहे जाऊ का म्हणून विचारणा केली व त्यांच्या परवानगीने तो त्याची दुचाकी नं. डब्लू बी ०१९६०१ यावरुन पिंपळनेर येथील देवाची यात्रा करुन दर्शन घेतल्यानंतर पिंपळनेर येथील त्याचा मित्र सार्थक धनाजी पेठकर हा त्याला तेथेच भेटल्याने दोघे टेंभुर्णी-कुर्डुवाडी रोडवरील पिंपळनेर शिवारातील हॉटेलमध्ये रा.११.३० वा.सुमारास जेवायला निघाले. पिंपळनेर शिवारातील एका मंगल कार्यालयासमोर त्यांच्या सदर दुचाकीला समोरून येणाऱ्या अज्ञात वाहनाने भरधाव येऊन जोराची धडक देऊन फिर्यादीचा भाऊ तुषार गायकवाड याच्या मरणास कारणीभूत झाला व त्याचा मित्र सार्थक पेठकर याला जखमी करुन तसेच दुचाकी डब्यु बी ०१९६०१ चे नुकसान करुन खबर न देताच भरधाव वेगात निघून गेला म्हणून फिर्यादी गणेश गायकवाड याच्या फिर्यादीवरुन अज्ञात वाहनाच्या चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# डॉ. वैशंपायन कॉलेज मधील दोषी अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

शहरातील डॉ. वैशंपायन मेडिकल कॉलेज मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीदिनाचे कार्यक्रम आयोजित न करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर ॲट्रॉसिटीअंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी भीम शक्ती. सामाजिक संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या स्मृती दिननिमित्त सोलापूर येथील डॉ. वैशंपायन मेडिकल कॉलेज मधील आरोग्य निरीक्षक व मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी स्मृती दिनाच्या निमित्ताने होणारे कार्यक्रम केलेले नाहीत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सह देशातील सर्वच राष्ट्रीय महापुरुषांचे जयंती व पुण्यतिथी निमित्त कार्यक्रम घेणे गरजेचे आहे. त्यामुळे राष्ट्रपुरुषांच्या कार्याची प्रेरणा व त्यांनी केलेल्या कार्याची ओळख सर्व लोकांना होते. तसेच त्यांच्या कार्याविषयी नागरीकांमध्ये आवड निर्माण व्हावी अशी भावना प्रशासन व सरकारची असते.

त्यामुळे सर्वत्र जयंती व पुण्यतिथी कार्यक्रम होतात. पण डॉ वैशंपायन मेडिकल कॉलेज मध्ये हा कार्यक्रम घेणे गरजेचे असताना सुद्धा संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी टाळाटाळ केली. ती जातीयवादी विचारातून केली आहे. या घटनेचा भीम शक्ति सामाजिक संघटनेच्यावतीने वतीने तीव्र निषेध करीत असून त्या जातीयवादी अधिकारी यांचेवर पोलिस आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी घटनेची चौकशी करून ॲट्रॉसिटीअंतर्गत गुन्हा गुन्हा दाखल करावा. अन्यथा भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने प्रश्नावर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा भीमशक्ती सामाजिक संघटनेचे सरचिटणीस सुबोध वाघमोडे, राजाभाऊ कदम, शहराध्यक्ष उमेश सूर्ते यांनी पत्रकाद्वारे दिला आहे.

# 'सेवासदन'चा शुक्रवारी युवती महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १० डिसेंबर-**

पुणे सेवासदन संस्था संचलित सोलापूर शाखेच्या वतीने सेवासदन कनिष्ठ महाविद्यालय दशकपूर्ती महोत्सवांतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या दशकपूर्ती महोत्सवांतर्गतच सोलापूर शहरातील युवतींना आपल्या कलागुणांचे सादरीकरण करता यावे यासाठी सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयातर्फे प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही सेवासदन कला कौमुदी युवती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दिनांक १३ डिसेंबर रोजी डॉ. वा. का. किर्लोस्कर सभागृह, हिराचंद नेमचंद वाचनालय सोलापूर येथे सकाळी ९ वाजता या समूहनृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा शालेय गट (इ. ८ वी ते १० वी) आणि महाविद्यालयीन गट (इ.११ वी ते १२ वी) अशा दोन गटात होणार आहे.या स्पर्धे साठी दोन्ही गटातून जवळपास ४० संघांची नोंदणी झाली आहे. प्रत्येक गटातील प्रथम आणि द्वितीय क्रमांक विजेत्या संघास स्वतंत्र रोख पुरस्कार व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. तर दोन्ही गटातील सर्वोत्कृष्ट संघास सेवासदन कला कौमुदी चषक प्रदान करण्यात येणार आहे. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा त्याच दिवशी स्पर्धा समाप्त झाल्यानंतर होणार आहे. या कार्यक्रमासाठी अखिल भारतीय नाट्य परिषद सोलापूर शाखेच्या उपाध्यक्षा डॉ. मीरा शेंडगे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती सेवासदनचे प्राचार्य डॉ. सतीश कुलकर्णी यांनी दिली आहे.



# छद्म : थ्रिल दाखवण्यासाठी रंगमंचावर आटापिटा

**दि. ९ डिसेंबर रोजी अ. भा. मराठी नाट्य परिषद शाखा सोलापूर या संस्थेने 'छद्म' हा नाट्यप्रयोग सादर केला. या नाटकाचे लेखक जयप्रकाश कुलकर्णी यांनी लिहीले तर नाटकाचे दिग्दर्शक व्यंकटेश रंगम यांनी केले.**

**नाट्य समीक्षण**
**विद्या काळे**

छद्म या शब्दाचा अर्थ आहे कपट. अर्थ सांगितला कारण अर्थ समजल्यावर आपले पाहणे त्या अर्थाने जाणीवपूर्वक होते. नाटकात नक्की काय सांगितले आहे हे समजून घेतले जाते. आस्वादात्मकता वाढते. कारण नाटक करणे आणि पाहणे ही पण एक कला आहे.

पडदा उघडताच दिसते रेल्वे बोगी. त्यात आरसा, चार्जिंग साठीजागा, बंद खिडक्या, बोगीचा दरवाजा. दुसऱ्या बाजूला फ्लॅटचा सीन. एक प्रवासी येतो, रुबाबदार पोषाख हा चौधरी.दुसरा येतो तो देसाई टीसी येतो काम करतो जातो. दोन्ही प्रवाशांत ओळख होते, गप्पा सुरू होतात. चौधरी जवळील कादंबरी परफेक्ट मर्डर. चर्चेला सुरुवात होते. आपण म्हणजे लेखकाने कोणाचा, का आणि कसा परफेक्ट खून केला हे सांगतो देसाई ते नाकारतो. आणि आपण म्हणजे देसाईंने कसा खून केला असता हा प्लॉट सांगतो. स्वत:चे नाव वेलणकर सांगतो आणि आपण आपली पत्नी पुष्पा हिला नादाला लावणाऱ्या संशयित संगीत शिक्षक प्रीतमचा बोटीवर नेऊन चौधरीच्या हस्ते कसा खून करवला हे सांगतो. स्टेशन येते देसाई ऊर्फ वेलणकर उतरून जातो आणि चौधरीला कळते वेलणकर ने पाहुण्या हाती साप मारलाय.आपण सुंदर सस्पेन्स कादंबरी लिहिली या विचारात खुश असणाऱ्या आपल्याला उल्लू बनवलं आहे. हा खरा सस्पेन्स आहे. नेपथ्य-व्यंकटेश रंगम, श्रावण डावरे. रेल्वेची बोगी अनेक बारकावे दाखवून उभी केली. फ्लॅट सीन अभिरुची दाखवत छान उभा केला. बोट



त्यावरील निशाण, बाजूची टायर्स हे चांगले दाखवले. नेपथ्यासाठी केलेली धडपड, कष्ट जाणवत होते. संगीत संयोजन-सी शिवप्रसाद, कुशल कुलकर्णी ट्रेनचा आवाज, बाजूच्या ट्रॅक वरून जाणारी ट्रेन.इंजिनाचा, प्लॅटफॉर्म वरील आवाज, बोटीचा भोंगा, पाऊस, चारुकेशी रागातले गाणे या गोष्टीचा चांगला उपयोग केला.

रंगभूषा-लक्ष्मी श्रावण. वेशभूषा-दत्तात्रय बडगंची दोन्ही गोष्टी ठीक, फारसा वाव नव्हता. प्रकाश योजना-जयप्रकाश कुलकर्णी. बोगीतला मंद प्रकाश, बोगीचा दार उघडल्यावर बाजूने जाणाऱ्या ट्रेनच्या बोगीचा सरकता प्रकाश. बोटीवरचा आभाळ आणि पाण्याचा निळसर प्रकाश, वेलणकर उतरून गेल्यावर बोगीच्या दारात उभ्या असणाऱ्या चिडलेल्या चौधरीवरचा स्पॉट चौधरीच्या मानसिकतेकडे लक्ष वेधून घेत होता. लेखक जयप्रकाश कुलकर्णी यांनी लेखनात सस्पेन्स कायम ठेवला आहे. देसाई हाच वेलणकर आहे हे त्याने सांगेपर्यंत न कळू देण्यात लेखकाने खबरदारी घेऊन सस्पेन्सची गंमत वाढवली आहे. चौधरी-व्यंकटेश (राजू) रंगम यांना लेखनात असलेला क्रिमिनल सायकॉलॉजिस्ट फारसा स्पष्ट साकारता आला नाही. पोश्चरही ढिलं होतं. भाषा मराठी नसल्याने उच्चारात चुका होत होत्या. बोटीवरचा प्रसंग सांगताना 'दोन दगडांच्या दोरीने' असे वाक्य उच्चारले गेलं. गडबडीत झालं असेल असे म्हणता येत नाही कारण हे स्पर्धेतलं नाटक आहे. प्रसंग खुलवण्यात खूप कमी पडत होते. कुठलाच बिझनेस नसला की दारू पिणे हा खटकणारा भाग वाटला. आवाजात कोणताच जोर नव्हता. क्वचित बायको (सुमित्रा) वरचा संशय स्पष्ट होत होता. पण संगीत शिक्षक प्रीतमवर संशय, राग व्यक्त होणे आवश्यक होते. दिग्दर्शक म्हणून काम करताना स्वतःच्या भूमिकेकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

दिग्दर्शन आणि महत्वाची भूमिका या दोन्ही गोष्टी एकाच वेळी पेलण्याचा दृष्टीने आपण किती सक्षम आहोत याचा जाणीव पूर्वक विचार करायला हवा. संगीत शिक्षक प्रीतम- सुशांत कुलकर्णी सौम्य स्वभावाचा, कॉलेजचा मित्र असल्याने वागण्यातला मोकळेपणा छान दाखवला.पण गाणे शिकवताना बेसूर गाण्याऐवजी हार्मोनियम वाजवून मूकाभिनय केला असता तर विसंगती टळली असती. सुमित्रा झालेल्या गंगाक्का गुडूर यांनी श्रीमंत, हौशी,अनेक गोष्टींचा हव्यास असलेली चैनी खुशाल स्त्री ताकदीने उभी करण्याचा प्रयत्न केला. ड्रायव्हर-निखिल काळे यांनी अजिजीने वागणारा, कावेबाज ड्रायव्हर छान उभा केला. बाकी सर्व छोट्या पात्रांनी आपापली कामे चोख पार पाडली. दिग्दर्शक रंगम यांनी थ्रिल दाखवण्यासाठी रंगमंचावर बोट आणण्याचा आटापिटा का केला? त्याऐवजी सायक्लोवर शॅडो प्ले दाखवून अवजडपणा टाळता आला असता. देसाई आणि चौधरी सिग्नल न मिळाल्याने गाडीतून उतरतात तिथे कुठलं संगीत नव्हते.स्टेशन जवळ असेल तर कोणताच आवाज का नव्हता आणि मधेच कुठेतरी गाडी थांबली असेल तर अशा ठिकाणी देसाई कुठून चहा घेऊन येतो? अशा किरकोळ चुकाही नजरेआड करता येत नाहीत. पेलवत नसतील तर एकाच वेळी मोठी भूमिका आणि दिग्दर्शनाचा हव्यास करू नये, असे नम्रपणे नमूद करावेसे वाटते.

**मध्य रेल्वे**

**मुख्य प्रशासकीय अधिकारी (बांधकाम) / रस्ते सुरक्षा प्रकल्पाचे काम लेव्हल क्रॉसिंगच्या निर्मूलनाशी संबंधित खुल्या ई-निविदा सूचना क्रमांक: Cons-RSP-01 दिनांक 04/12/2024**

**सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी, ही निविदा चुकीच्या तारखांसह 07/12/2024 रोजी वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली होती. दुरुस्त केलेली निविदा खालीलप्रमाणे आहे.**

**कामाचे नाव:** व्यवहार्यता अभ्यास हाती घेण्याचे काम, विस्तृत प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे काम, मध्य रेल्वेवर ग्रेड सेपरेटर बांधून लेव्हल क्रॉसिंग काढून टाकणे / रस्त्यांचे विलीनीकरण / वळवणे इत्यादीच्या संदर्भात बोली व्यवस्थापनासह तपशीलवार डिझाइन. अंदाजे किंमत: 15,69,72,168/-. सर्वात कमी पैसे: 9,34,900/-. पूर्ण होण्याचा कालावधी: 12 महिन्यांसह. पावसाळा. निविदा खर्च: 0.00. निविदा कागदपत्रांची उपलब्धता: निविदा दस्तऐवज **IREPS** वेबसाइट **www.Ireps.gov.in** वर 11.00 वाजेपर्यंत उपलब्ध असतील. 06/01/2025 चा. कार्यालयाचा पत्ता: मुख्य प्रशासकीय अधिकारी (बाधक) / रस्ता सुरक्षा प्रकल्पाचे कार्यालय, दुसरा मजला, जीएम बिल्डिंग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मेल आयडी: **dycecrspcr@gmall.com.** निविदा सादर करण्याची आणि उघडण्याची तारीख आणि वेळ: सर्व बाबतीत रीतसर पूर्ण झालेली ई-निविदा 11.00 वाजेपर्यंत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अपलोड करावी. 06/01/2025 रोजी वर नमूद केलेल्या वेबसाइटवर. **निविदाकारांसाठी महत्त्वाची सूचना:** (अ) संभाव्य निविदाकारांना सूचित केले जाते की त्यांच्या ऑफरला इलेक्ट्रॉनिक पद्धतीने निविदा देण्यापूर्वी, त्यांनी अटी व शर्ती, ईएमडी आणि निविदा दस्तऐवजाची किंमत सादर करण्याच्या पात्रता निकषांच्या पद्धतींशी संबंधित निविदा तपशीलांचा संदर्भ घ्यावा. (ब) वेळोवेळी जारी केलेली निविदा कागदपत्रे आणि शुद्धीपत्र वरील वेबसाइटवर निविदा उघडण्याच्या किमान 15 दिवस अगोदर उपलब्ध आहेत आणि या वेबसाइटवर पाहता येतील. 605

**अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे**

### आत्महत्येचा प्रयत्न

सोलापूर : लग्न करण्यास नकार दिल्याने १६ वर्षीय मुलीने आत्महत्येचा प्रयत्न केला. लक्ष्मी गणपती निंबाळ (वय १६, रा. मिरजगी, ता. अक्कलकोट) असे उपचारासाठी दाखल झालेल्या मुलीचे नाव आहे. ९ डिसेंबर रोजी सायंकाळी राहत्या घरी गावातील मुलाबरोबर लग्न करण्यास नकार दिल्याने लक्ष्मीने रागाच्या भरात पिकावर फवारण्याचे विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे लक्ष्मीला त्रास होऊ लागल्याने तिला उपचारासाठी भाऊ सिध्दाराम निंबाळ यांने सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले.

### शिवयोगी कंदलगावकर यांचे निधन

**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा जंगम समाज संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष तथा महावितरण कंपनीचे निवृत्त कर्मचारी शिवयोगी स्वामी कंदलगावकर (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित मुली, एक मुलगा आणि नातवंडे असा परिवार आहे.



**जाहिर प्रसिध्दीकरण**

नि.नं. ६
सि.कि.अर्ज ९९/२०२४

**बार्शी येथील मे. जिल्हा व सत्र न्यायालय यांचे कोर्टात**

**सुवर्णा सिध्देश्वर सातव - अर्जदार**
विरूध्द
**सरकार - सामनेवाला**

तमाम लोकांना विशेषतः मौजे चौभेपिंपरी ता. माढा जि. सोलापुर हद्दीतील लोकांना कळविण्यात येते की, ज्या आर्थी अर्जदार श्रीकांत सिध्देश्वर सातव वय १६ वर्षे, धंदा शिक्षण, चे अ.पा.क. आई सुवर्णा सिध्देश्वर सातव रा. चौभेपिंपरी, ता. माढा, जि. सोलापुर यांनी माढा येथील बार्शी येथील मे. जिल्हा व सत्र न्यायालय यांचे कोर्टात सि.कि. अर्ज ९९/२०२४ हे श्रीकांत सिध्देश्वर सातव अ.पा.क. याचे नावावरील मिळकत विक्री करण्यास परवानगी मिळण्यासाठी अर्जदार यांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहिरनाम्याने कळविण्यात येते की, सदर अर्जातील अर्जदारांशिवाय त्यांना इतर दुसरे कोणीही जवळचे व कायदेशीर वारस नाहीत म्हणुन त्याबाबत अर्जदार यांनी जमीन विक्री करण्यास कोणाचीही काही लेखी अथवा तोंडी तक्रार असल्यास तसेच कोणाचा काही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हितसंबंध असल्यास सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ०१ महिन्याचे आत किंवा कोर्टाने पुढील नेमलेले ता. ०९/०१/२०२५ रोजी लेखी अथवा तोंडी तक्रार मांडावी. अन्यथा वरील अर्जदार यांना कायदेशीर वारस दाखला दिल्यानंतर तदनंतर कोणाची काही हक्क तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

हि जाहिर नोटीस आज दि. ०६/१२/२०२४ रोजी माझी सही व न्यायालयाची शिक्याची दिली.

**सही/-**
**वरिष्ठ लिपिक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

**पंढरपूर येथील मे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ट स्तर यांचे कोर्टात**

**१) श्री. पुरुषोत्तम बापूराव तामगाडगे वगैरे --अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही -- सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत लता लक्ष्मणराव तामगाडगे यांचे भूमापन क्र./सर्व्हे नं. ७४/१ई/२क/१, प्लॉट नं. ५ पैकी क्षेत्र १११.५० चौ.मी. खुली प्लॉट जागा या मिळकतीस वारस नोंद होवून मिळणेसाठी मागणी केली असता मा. गांव कामगार तलाठी सो, पंढरपूर यांनी दि. १९/०१/२०२४ रोजी अर्जदार यांना सक्षम न्यायालयातून वारस दाखला आणणेबाबत सुचना दिल्या.

त्याअर्थी यातील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत लता लक्ष्मणराव तामगाडगे यांचे अर्जदार हे वारस असलेबाबत वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे. तरी सदरचा आदेश होणेबाबत कोणाचीही कसलीही हरकत असलेस त्यांनी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर दि. १३/०१/२०२५ रोजी सदर न्यायालयात स्वतः अगर विधिज्ञामार्फत हजर राहून लेखी हरकत नोंदवावी. वर नमुद कालावधीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे मे. कोर्ट आदेश केला जाईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

**सही/-**
**सह. अधिक्षक,**
**दिवाणी न्यायाधिश क. स्तर,**
**पंढरपूर**

**जाहीर समन्स**

**मा. उपनिबंधक सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को. ऑप. असोसिएशन लि. सोलापूर**
११३ (अ), सिद्धेश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडीया ट्रेझरी शाखेजवळ, सोलापूर

**दि लातूर अर्बन को. ऑप. बँक. लि. लातूर - अर्जदार**
**शाखा सोलापूर**
विरुद्ध
**(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) -जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ३५३/ २०२४-२५ | ४,३३,२७६/- | ३ | **सोनवणे नरसिमा तुकाराम,** रा. मु.पो. मांडेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दीष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार शुक्रवार, दि. २७/१२/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १०/१२/२०२४ रोजी माझी सही व कार्यलयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

**अहिल्यादेवी होळकर भटक्या जाती जमाती शिक्षण संस्कार मंडळ, कोथळे**

ता.माळशिरस, जि.सोलापूर-४१३१०९ मो.नं.९४२११२०६०६.९५९४८५३३५७

**सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणेबाबत**

अहिल्यादेवी होळकर भटक्या जाती जमाती शिक्षण संस्कार मंडळ, कोथळे या संस्थेची सर्वसाधारण सभा शनिवार, दिनांक २१ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मुख्याध्यापक दत्तात्रय शंकर दडस आदर्श विद्यालय कोथळे ता. माळशिरस जि. सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

**सभेपुढील विषय :**

१) सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षपदी निवड करणे.
२) मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
३) शालेय अडी-अडचणी व पटासंदर्भात चर्चा करणे.
४) शालेय विकासासंदर्भात चर्चा करणे
५) संस्थेच्या हिशोबा संदर्भात चर्चा करणे व अंदाजपत्रक मंजूर करणे.
६) मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे तरी सदर सभेस आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**सही- अध्यक्ष/सचिव**
**अहिल्यादेवी होळकर भटक्या जाती-जमाती शिक्षण संस्कार मंडळ कोथळे, ता. माळशिरस, जि. सोलापूर**

**टीप:** कोरम अभावी सर्वसाधारण सभा तहकूब झाल्यास त्याच ठिकाणी एक तासाने सभा घेण्यात येईल. त्यावेळी कोरमची आवश्यकता राहणार नाही.

# सनातनी जागे झाले तर जगात उलथापालथ करतील

## हिंदू मोर्चातून रामगिरी महाराजांचा हल्लाबोल

◆ **छत्रपती संभाजीनगर, १० डिसेंबर**

सनातन एकत्र आल्यास काय होते, याची प्रचीती महाराष्ट्र विधानसभेच्या निकालातून आली. आम्ही सर्व जागे झालो, तर जगात उलथापालथ होईल. अमेरिकेचा अध्यक्ष देखील आम्ही निवडू, असा इशारा सरला बेटाचे महंत रामगिरी महाराज यांनी दिला. बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात हिंदू जनजागरण समितीतर्फे छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी ते बोलत होते.

रामगिरी महाराज म्हणाले की, बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराविरोधात आपण एकत्र आलो आहोत. १९७१ मध्ये सुद्धा अत्याचार झाले, ३५ लाख महिलांवर पाकिस्तानी लोकांनी बलात्कार केले. त्यावेळी हा देश आपण स्वतंत्र केला आणि आज तिथेच हिंदूंवर अत्याचार सुरू आहेत. ज्या इस्कॉन मंदिरांनी कोरोनाच्या संकटात या लोकांना जेवायला घातले, तेच लोक आता उलटले आहेत. एका महिलेवर २०-३० लोकांनी बलात्कार केला. सनातन कुठल्या धर्माचा द्वेष करीत नाही. पण, आम्हाला शिकवणच अशी आहे की, कुणी एक गालात मारली, तर दुसरा गाल पुढे करा. मात्र, शास्त्र हे सांगत नाही. समोर कुणीही असू द्या, अन्याया विरोधात लढायचे आपले काम आहे. (वृत्तसंस्था)

### जगात एकच धर्म, तो म्हणजे सनातन



भगवद्गीतेतही सांगितले आहे की, सनातन संस्कृती एक गालात मारल्यावर पुढचा गाल पुढे करीत नाही. हिंसा कुणी करीत असेल, तर ती सहन का करावी? आपण आजपर्यंत अन्याय सहन करीत आलो आहो, हे दुर्दैव आहे. मी नाशिकमध्ये अत्याचाराबाबत बोलत होतो. त्यावेळी काही लोक पुढे आले. एकीकडे म्हणतात, संविधानावर घाला आहे आणि रस्त्यावर उतरतात, सोयीने संविधानाचे नाव घेतात. जगात एकच धर्म आहे, तो म्हणजे सनातन धर्म. बाकी सर्व फक्त पंथ आहेत. अन्याय करणारे अधर्मी आहेत, असा धर्म असूच शकत नाही, असा हल्लाबोल रामगिरी महाराजांनी केला.



रशियाच्या दौऱ्यावर असलेले संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी मंगळवारी कालिनिंग्रॅड येथे आयएनएस तुशिलच्या जलावतरण सोहळ्यात सामूहिक छायाचित्र काढले. ही दिशादर्शक क्षेपणास्त्र युद्धनौका असून, नौदलात समाविष्ट करण्यात आल्यामुळे भारताची सागरी सुरक्षा अधिक मजबूत होणार आहे

# 'मोदी-अदानी भाई भाई' लिहिलेली बॅग घेऊन प्रियांका संसदेत

◆ **नवी दिल्ली, १० डिसेंबर**

अदानी समूहावरील भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी करण्याच्या मागणीवरून इंडिया आघाडी आक्रमक झाली आहे. संसदेत आणि संसदेच्या बाहेरही यासंबंधीच्या मागण्या सुरू आहेत. त्यातच काँग्रेसच्या खासदार प्रियांका वढेरा आज मोदी-अदानी भाई भाई असं लिहिलेली बॅग संसदेत घेऊन आल्या. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या बॅगेचे कौतुक केले.

प्रियांका वढेरा यांनी संसदेत आणलेल्या बॅगवर एका बाजूला मोदी आणि गौतम अदानी यांचे व्यंग्यचित्र, तर दुसऱ्या बाजूला मोदी-अदानी भाई भाई अशी ओळ लिहिली आहे. या ओळीने लक्ष वेधले आहे. राहुल गांधी, प्रियांका वढेरा यांच्यासह इंडिया आघाडीचे आणि काँग्रेसच्या खासदारांनी ही बॅग हातात घेतली होती. संसदेच्या बाहेर घोषणाबाजीही करण्यात आली. पंतप्रधान मोदी सदनात या आणि आरोपांवर उत्तर द्या, अशा घोषणा देण्यात आल्या. तृणमूल काँग्रेस आणि समाजवादी पार्टीने मात्र या आंदोलनात भाग घेतला नाही. यावरून भाजपाने इंडिया आघाडी विखुरली असल्याचा आरोप केला.

राहुल गांधी यांना जेव्हा कळले की, प्रियांका वढेरा या अदानी आणि मोदींबाबतची ओळ लिहिलेली बॅग घेऊन आल्या आहेत, तेव्हा त्यांनी या बॅगेचे कौतुक केले. ही बॅग खूपच क्यूट आहे, असे राहुल गांधींनी म्हटले आहे. तसेच ही बॅग कुणी बनवली, असे विचारले असता प्रियांका वढेरा खळखळून हसल्या. (वृत्तसंस्था)




अदानी आणि मोदी यांच्या नावाचा उल्लेख असलेली बॅग हातात घेऊन राहुल गांधी, प्रियांका वढेरा यांच्यासह इंडिया आघाडीच्या नेत्यांनी आंदोलन केले

# महाकुंभमेळ्यासाठी धावणार १३ हजार रेल्वेगाड्या

## केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती

◆ **नवी दिल्ली, १० डिसेंबर**

महाकुंभमेळ्यासाठी नियमित आणि विशेष मिळून १३ हजार रेल्वेगाड्या धावणार आहेत, अशी माहिती केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. रेल्वेकडून यावेळी विशेष व्यवस्था करण्यात येणार आहे. पहिल्यांदाच रेल्वेकडून गाड्यांच्या दोन्ही बाजूला इंजिन बसवण्यात येणार आहेत; जेणेकरून इंजिनची बाजू बदलण्यासाठी लागणारा वेळ वाचेल आणि अधिकाधिक गाड्या चालवता येतील. यापैकी तीन हजार रेल्वेगाड्या विशेष असतील, असे त्यांनी सांगितले.



महाकुंभमेळ्याच्या तयारीचा आढावा रेल्वेमंत्र्यांनी घेतला. वैष्णव यांनी सांगितले की, मागील अडीच वर्षांपासून महाकुंभाची व्यापक तयारी सुरू आहे. महाकुंभाशी संबंधित विकासकामांवर रेल्वेने ५ हजार कोटी रुपये खर्च केले आहेत.

२०१९ मध्ये झालेल्या कुंभ दरम्यान ७ हजार गाड्या चालवण्यात आल्या होत्या. ही संख्या जवळपास दुप्पट आहे. या कालावधीत रेल्वे १३ हजार गाड्या चालवणार आहे. यात १० हजार नियमित आणि ३ हजार विशेष गाड्या असणार आहेत. महाकुंभ दरम्यान १६ डब्यांच्या मेमू गाड्याही प्रथमच धावणार आहेत. मेमू गाड्यांना दोन्ही बाजूला इंजिन आहेत. रेल्वेमंत्र्यांच्या मते, यावेळी मोठ्या संख्येने भाविक महाकुंभासाठी येणार असून, राज्य सरकारबरोबरच रेल्वेनेही सविस्तर तयारी केली आहे. राज्य सरकारच्या समन्वयाने रेल्वे आपले काम करीत आहे. (वृत्तसंस्था)

# हा हिंदुस्थान आहे, बहुसंख्यकांच्या इच्छेनुसारच देश चालणार!

## न्यायाधीशांच्या वक्तव्याची चर्चा

◆ **प्रयागराज, १० डिसेंबर**

देशात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांच्या इच्छेनुसार हिंदुस्थान चालेल, असे म्हणण्यास मला कोणताही संकोच वाटत नाही, असे विधान अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश शेखर कुमार यादव केले असून, त्यांच्या या विधानाची चर्चा आहे.

हा कायदा आहे, कायदा खरे तर बहुसंख्यकांनुसार चालतो. त्याला कुटुंब किंवा समाजाच्या संदर्भात बघा. बहुसंख्यकांचे कल्याण आणि सुख ज्यात लाभते, तेच मान्य केले जाईल, असे न्यायाधीश शेखर कुमार यादव प्रज्ञागराज येथील विश्व हिंदू परिषदेच्या (विहिंप) कार्यक्रमात समान नागरी संहिता या विषयाबाबत मार्गदर्शन करताना म्हणाले.

धर्म, लिंग किंवा जात याची पर्वा न करता समान नागरी संहितेमुळे सर्व नागरिकांना समान कायदा लागू होतो. यात विवाह, घटस्फोट, दत्तक, वारसा आणि उत्तराधिकार यासारख्या बाबींचा समावेश असेल. मुस्लिम समुदायाचे नाव न घेता न्यायाधीश म्हणाले की, बहुपत्नीत्व, तिहेरी तलाक आणि हलाला यासारख्या प्रथा अस्वीकारार्ह आहेत.

आमचा पर्सनल लॉ याला परवानगी देतो, असे जर तुम्ही म्हणता, तर ते मान्य केले जाणार नाही. आमच्या शास्त्रात आणि वेदांमध्ये देवी म्हणून ओळखल्या गेलेल्या स्त्रीचा तुम्ही अनादर करू शकत नाही. तुम्ही चार बायका ठेवण्याचा हक्क सांगू शकत नाही, असेही ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

### सुप्रीम कोर्टाकडून दखल

न्या. शेखर यादव यांच्या वक्तव्याची चर्चा सुरू झाल्यानंतर खुद्द सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली. न्या. यादव यांनी कोणत्या संदर्भात आणि कोणत्या शब्दांत आपला दृष्टिकोन मांडला, याविषयी न्यायालयाने सविस्तर माहिती मागितली आहे.

## चित्रपट वार्ता

### 'उर्मिलायन'मधून उलगडणार उर्मिला-लक्ष्मणचा संवाद




**मुंबई** : 'सुमुख चित्र' निर्मित व 'अनामिका' प्रकाशित एक संगीत, नृत्यनाट्य 'उर्मिलायन' हे नवे पौराणिक नाटक १५ डिसेंबरला रंगभूमीवर येणार आहे. पुण्यात अण्णाभाऊ साठे नाट्यगृह दुपारी या नाटकाचा शुभारंभ प्रयोग रंगणार आहे. नाटकाच्या दिग्दर्शनाची धुरा लेखक, दिग्दर्शक सुनिल हरिश्चंद्र यांनी सांभाळली आहे. या नाटकाची निर्मिती सुमुख चित्रचे कार्यकारी निर्माता निखिल जाधव यांनी केली. उर्मिला...वाल्मीकिंच्या रामायणातली एक उपेक्षित व्यक्तिरेखा. रामायणातील राम, सीता आणि रावण या तीन व्यक्तिरेखांच्या भाऊगर्दीत उर्मिला ही व्यक्तिरेखा काहीशी अबोलच राहिली. उर्मिलेच्या बाबतीत असंख्य प्रश्नांच्या उत्तरांचा शोध 'उर्मिलायन' या नाटकातून घेण्यात येणार आहे. १६ कलाकारांच्या संचाने हे नाटक सजले आहे. नाटकाचे नेपथ्य अरुण राधायण तर संगीत निनाद म्हैसाळकर यांचे आहे.

### शुभांगी गोखलेंच्या वाढदिवसानिमित्त लेकीची खास पोस्ट



**मुंबई** : मालिका, चित्रपट, नाटक अशा तिन्ही माध्यमातून शुभांगी गोखले यांनी त्यांच्या अभिनयाची छाप सोडली आहे. नुकताच त्यांचा वाढदिवस झाला. यादिवशी त्यांची लेक आणि अभिनेत्री सखी गोखलेने खास पोस्ट केली. सखीने तिचे वडील आणि दिवंगत अभिनेते मोहन गोखले यांच्यासोबतचे क्षण यावेळी शेअर केले आहेत तसेच शुभांगी गोखलेंसोबतचे बरेच फोटो शेअर करून त्यावर दिलेल्या कॅप्शनने विशेष लक्ष वेधून घेतले. वाईट दिवसांममध्येही आनंद मिळवणारी मुलगी म्हणून जी सर्वांच्या लक्षात राहते, अशा मुलीला वाढदिवसाच्या शुभेच्छा...आय लव्ह यू...! तू या जगात आल्याबद्दल आणि नंतर माझी आई झाल्याबद्दल खरेच खूप धन्यवाद... तुझ्याशिवाय आयुष्यात काहीच नाही...', अशी पोस्ट तिने केली.

### 'पुष्पा २'चा जागतिक बॉक्स ऑफिसवर ९०० कोटींचा गल्ला



**मुंबई** : 'पुष्पा २ द रूल' चित्रपटाने सहाव्या दिवशी केलेल्या कमाईची आकडेवारी समोर आली आहे. पुष्पा २ ने मागील ५ दिवसांत वर्ल्डवाईड बॉक्स ऑफिसवर ९०० कोटींचा गल्ला केला आहे. चित्रपटाने पहिल्या सोमवारी ६० कोटींहून अधिक कमाई केली. भारतात ५०० कोटी रुपयांचा आकडा पार करणारा पुष्पा २ आता वर्ल्डवाईड १००० कोटींच्या दिशेने जात आहे. वर्ल्डवाईड बॉक्स ऑफिसवर १ हजार कोटी रुपये कमावणारा हा आठवा चित्रपट ठरणार आहे. पुष्पा २ ने बॉक्स ऑफिसवर आज मंगळवारी ६०० कोटींचा आकडा पार केला. पुष्पा २ ने बॉक्स ऑफिसवर १७० कोटी रुपयांचा आणि वर्ल्डवाईड २९४ कोटी रुपये मिळवून खाते उघडले होते.

### 'हॅशटॅग तदेव लग्नम'मधील गाणे प्रदर्शित




**मुंबई** : 'हॅशटॅग तदेव लग्नम्' चित्रपटातील 'सगळ्यांचा फोटो' हे गाणे नुकतेच प्रदर्शित करण्यात आले. या गाण्यात सुबोध भावे आणि तेजश्री प्रधान यांच्या लग्नाचे फोटो काढले जात आहेत. गाण्यात त्यांची मस्त केमिस्ट्री दिसत असून, 'कलरफूल' दिसणारे हे गाणे लग्नसमारंभात सर्रास वाजेल असेच आहे. येत्या २० डिसेंबरला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. 'सगळ्यांचा फोटो' हे गाणे क्षितिज पटवर्धन यांच्या लेखणीतून साकारले आहे. पंकज पडघण यांनी संगीतबद्ध केले आहे. तर या गाण्याला नकाश अझीझ आणि आर्या आंबेकर यांचा आवाज लाभला आहे.

# ममता बॅनर्जींकडे दिले जावे इंडिया आघाडीचे नेतृत्व

## लालूप्रसाद यादव यांची भूमिका

◆ **पाटणा, १० डिसेंबर**

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांना इंडिया आघाडीचे नेतृत्व करण्याची परवानगी दिली जावी, असे राजदचे प्रमुख लालूप्रसाद यादव यांनी मंगळवारी सांगितले.

भाजपाविरोधी आघाडीचे नेतृत्व स्वीकारण्याची इच्छा ममता बॅनर्जी यांनी सोमवारी व्यक्त केल्यानंतर लालूप्रसाद यादव यांची टिप्पणी समोर आली आहे. इंडिया आघाडीतील मोठा सहकारी काँग्रेस पक्षाला ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाबद्दल काही अडचण असल्यास, त्याचा कोणताही फरक पडणार नाही. इंडिया आघाडीचे नेतृत्व करण्याची परवानगी ममता बॅनर्जी यांना दिली जावी, असे लालूप्रसाद म्हणाले.

ममता बॅनर्जी यांच्यासह आघाडीतील कोणताही मोठा नेता नेतृत्व करण्यास तयार असेल, तर आपल्याला कोणताही आक्षेप नाही. मात्र, याबाबतचा निर्णय सहमतीने घेण्यात यावा, असे यापूर्वी राजदचे तेजस्वी यादव यांनी सांगितले होते.

आघाडीच्या कार्यपद्धतीवर ममता बॅनर्जी यांनी ६ डिसेंबर रोजी नाराजी व्यक्त केली होती आणि संधी मिळाल्यास आघाडीचे नेतृत्व करण्यास तयार असल्याचे संकेत दिले होते. मुख्यमंत्रिपद सांभाळण्यासोबतच विरोधकांची आघाडी चालवण्याची दुहेरी जबाबदारी पार पाडू शकतो, असे ममता बॅनर्जी यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)



जम्मू-काश्मीरच्या श्रीनगर येथील आमदार निवासाला मंगळवारी भीषण आग लागली. मोठ्या प्रमाणात पाण्याचे बंब तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि आग नियंत्रणात आणली

# ४५० कोटींचा बंगला अन् लाखोंचा पगार

## आरबीआय गव्हर्नरचे वेतन किती?

## कोणत्या सुविधा मिळतात?

शक्तिकांत दास आरबीआयच्या गव्हर्नरपदावरून निवृत्त झाले असून, त्यांच्या जागी संजय मल्होत्रा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते ११ डिसेंबर रोजी आरबीआयच्या गव्हर्नरपदाचा पदभार स्वीकारणार आहेत. संजय मल्होत्रा १९९० च्या बॅचचे आयएएस अधिकारी असून, सध्या ते महसूल विभागाचे सचिव म्हणून काम पाहतात. देशातील बँकिंग व्यवस्थेतील सर्वोच्च पद समजल्या आरबीआयच्या गव्हर्नरला सरकारकडून मोठ्या सुविधा देण्यात येतात तसेच त्यांना लाखोंचा पगारही देण्यात येतो.

**आरबीआय गव्हर्नरला कोणत्या सुविधा?**

आरबीआय गव्हर्नरला मुंबईतील मलबार हिल या उच्चभ्रू परिसरात राहण्यासाठी बंगला दिला जातो. तो बंगला प्रशस्त आणि आलिशान असतो. हा बंगला सर्वसुविधांनी युक्त आहे. आरबीआयचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी एका यूट्यूब चॅनेलला मुलाखत देताना सांगितले होते की, गव्हर्नरला जो बंगला दिला जातो, तो विकला तर त्याची किंमत ४५० कोटींहून अधिक होते.

**आरबीआय गव्हर्नरचा पगार**

निवृत्त होत असलेले गव्हर्नर शक्तिकांत दास यांना २.५ लाख रुपये वेतन असल्याची माहिती अलिकडेच माहितीच्या अधिकारातून समोर आली होती. त्या आधीचे गव्हर्नर उर्जित पटेल यांनाही तितकेच वेतन होते. आरबीआयच्या डेप्युटी गव्हर्नरला २.२५ लाख इतके वेतन तर कार्यकारी संचालकाला २.१६ लाख रुपये इतके वेतन मिळते.

### संजय मल्होत्रा यांचा परिचय



रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे नवे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आयआयटी-कानपूरमधून शिक्षण पूर्ण केले आहे. याशिवाय त्यांनी अमेरिकेच्या प्रिन्स्टन विद्यापीठातून पब्लिक पॉलिसी या विषयात पदव्युत्तर पदवी मिळवली आहे. संजय मल्होत्रा हे राजस्थान कॅडरचे १९९० च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. आपल्या ३३ वर्षांच्या कारकीर्दीत त्यांनी ऊर्जा, वित्त आणि कर, माहिती तंत्रज्ञान, खाणकाम अशा विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट काम केले आहे. सध्या ते अर्थ मंत्रालयात सचिव म्हणून कार्यरत आहेत. याआधी ते वित्त मंत्रालयाच्या अंतर्गत वित्तीय सेवा विभागाचे सचिव पदावर होते.

# विमानात बॉम्बचा खोटा इशारा देणारा निघाला आयबीचा अधिकारी

◆ **रायपूर, १० डिसेंबर**

नागपूर येथून रायपूरला जाणाऱ्या इंडिगोच्या विमानात बॉम्ब असल्याचा खोटा इशारा दिल्याबद्दल अटक करण्यात आलेला इंटेलिजन्स ब्युरोचा (आयबी) अधिकारी निघाला.

१८७ प्रवाशांना घेऊन निघालेल्या विमानाचे रायपूर येथे इमर्जन्सी लॅण्डिंग करण्यात आले. याबाबत केलेला दावा खोटा निघाल्याने त्याला अटक करण्यात आली. अनिमेश मंडल असे त्याचे नाव असून, तो आयबीचा नागपुरातील उपअधीक्षक दर्जाचा अधिकारी आहे. तो निर्दोष असल्याचा दावा त्याचा वकील फैजल रिझवी यांनी येथे पत्रकारांशी बोलताना केला.

विमानाने १४ नोव्हेंबर रोजी नागपुरातून उड्डाण केल्यानंतर त्यात बॉम्ब असल्याचे मंडलने सांगितले होते. त्यामुळे विमान रायपूरला वळवण्यात आले. विमानाची संपूर्ण तपासणी केली असता, ती अफवा असल्याचे स्पष्ट झाले. भारतीय न्याय संहिता आणि नागरी उड्डयन कायद्यान्वये त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मंडल विमानात चढल्यानंतर त्यात बॉम्ब असल्याची माहिती त्याच्या सूत्राने दिली होती. त्यामुळे त्याने आपण आयबी अधिकारी असल्याची माहिती तातडीने दिली नव्हती, असे रिझवी यांनी सांगितले. मंडलला ताब्यात घेतल्यानंतर तातडीने आयबीला माहिती देण्यात आली. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत

https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# संघ शक्तिः युगे युगे...

भारताच्या पुढाकाराने तसेच हस्तक्षेपामुळे अस्तित्वात आलेल्या बांगलादेशातील हिंदू समुदायावरील अत्याचार हा नवा विषय असला, तरी अलिकडच्या सत्तांतरानंतर त्यात झालेली वाढ अत्यंत चिंताजनक आहे. हिंसाचार, भेदभाव, सक्तीचे धर्मांतर, मंदिरे उद्ध्वस्त करणे, जमिनी बळकावणे आणि सामाजिक बहिष्कार अशा अनेक मार्गांनी बांगलादेशातील हिंदूंवर अत्याचार केले जात आहेत. तस्लिमा नसरिन या ख्यातनाम बांगलादेशी लेखिकेने १९९३ मध्ये 'लज्जा' नावाची कादंबरी लिहिली होती. १९९२ मध्ये अयोध्येतील वादग्रस्त ढांचा उद्ध्वस्त करण्यात आल्यावर त्याची बांगलादेशात प्रतिक्रिया उमटली. इस्लामी कट्टरपंथीयांनी तेथील हिंदूंवर अनन्वित अत्याचार केले. त्या अत्याचारांचे चित्रण या कादंबरीत आहे. ही कादंबरी प्रकाशित झाल्यावर तस्लिमा नसरिनला देशातून हाकलून देण्यात आले. तिला मृत्युदंड ठोठावण्यासाठी फतवे निघाले. अखेर तस्लिमा नसरिनने भारतात आश्रय घेतला. इतिहासाने पुन्हा एकदा कूस पालटली आहे. बांगलादेशात सत्तांतर झाले. आता शांततेचा नोबेल पुरस्कार मिळालेले डॉ. मोहंमद युनूस हे तेथील हंगामी सरकारचे प्रमुख आहेत. परंतु, त्यांना स्वतःच्या देशात शांतता प्रस्थापित करता येईनाशी झालेली आहे. याचे कारण आहे इस्लामी कट्टरपंथीयांवर अंकुश लावण्यासाठी तेथील सरकार कोणतीही हालचाल करताना दिसत नाही. खरे तर नोबेल समितीने त्यांचा पुरस्कार परत घेतला पाहिजे किंवा आपल्या देशात शांतता प्रस्थापित करण्यात आपण अपयशी झालो, हे मान्य करून डॉ. युनूस यांनीच पुरस्कार परत केला पाहिजे.

थोडे मागे वळून पाहिले तर आपल्याला असे दिसेल की, बांगलादेशातील सत्तांतराची पूर्वपीठिका विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या माध्यमातून लिहिली गेली होती. प्रत्यक्षात तेथील शेख हसीना यांचे प्रगतिशील विचारांचे सरकार कट्टरपंथीयांना उलथवायचे होते. शेख हसीना यांच्या नेतृत्वातील बांगलादेश अवामी लीग वगळता तेथील कोणत्याही राजकीय पक्षाला कट्टरपंथीयांचा दबाव पेलता आला नाही. त्याची परिणती शेख हसीना यांच्या राजीनाम्यात झाली. तस्लिमा नसरिन यांच्यासारखा त्यांनाही भारताने आश्रय दिला. शेख हसीना यांनी राजीनामा देऊन देश सोडल्याबरोबर हिंदू समाजातील लोकांची घरे, दुकाने, प्रतिष्ठाने, धर्मस्थळे या सर्वांवर कट्टरपंथीयांनी हल्ले सुरू केले. दि हिंदू बुद्धिस्ट ख्रिश्चियन युनिटी कौन्सिलचा दावा असा आहे की, ४ ते २० ऑगस्ट २०२४ या अवघ्या एका पंधरवड्यात दोन हजारांवर हल्ले झाले. त्यात ६९ धर्मस्थळे होती. दीडशेवर कुटुंबांच्या घरांवर हल्ले झाले. कुणाच्या घरी लुटमार करण्यात आली तर कुणाचे घर जाळून टाकण्यात आले. यात किती हिंदूंचे जीव गेले असतील याचा अंदाज अद्याप आलेला नाही. हे झाले शेजारच्या बांगलादेशातले. त्याच बांगलादेशातले, ज्याचे अस्तित्वच भारताने निर्माण केले. बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचाराच्या विरोधात विश्व हिंदू परिषद आणि अन्य संघटनांच्या माध्यमातून भारतात निषेध मोर्चे, आंदोलने केली जात आहेत. परंतु, भारतात या साऱ्या प्रयत्नांना मिळणारा प्रतिसाद कमी आहे. भारत हा हिंदुबहुल देश आहे आणि तरीही दुर्दैवाने भारतीय हिंदूंचे रक्त बांगलादेशी हिंदू समाजावरील अत्याचारामुळे अद्याप खवळलेले दिसत नाही. 'संघ शक्तिः कलौ युगे...' आणि 'संघ शक्तिः युगे युगे...' ही भारताची आद्य शिकवण असतानाही हिंदू संघटित होत नाहीत. सनातन हिंदू धर्म ऐक्याचा उपदेश करणारा आहे. परंतु, त्याच वेळी ही धर्म व अध्यात्माची परंपरा संघटित असण्याचे महत्त्व सांगणारीही आहे. संघटित शक्तीचे पाठबळ मिळाल्याशिवाय प्रभू श्रीरामचंद्रांना लंकेवरची चढाई यशस्वी करता येणे शक्य नव्हते. प्रभू श्रीरामाला संघटित सेनेचे बळ मिळाले तेव्हा रावणाचे निर्दालन शक्य झाले. धर्माचे रक्षण करणे पोथ्यांचे किंवा धर्मस्थळांचे रक्षण करण्यापुरते नसते. हिंदू धर्माशी नाते सांगणाऱ्या प्रत्येकाचे रक्षण करणे हे विश्वातील समस्त हिंदूंचे आद्य कर्तव्य आहे. बांगलादेशातील हिंदूंची लोकसंख्या सव्वा कोटींच्या वर आहे. बांगलादेशच्या लोकसंख्येत त्यांचे अस्तित्व आठ टक्के; तरीही ते अल्पसंख्यक. भारत आणि नेपाळच्या नंतर सर्वाधिक हिंदू बांगलादेशात राहतात. त्यांचे पश्चिम बंगालशी आणि त्यामुळे समस्त भारताशी असलेले नाते केवळ भावनिक नव्हे, तर वांशिक, धार्मिक, आध्यात्मिक आहे. त्यामुळे त्यांच्यावरील कट्टरपंथीयांचा अत्याचार हा समस्त हिंदू समाजावरील अत्याचार असल्याचे समजून भारतातील तमाम हिंदूंनी संघटितपणे या अत्याचाराला विरोध सुरू केला पाहिजे. मोर्चे, धरणे, आंदोलने यात हिरिरीने सहभागी झाले पाहिजे. भारत सरकार आपल्या स्तरावर बांगलादेशातील स्थितीवर उपाय शोधण्याचा प्रयत्न करीत आहेच. परंतु, जागतिक समुदायाचे लक्ष वेधून घ्यायचे असल्यास आणि त्यांना हस्तक्षेप करणे भाग पाडायचे असल्यास भारतीय हिंदूंनी संघटित ताकद दाखवून दिली पाहिजे. भारत हा शांततामय सहअस्तित्वाचा उपदेश करणाऱ्या हिंदूंचा देश आहे. इथले मुस्लिम आणि अन्य धर्मीय शांततेत राहतात. तरीही मुस्लिमांच्या विरोधात जरा कुठे खुट्ट झाले की भारतात फुरोगाम्यांचा गळेकाढूपणा सुरू होतो. तिकडे बांगलादेशात हिंदूंवर पराकोटीचे अत्याचार सुरू असताना मात्र एकाही फुरोगाम्याच्या गळ्यातून आवाज निघालेला दिसत नाही. काहीही छोटे-मोठे घडले की, सरकारवर टीका करा, पुरस्कार परत करा, निषेध करा, रकानेच्या रकाने आग ओका ही फुरोगाम्यांची नेहमीची स्टाईल बांगलादेशच्या संदर्भात मात्र थंडावलेली दिसते आहे. त्यांना कदाचित हेही माहिती नसेल की, हिंसाचाराचा, अत्याचाराचा सामना तर बांगलादेशी हिंदू करतातच; शिवाय त्यांना शिक्षण, आरोग्य, आर्थिक संधी या सर्व विषयांत भेदभावांचाही सामना करावा लागतो. हिंदूंची मालमत्ता बळकावणे हा प्रकार तर तेथे सर्रास होतो. तिथल्या हिंदू भगिनींचे अपहरण, धर्मांतर, बलात्काराच्या करुण कथांनी फुरोगाम्यांचे डोळे कधी पाणावले नाहीत आणि तिथल्या हिंदूंच्या चिमुकल्या मुलाबाळांच्या किंकाळ्यांनी त्यांच्या हृदयाला कधी पाझर फोडला नाही. तरीही ते मानवतावादी...! आणि हिंदूंच्या हक्काचा विषय मांडणारे सगळे जातीयवादी...! या अशा उरफाट्या स्थितीत केवळ हिंदूंचे ऐक्य हा एकमेव मार्ग आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विचार केला तर भारत हा जगातील सर्वांत मोठी बाजारपेठ आहे आणि भारतीय हिंदू हा जगातील सर्वांत मोठा ग्राहक आहे. खरे तर व्यापार-उदिमात धर्म आणू नये. पण, बांगलादेश ऐकतच नसेल तर बांगलादेशातून येणारा किंवा बांगलादेशात उत्पादित होणारा कोणताही माल आम्ही विकत घेणार नाही, अशी भूमिका घेण्यापर्यंत हिंदू समाजाला जावे लागेल. कारण बांगलादेशातील हिंदूंच्या छळाच्या विरोधात आवाज उठवणे हे भारतीय हिंदूंचे नैतिक कर्तव्य आहे. ऐतिहासिकदृष्ट्या भारत हा जगाच्या इतर भागांत छळल्या जात असलेल्या हिंदूंसाठी आश्रयस्थान आहे. अफगाणिस्तानमधून येणारे हिंदू असोत किंवा श्रीलंकेतून आलेले तामिळ बांधव असोत, साऱ्यांनाच भारत हे हक्काचे ठिकाण वाटते. त्याचे साधे कारण असे की, भारत हे हिंदुबहुल आणि शक्तिशाली राष्ट्र आहे. ही शक्ती हिंदूंनी संघटितरीत्या पुन्हा एकदा दाखवून देण्याची वेळ आलेली आहे. भारतातील हिंदू संघटित झाले तर आंतरराष्ट्रीय समुदाय, संयुक्त राष्ट्रे यांच्यावर दबाव निर्माण होईल आणि त्यांना बांगलादेशात हस्तक्षेप करावा लागेल. बांगलादेशने जी काही प्रगती साध्य केली आहे, त्यात भारताचे पाठबळ महत्त्वाचे होते. ते नाहीसे झाले तर बांगलादेश पुन्हा मध्ययुगात परत जाण्यास वेळ लागणार नाही. बांगलादेशातील लाखो मुस्लिमांना भारतात आश्रय मिळतो, पण बांगलादेशातील हिंदूंना त्यांच्या मायभूमीत सुरक्षित राहता येत नाही, हा विरोधाभास आहे आणि तो दूर करणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. बांगलादेश आपल्या देशातील अल्पसंख्यकांचे रक्षण करण्यात अयशस्वी ठरल्यास त्या देशावर आंतरराष्ट्रीय समुदायाच्या पाठबळासह काही निर्बंध लादण्याचा विचार भारत करू शकतो. त्यासाठीही दबाव आणावा लागेल तो भारतीय हिंदूंनाच. एकुणात भारतात जसे हिंदूंचे ऐक्य, संघटन महत्त्वाचे आहे, तसे ते जगात जिथे कुठे हिंदू राहतात, त्यांच्यासाठीही महत्त्वाचे आहे, हे प्रत्येक हिंदूने ओळखले पाहिजे. 'संघ शक्तिः युगे युगे'चा खरा अर्थ हाच आहे.

## चिंतन

# महाराष्ट्रात विकास आणि समृद्धीचा नवा मार्ग

गुरुदत्त दिनकर वाकदेकर

विधानसभा निवडणुकीनंतर भाजपाच्या नेतृत्वाखालील महाआघाडीला बहुमत मिळाले असले, तरी मुख्यमंत्री निवडण्यासाठी तब्बल १३ दिवस लागले. अखेर महाराष्ट्रावर नियंत्रण ठेवण्यात भाजपाला यश आले, मुख्यमंत्रिपद भाजपाच्या खात्यात आले आणि माजी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री झाले. महायुतीने त्यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड केली आहे. मित्रपक्ष आणि हंगामी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राजकीय कुरबुरी महायुतीमध्ये अडसर ठरल्या होत्या. २०१९ ते २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणात बरेच पाणी वाहून गेले आहे. गेल्या निवडणुकीतही भाजपा आणि शिवसेनेला बहुमत मिळाले होते; मात्र उद्धव ठाकरेंच्या मुख्यमंत्रिपदाच्या आग्रहामुळे त्यावेळी भाजपाला सरकार स्थापन करता आले नाही, तर उद्धव ठाकरे यांनी शरद पवारांसोबत महाविकास आघाडीचे सरकार स्थापन केले. राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या पाठिंब्यामुळे ते स्वतः मुख्यमंत्री झाले. हे सरकार अडीच वर्षे टिकले, त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत बंड केले, शिवसेनेत फूट पडली, त्यामुळे उद्धव ठाकरे यांचे सरकार अल्पमतात आले आणि त्यांना पायउतार व्हावे लागले. महाविकास आघाडीचे सरकार गेले, शिंदेंच्या शिवसेनेने भाजपासोबत युती केली. भाजपाच्या पाठिंब्याने शिंदे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. भाजपा आणि शिंदे यांच्या शिवसेनेच्या युतीत सिंचन घोटाळ्याचे आरोप असलेले राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी राष्ट्रवादीमध्ये बंड करून आपल्या समर्थक आमदारांसह शिंदे सरकारला साथ दिली.

यंदाच्या निवडणुकीत भाजपा, शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसची महायुती, तर उद्धव ठाकरे यांचा गट, शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसची महाविकास आघाडी निवडणुकीच्या रिंगणात उतरली होती. लोकसभा निवडणुकीत मविआने चांगली कामगिरी केल्याने या निवडणुकीत त्यांचा वरचष्मा असल्याचे मानले जात होते; मात्र विधानसभा निवडणुकीत महायुतीने नेत्रदीपक विजयाची नोंद केली. २८८ जागांच्या विधानसभेत महायुतीने २३० जागा तर भाजपाने १३२ जागा जिंकल्या आहेत. शिवसेना आणि राष्ट्रवादीलाही महायुतीत मोठा फायदा झाला. काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील निवडणुकीची लढाई भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातच रंगणार असे वाटत होते; मात्र आता राजकीयदृष्ट्या पक्ष अधिकच दुभंगले आहेत.

आता नव्या सरकारचे प्रमुख म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर महायुतीची आश्वासने पूर्ण करण्याचे मोठे आव्हान असणार आहे. एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासारखे चाणाक्ष नेतेही त्यांच्यासोबत आहेत. शिंदे यांच्या महत्त्वाकांक्षेमुळेच भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुतीला सरकार स्थापन करण्यासाठी इतका वेळ लागला. यावेळी भाजपा बलाढ्य असला, तरी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यावर राजकीय दबाव अधिक असेल. मुंबई ही आर्थिक राजधानीही आहे आणि महाराष्ट्रात पाण्याचे संकट ही मोठी समस्या आहे, मराठा आरक्षणाचा प्रश्न आहे, सिंचन घोटाळ्यासारखे प्रश्नही आहेत, अशा परिस्थितीत भाजपाच्या नेतृत्वाखालील नव्या महायुती सरकारला महाराष्ट्र हातात घेणे सोपे जाणार नाही. विकासाच्या पुढील टप्प्यावर भाजपाही राज्याची ताकद बनून आपला जनाधार वाढविण्याच्या प्रयत्नात आहे, त्यात मित्रपक्षांशी समन्वय साधून चालणे म्हणजे काट्याच्या टोकावर चालण्यासारखे होईल. हरयाणापाठोपाठ महाराष्ट्रातील विजयाने भाजपाचा लोकसभेतील गमावलेला आत्मविश्वास परतला आहे. त्याचवेळी काँग्रेससाठी राष्ट्रीय चिंतनाची वेळ आली आहे.

महाराष्ट्राच्या निवडणुकीच्या निकालानंतर, राज्याच्या भविष्याच्या दिशेने विचार करणे महत्त्वाचे आहे. महाराष्ट्राच्या विकासाच्या वाटा दाखविण्यासाठी राजकीय नेतृत्वाने काही महत्त्वाची पावले उचलली पाहिजेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी आणि कृषिक्षेत्राचे नवसर्जन करण्यासाठी ठोस पावले उचलली पाहिजेत. यासाठी पाण्याचे नियोजन, कर्जमाफी आणि शेतकऱ्यांना मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. आरोग्य व्यवस्थेचा विकास करणे आवश्यक आहे. यासाठी ग्रामीण आरोग्य केंद्रे, सरकारी रुग्णालये आणि डायलिसिस, सीटी स्कॅन, एमआरआय या सेवा सरकारी रुग्णालयांमध्ये उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र अजूनही गुंतवणूक योग्य आहे. गुंतवणुकीच्या स्पर्धेमध्ये आहे, असे चित्र नव्याने निर्माण करण्याची जबाबदारी फडणवीस सरकारची आहे. कर्नाटक, आंध्र किंवा तामिळनाडू आदी राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र मागे पडला असल्याचे चित्र निर्माण करण्यात आले आहे, हे किती खरे किंवा खोटे या वादात न पडता ते बदलण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. कारण सध्या 'आभास हेच वास्तव' असे समजण्याचा काळ आहे. हे चित्र बदलणे हे खरं तर डोंगराएवढे आव्हान फडणवीस सरकारला पेलावे लागणार आहे. देशात महाराष्ट्राचे चित्र नव्याने उभे करावे लागणार आहे.

भ्रष्टाचाराविरुद्ध लढा देणे आवश्यक आहे. यासाठी पारदर्शकता, जबाबदारी आणि न्याय या गोष्टींचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने विचार करणे आवश्यक आहे. यासाठी जात, पात, धर्म, प्रदेश, भाषावाद आदी सर्व प्रकारची विषमता आणि इतिहासातील अर्थहीन लढाया यांच्या पलीकडे जाऊन महाराष्ट्राच्या सर्वांगीण ऐहिक उत्कर्षाच्या पण त्याचवेळी निसर्गस्नेही चिरंजीव विकासाच्या वाटा दाखविणाऱ्या राजकीय नेतृत्वाच्या प्रतीक्षेत महाराष्ट्र आज उभा आहे. महाराष्ट्राच्या नव्या दिशेचा मार्ग आता स्पष्ट आहे. विकास आणि समृद्धीचा नवा मार्ग महाराष्ट्राच्या भविष्याची किल्ली आहे. यासाठी एकत्र येऊन, एकमेकांच्या मदतीने आणि एकमेकांच्या विश्वासाने काम करणे आवश्यक आहे.

९९८७७४६७७६

## वेध

विजय निचकवडे

# 'भाऊ... चलताय् का मारकडवाडी!'

सध्या दोनच ठिकाणी प्रचंड गर्दी दिसते आहे, एक तर सिनेमागृहात पुष्पा-२ पाहण्यासाठी आणि दुसरे म्हणजे सोलापूर जिल्ह्यातल्या मारकडवाडीत! खरं तर या दोन्ही ठिकाणी जाऊन काय पदरी पाडून घेतले जाते, माहीत नाही. पण चर्चा या दोघांचीच आहे. त्यातही मारकडवाडी तर सध्या राजकीय पर्यटनाचे ठिकाणच झाले आहे. मारकडवाडीने ईव्हीएमलाही विशेष महत्त्व मिळवून दिले. पण खरंच सोयरीक झाली, लग्न झालं आणि संसार सुरू झाल्यावर आता नवऱ्या मुलात दोष काढून पुन्हा नव्या पद्धतीने संसार थाटण्याचा हा खटाटोप राजकारण्यांना कामेच शिल्लक राहिली नसल्याचे सांगणारे आहे. निवडणुका होईपर्यंत लोकशाहीवर प्रचंड विश्वास दाखविणाऱ्यांचा असा काही विश्वास लोकशाही व्यवस्थेवरून उडून जातो की, मग जनमतही बनावट वाटायला लागते. महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या जे सुरू आहे, ते यापेक्षा वेगळे नाही. विधानसभेचे निकाल आले आणि बिचारी ईव्हीएम बदनाम झाली. लोकसभा निवडणुकीत तिनेच त्यांना गुलाल उधळण्याची संधी दिली होती. मात्र आज तीच त्यांच्या लेखी वाईट झाली. रडगाणे सुरू झाले आणि ईव्हीएममध्ये गडबडी केल्याच्या वायफळ चर्चा जोर धरू लागल्या. या निकालाने विरोधी पक्षाला तसेही काही काम शिल्लक ठेवले नव्हते, म्हणूनच कदाचित या मुद्याला घेऊन पराभवाचे दुःख कमी करण्याचा सुरू झालेला आटापिटा मारकडवाडीत जाऊन पोहोचला आणि आज हे गाव जगाच्या नकाशावर चर्चेत आले. केवळ गावच नाही तर ईव्हीएम यंत्रालाही सुगीचे दिवस आले आहेत. म्हणूनच तर यंत्राच्या समर्थनार्थ असलेली मंडळी यंत्राच्या प्रतिकृती स्वागत करताना नेत्यांना भेट देऊ लागली. अवघ्या ३२४८ घरांचे गाव राजकीय पर्यटनाचा अड्डा झाले. विरोधकांचा आक्षेप यावर की, या गावातील अधिकाधिक मते भाजपाच्या उमेदवाराला पडलीच का? भाऊ आता, मतं पडली तरी तो उमेदवार पराभूत झाला. तुमचा निवडून आला ना...मग जिवाचा आटापिटा करून नाहकच वातावरण तयार करण्याची गरज काय? पण राज्यभरातील पराभवाचे खापर ईव्हीएमवर फोडण्यासाठी जे केंद्र हवे होते, ते मारकडवाडीच्या निमित्ताने विरोधकांना मिळाले आणि राजकीय पर्यटन चांगलेच बहरले. आधी बॅलेट पेपरवर प्रतीकात्मक मतदान घेण्याचा घाट घातला गेला. प्रशासनाने तो हाणून पाडल्याने ईव्हीएमच्या नावाने बोंबा मारणाऱ्यांना आणखीच जोर चढला.

आमदार म्हणून शपथ घेण्याऐवजी सभागृहाबाहेर पडून आमदारांनी ईव्हीएमचे रडगाणे गातं तेथेही मारकडवाडी आणली. मग गावात शरद काका गेले, उद्धवजी गेले, ईव्हीएममुळे निवडून आले असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ गेले. म्हणे, लवकरच आता राहुलजी पण तेथे जाणार आहे. खरंच या विषयाला घेऊन एवढा अकांततांडव करण्याची गरज आहे का? विरोधकांनी विषय वाढविला अन् सत्तेतील आमदारही तेथे पोहोचले.

आज सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस विधानसभा मतदारसंघातील मारकडवाडी हे गाव घराघरापर्यंत पोहोचले. राजकीय नेत्यांसाठी ते सध्या पर्यटनाचे केंद्र झाले आहे. तेथे जाऊन जोराजोरात भाषण ठोकायचे आणि परत यायचे. एका गावात दोन राजकीय पक्षांचे गट असतात, हे सर्वश्रुत आहे. त्यामुळे आपसूकच नेत्यांच्या येण्याने या गटांना उभारी मिळून गावातील वातावरण नाहक ताणले जाते, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. गाव लहान असले, तरी गावातील साक्षरतेचे प्रमाण ७२ टक्के एवढे आहे. त्यामुळे चांगलं-वाईट, चूक-बरोबर याचे मोजमाप करण्याची क्षमता आणि विचारपूर्वक निर्णय घेण्याची जाण गावातील लोकांना नक्कीच असेल. अशावेळी पडलेल्या मतदानावरून राजकारण करणे आणि लोकांच्या मतांवर शंका घेणे कितपत सयुक्तिक आहे, याचा विचार विरोध करणाऱ्यांनीच करावा. हातात संविधान घेऊन शपथ घेणारे आम्हीच संविधानाचे खरे पाईक म्हणून मिरवीत असतील आणि संवैधानिक व्यवस्थेने दिलेला कौल मान्य करण्याची समज त्यांच्यात नसेल तर लोकशाहीच्या गोष्टी सांगण्याचा अधिकार त्यांना आहे का? याचा विचार व्हायलाच हवा. ज्या ईव्हीएमने लोकसभेत तुम्हाला मोठे यश दिले; ती जर आता खराब झाली, असे असेल तर मात्र विरोधकांकडील मुद्दे संपले, असेच म्हणावे लागेल.

आज दारुण झालेला पराभव आणि त्यानंतर आलेले रिकामपण खात असल्यानेच मारकडवाडीला राजकीय संघर्षाचे केंद्र बनवून राजकीय पर्यटनाचे नवे दालन उघडून देणाऱ्या काका-भाऊंना ते किती तारून नेते, हे सांगणे कठीण आहे. पण एक नक्की, आता कुणाला फिरायला जायचे असेल तर 'भाऊ... चलताय् का मारकडवाडीला!' असे म्हणायला हरकत नाही.

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# श्रीगुरुचरित्र पारायण समज-गैरसमज!

प्रा. दिलीप जोशी

'श्री गुरुचरित्र' हा प्रासादिक ग्रंथ असून या ग्रंथाला दत्तसंप्रदायात पाचवा वेद म्हणून मान्यता आहे. हा ग्रंथ म्हणजे कामधेनू किंवा कल्पवृक्ष असल्याची अनुभूती अनेकांना येते.

*तुका म्हणे आम्ही, जी जी इच्छा करू ।*
*ते ते कल्पतरू, पुरविती ॥*

हाच बहुतेकांचा अनुभव आहे. गुरुचरित्र नित्य पठन अथवा श्रवण करणाऱ्याला वर्षभर अंथरुणावर पडल्या पडल्या झोप लागते आणि ताटात येईल ते गिळले जाते. हेच तर खरे सुख आहे. आपल्या जीवनात परमशांती आणि परमानंद आणण्याचे सामर्थ्य श्रीगुरुचरित्र पारायणात आहे. सध्या सर्वत्र गुरुचरित्र पारायण सप्ताह सुरू आहे. हे पारायण करताना व्रतस्थ राहण्याचे संकेत पूर्वापार आहेत. व्रतस्थ म्हणजे साधनेचे सतत स्मरण राहावे म्हणून काही नियम आपण स्वतःहून पाळणे होय. याबाबत मूळ गुरुचरित्रात उल्लेख नसला, तरी अवतरणिकेत काही नियम उद्धृत केले आहेत. पण त्यांचा फारसा विचार न करता गुरुचरित्र पारायणाबाबत अनेक मनघडंत गैरसमज पसरविले गेलेले आहेत. म्हणजे हे पारायण करताना नियम फार कडक आहेत. जराही चूक झाली तर उलटे होते. माणूस मनोरुग्ण बनतो, पागल होतो वगैरे वगैरे. या ग्रंथात संस्कृत अध्याय आहेत, कानडी भाषा आहे हाही अनेकांचा गैरसमज. थोडक्यात श्रीगुरुचरित्राच्या वाटीच जाऊ नका, असा अनेकांचा पक्का गैरसमज आहे. या ग्रंथात संस्कृत श्लोक किंवा कानडी काव्य आहे हे खरे आहे, पण ते अगदी थोडे आहेत. पण ग्रंथ न वाचताच लोक बाऊ करतात. त्यामुळे कित्येक जण इच्छा असूनही नको रे बाप्पा म्हणून या ग्रंथाकडे बघणेही टाळतात. हे म्हणजे-

*ग्रासा एका अन्नासाठी । अंधु धावताहे पाठी ॥*
*आढळला चिंतामणी । पाया लोटे ॥*

संसाराच्या भीतीपायी रस्त्यात दिसणारा चिंतामणी पायाने लोटून देण्याचा प्रकार होय. काळानुरूप नियमात शिथिलता ही आपल्या संस्कृतीची विशेषता आहे. स्मृती त्यातूनच निर्माण झाल्या आहेत.

**गुरुचरित्र पारायणाचे नियम**

पारायण एक दिवसाचे, तीन दिवसांचे आणि सप्ताह करता येतो, पण त्यातल्या त्यात सात दिवसीय पारायण उत्तम आहे. या सात दिवसांत अवतरणिकेत फक्त पाच नियम सांगितले आहेत.

१) सतत अंतर्बाह्य शुचिर्भूत असावे.

२) भूमिशय्या म्हणजे झोपण्यासाठी शक्यतो पलंग किंवा गादी टाळून जमिनीवर घोंगडीवर झोपावे.



३) पारायण करताना रोज एकच स्थान असावे.

४) पारायण करताना इतराशी बोलू नये.

५) कामादी नियम पाळावेत.

केवळ हेच नियम ग्रंथात आहेत. काही नियम विद्वानांनी घातले ते पाळण्याचा संकेत आहे, पण त्यांचा उल्लेख ग्रंथात नाही. उदा.

१) हविषान्न म्हणजे उपवास साहित्य किंवा दुधाची दशमी सेवन करावी.

२) शक्यतो अनवाणी असावे.

३) शक्यतो सीमोल्लंघन टाळावे.

असे काही ढोबळ श्रुतनियम आहेत. यात बहुतेक नियमांचे पालन करता येते, पण समजा काही चुकलेच तर ती गुरुमाउली आहे. आई कधी आपल्या मुलांवर कोपते का?

*कुपुत्रो जायते क्वचिदपी, कुमाता कदापि न भवती ।*

आई मायेचा सागर असतो. आपल्या संस्कृतीत स्थळकाळानुरूप नियमासाठीच तर स्मृती आहेत. नियम हे कायम सावधान आणि अवधान राहावे म्हणून असतात. त्यामुळे यातील काही नियमांत आवश्यकतेनुसार शिथिलता करता येईल. उदा. जर एखाद्याला मधुमेह असेल तर ती व्यक्ती उपाशी किंवा अनवाणी राहू शकणार नाही. मग त्याने दुधाची दशमी किंवा रबरी पादत्राणे वापरावे. पूर्वी साधने नसल्याने सीमा ओलांडू नये हा नियम होता. आता साधने आहेत. त्यामुळे नोकरी-व्यवसायासाठी बाहेर जाणे आवश्यक असेल तर जायला हरकत नाही. वेळेवर पोहोचणे महत्त्वाचे. इतर नियम तर सहज पाळणे शक्य आहे. काही लोक विनाकारण भीती घालतात आणि काही लोक बाऊ करतात. उलट मोठ्या उत्साहात, ऊर्जेने श्रीगुरुचरित्राचे पारायण केले पाहिजे. काही चुकत नाही हा दृढविश्वास असावा. समजा चुकले तर गुरुमाउली न्यून ते पुरते करतील.

*मूर्खा वदति विष्णाय, बुधा वदति विष्णवे ।*
*नमः इत्येव अर्थंच, द्वयोरपि समं फलं ॥*

ज्याला कळत नाही तो 'विष्णाय नमः' म्हणतो माहीतगार 'विष्णवे नमः' म्हणतो. देव मात्र दोघांची अर्थ समजून घेतो आणि समान फळ देतो.

*जैसा स्वभावो मायबापाचा ।*
*अपत्य बोले जरी, बोबडी वाचा ।*
*तरी अधिकची तयाचा । संतोष आथी ॥*

लेकरू बोबडे जरी बोलते तरी मायबापाला आनंदच आहे. हां! लेकरानेही कायम बोबडे बोलू नये. हळूहळू स्पष्ट बोलण्याचा प्रयत्न करावा. राहिला प्रश्न 'संस्कृत गुरुगीता' आणि सायंदेवाने केलेली 'कानडी गुरुस्तुती'चा. बिनधास्त पण प्रामाणिक वाचा. जसे वाचता येईल तसे. गुरुमहाराज बरोबर समजून घेतात. एखाद्या आईचा बोबडा मुलगा 'आई मला काकरी दे' म्हणतो आणि मोठा मुलगा 'भाकरी दे' म्हणतो. आई दोघांचाही अर्थ समजून घेते आणि दोघांनाही भाकरी देते. म्हणून कुठलाही तणाव घेऊ नका. आपण अमृत प्राशनाची संधी गमावतो. माउली ज्ञानेश्वरांनी रागावून आपल्याला निदैवी आणि कर्मदरिद्री म्हटले.

*ना तरी निदैवाच्या परिवरी ।*
*लोह्या रुतलीया सहस्रवरी ।*
*तेथ बैसोनी उपवासु करी ।*
*दरिद्रिये जेवी ।*

खाली सोन्याचे हांडे असून आपण मात्र त्यावर पोते टाकून भीक मागतो. आपल्यासारखे कर्मदरिद्री आणि निदैवी आपणच.

गुरुचरित्र कामधेनू आहे. पाहिजे ते देण्याचे सामर्थ्य त्यात आहे. आपल्याला पाळता येतील ते नियम पाळा. जे शक्य नाही ते देवाला सांगा. ती गुरुमाउली कृपाळू आहे, मायाळू, चंद्राहून शीतल आणि पाण्याहुनी पातळ आहे. अनन्यभावाने शरण जा. आर्तभावाने साधना करा. भगवान दत्तात्रेय, श्रीपाद श्रीवल्लभ माउली, नृसिंह सरस्वती स्वामी महाराज कृपेचा वर्षाव करतील. आपली भीती घालविण्यासाठीच तर ते अभय कराने 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे' म्हणतात. तेव्हा श्रीगुरुचरित्राबाबत अजिबात भीती न बाळगता हे ब्रह्मरसाचं पारण करावं! अजून एक; समजा पारायण जमत नसेल तर गुरुचरित्र श्रवण करा. गुरुचरित्रात प्रमाण आहे-

*निःसंदेह सात दिनी, ऐकता बंधन तुटे जाणा ॥*

आपल्या हृदयाचा आतील आवाज ऐका, हृदयाच्या गर्भितार्थाने प्रार्थना करा. तो आहे सोबत हा विश्वास ठेवा. श्रीगुरुदेव दत्त.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### श्रीदत्त उपासना!

येत्या १४ डिसेंबरला दत्त जयंती आहे. मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी मृग नक्षत्रावर सायंकाळी दत्ताचा जन्म झाला, म्हणून या दिवशी दत्त जयंती साजरी केली जाते. महाराष्ट्रात औदुंबर, नरसोबाची वाडी, गाणगापूर इत्यादी दत्तक्षेत्रांत या उत्सवाला विशेष महत्त्व आहे. तामिळनाडूमध्येही दत्त जयंतीची प्रथा आहे. या दिवशी काही ठिकाणी दत्तयाग केला जातो. दत्त जयंतीच्या पूर्वी सात दिवस गुरुचरित्राचे पारायण केले जाते. यालाच गुरुचरित्र सप्ताह म्हणतात. दत्ता जयंतीच्या दिवशी दत्ततत्त्व हे पृथ्वीतलावर नेहमीच्या तुलनेत १००० पटीने कार्यरत असते. या दिवशी दत्ताची मनोभावे पूजा आणि नामजप केल्याने भाविकांना दत्ततत्त्वाचा अधिकाधिक लाभ मिळतो. श्री दत्त ही पूर्वजांना पुढील गती देणारी देवता आहे. तेव्हा 'श्री गुरुदेव दत्त' हा नामजप दत्त सप्ताहात आणि इतर दिवशी देखील नियमित केल्याने पूर्वजांच्या त्रासांपासून रक्षण होते. म्हणून हा नामजप जास्तीत जास्त करण्याचा प्रयत्न करायला हवा.

सोबतच दत्तगुरूंची कृपा संपादन करण्यासाठी त्यांच्या चरणी आर्त भावाने प्रार्थना करू या, हे दत्तात्रेया, भूलोकात अडकलेल्या आमच्या पूर्वजांना पुढची गती दे. पूर्वजांच्या त्रासांपासून तू आमचे रक्षण कर. तुझे संरक्षक-कवच आमच्याभोवती सदोदित असू दे. तू जसे चोवीस गुणगुरू केलेस, तसे सर्वांमधील चांगले गुण घेण्याची वृत्ती आमच्यातही निर्माण होऊ दे.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

### कठोर निर्णय अपेक्षित!

सध्या बांगलादेशमध्ये हिंदूंवर होणारे अत्याचार आता जणू काही रोजचेच झाले आहे. कारण असा एकही दिवस जात नाही ज्या दिवशी प्रसारमाध्यमांवर हिंदूंच्या अत्याचाराची बातमी नसेल. बांगलादेशातील हिंदूंची विदारक परिस्थिती पाहून मन विषण्ण झाल्याशिवाय राहत नाही. शोधून शोधून तेथील हिंदू धर्मीयांना लक्ष्य केले जात आहे आणि त्यांच्यावर हल्ले केले जात आहेत, स्त्रियांवर अत्याचार केले जात आहेत. यातून हिंदूंचे देव आणि मंदिरे देखील सुटलेली नाहीत. मंदिरे आणि त्यातील मूर्तींची तोडफोड, त्यांची विटंबना ही नित्याचीच बाब झाली आहे. हिंदूंना त्यांचे सण आणि उत्सव साजरे करण्याची सोयच नाही. एकंदरीतच काय तर तेथील हिंदु जीव मुठीत घेऊन जगत आहेत. पूर्वी २० ते २५ टक्के असणारी हिंदूंची संख्या आता २ टक्क्यांवर आलेली आहे आणि असेच जर सुरू राहिले तर तेथून हिंदू नामशेष होण्यास वेळ लागणार नाही. या विरोधात तेथील हिंदूंनी आंदोलन केल्यास त्यावर देखील हे धर्मांध तुटून पडतात आणि तेथील सरकार काय करत आहे, तर हे सगळं शांतपणे बघत बसले आहे. मुळात सरकार नावाची गोष्टच तिथे नाही, कारण या सगळ्यांवर सरकारचाच वरदहस्त आहे, मग त्यांच्याकडून न्यायाची अपेक्षा तरी काय करणार? उलटपक्षी हिंदूंनाच तेथे तुरुंगात टाकले जात आहे. आणि तेथील न्यायालये देखील याला अपवाद नाहीत. इस्कॉनचे चिन्मय प्रभू दास यांना विनाकारण झालेली अटक आणि त्यांच्यावर सूडबुद्धीने चालवत असलेला खटला हे याचे ताजे उदाहरण आहे.

एवढे सगळे असूनही एरवी उठसूठ मानवाधिकाराच्या नावाने ओरड करणारी आणि भारताच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ करणारी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संस्था मात्र मूग गिळून गप्प बसलेली आहे. जोपर्यंत बांगलादेशमधील हिंदूंवर होणारे अत्याचार थांबत नाहीत तोपर्यंत त्या त्यांच्याशी कुठलाही व्यवहार करू नये तेव्हाच हा देश वठणीवर येईल.

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

### निसर्गाचे संवर्धन करण्याची गरज

राज्यात वातावरण बदलाचा आणि प्रदूषणाचा विळखा अधिकाधिक घट्ट होत चालल्याचा निष्कर्ष अनेक सर्वेक्षणे नोंदवतात. माणसाचे निसर्गावरचे आक्रमण नव्हे अतिक्रमण हे त्याचे एक मुख्य कारण मानले जाते. याचे गंभीर परिणाम माणसांना मोठ्या प्रमाणात भोगावे लागतात. समाज माध्यमांमुळे याविषयीची माहिती देखील अनेकांना असते. तथापि निसर्ग संवर्धनात सामान्य माणसेदेखील मोलाची भूमिका बजावू शकतात याची जाणीव सामान्य पातळीवर अभावाने आढळते. दैनंदिन आयुष्यातील सवयींचे अवलोकन माणसांनी केले तर त्यातील अनेक मार्ग त्यांच्याही लक्षात येऊ शकतील. पाणी हे जीवन आहे. ते अमूल्य आहे, पण त्याचा साठा मर्यादित आहे हे प्रत्येक जण जाणून आहेत. तरीही पाण्याची वारेमाप उधळपट्टी खुलेआम आढळते. पावसाचे पाणी अडवून ते जिरवण्याचे आवाहन करणारे फलक माणसे वाचतात. तथापि वैयक्तिक किंवा गृहनिर्माण प्रकल्पातील कूपनलिकांचे पुनर्भरण किती जण करतात. प्लॅस्टिकच्या भस्मासुर आता माणसावरच उलटण्याचा धोका वारंवार व्यक्त केला जातो. एकदा वापरून फेकून दिला जाणाऱ्या प्लॅस्टिकच्या वापरावर सरकार अनेकदा बंदी घालतात. पण त्याचा फज्जा उडवला जातो. अशा प्लॅस्टिकच्या वापराचा मोह माणसे टाळू शकत नाहीत. कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे, पाणी जपून वापरणे आणि पाण्याची बचत करणे, एकदा वापरून फेकून दिले जाणारे प्लॅस्टिक न वापरणे, त्याऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करणे, नदीत निर्माल्य न टाकणे अशा अनेक माणसे अंगी बाणवू शकतात.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

महावितरण
## ई निविदा सूचना

अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादित वितरण कंपनी मर्यादित, मंडल कार्यालय सोलापूर यांचेद्वारे बाहयस्त्रोत कंत्राटी कुशल/अर्धकुशल /अकुशल कामगार नेमण्याकरिता नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा म.रा.वि.वि.कं.मर्याच्या http:/works.mahadiscom.in/e-tender/etender या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.सदरच्या निविदा केंद्रीयकृत ग्राहक सुविधा केंद्र सोलापूर व दैंनदिन सनियंत्रण कक्ष मंडल कार्यालय सोलापुर यांचेकरीता निविदा क्र.टी-०१/२०२४-२५ अन्वये १ वर्षाच्या कालावधीकरिता मागविण्यात येत आहेत. सदर निविदा उपरोक्त संकेतस्थळावर विक्री करिता दि.११.१२.२०२४ ते २७.१२.२०२४ या कालावधीत उपलब्ध राहतील. तसेच सदरच्या निविदा भरण्याची अंतिम तारीख दि.२७.१२.२०२४ रोजी १४.०० पर्यत राहील.
टीप : कोणतीही निविदा कारण न दाखवता नाकारण्याचा हक्क खालील सही करणार यांनी राखुन ठेवलेला आहे.निविदा फी ऑन लाईन भरावयाची आहे.

अधीक्षक अभियंता (सोमंका)
मंडल कार्यालय सोलापूर
PRO/BMTZ/143/2024-25

महावितरण
## ई निविदा सूचना

महावितरण, ग्रामीण विभाग, सोलापूर अंतर्गत खाली नमूद कामा करिता महावितरणच्या नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदारांकडून ई निविदा मागविण्यात येत आहे. निविदा विक्री दि.०६.१२.२०२४ ते दि. १४.१२.२०२४ पर्यंत, निविदा सादर करण्याची अंतिम दि. १५.१२.२०२४ दु. ०२.०० वाजे पर्यंत. इतर सर्व माहिती https://etender.mahadiscom.in/eatApp या संकेत स्थळावर दि.१३.१२.२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. सदरील निविदा स्वीकारणे, नाकारणे अथवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीधारकाने राखून ठेवलेले आहेत.

| अ. क्र. | कामाचे स्वरूप | निविदा क्र. | निविदा रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | पी सी – ० ग्राहकांचे मीटर वाचन व देयक वाटप. | EE/SUR/R/ T-14/2024-25 | रु १० लाख |

PRO/BMTZ/146/2024-25
कार्यकारी अभियंता,
महावितरण, ग्रामीण विभाग, सोलापूर.

## नावात बदल

माझे जुने नाव **बसम्मा गुंडप्पा बिराजदार** असे होते. ते बदलून नविन नाव **साधना नंदकुमार धाये** असे झाले आहे.या दोन्ही नावाचा व्यक्ती एकच असून तरी मला माझ्या नविन नावाने ओळखण्यात यावे.

पत्ता : २२, रामराज्य नगर, शेळगी, सोलापूर
**ॲफि. नं. (24531901 11268500644096)**
**दि. 04/12/2024**

# हौदातील विषारी पाणी पिऊन ७ जर्सी गायींचा मृत्यू; हिंगणी (आर) येथील घटना

**सोलापूर. दि. १० डिसेंबर -**

बार्शी तालुक्यातील हिंगणी (आर) येथे हौदातील विषारी पाणी पिऊन ७ जर्सी गायींचा मृत्यू झाला. याबाबत सचिन जीवन देशमुख (वय ३६, रा. धामणगाव, सध्या रा. हिंगणी (आर), ता. बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वैराग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सचिन देशमुख यांचे चुलत भाऊ पृथ्वीराज मोहन देशमुख यांच्या घरासमोरील जनावरांना पाणी पाजण्याच्या हौदातील पाण्यात कुणीतरी अज्ञात चोरट्याने कोणते तरी विषारी औषध मिसळले. त्यामुळे हे पाणी पिऊन ६ डिसेंबरच्या पहाटेच्या सुमारास देशमुख यांच्या ६ जर्सी गाय व १ कालवड अशी ४ लाख ३० हजार रुपयांची जनावरे मरण पावली. याबाबत वैराग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार काळेल पुढील तपास करीत आहेत.

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २६०/२०२४**

**१) सुरेश चांगदेव दुसंगे,**
रा. गुळपोळी, ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील एस. एस. ठोंबरे) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत, गुळपोळी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराची आई पद्मिनी चांगदेव दुसंगे, रा. गुळपोळी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १२ जुलै २००८ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची आई पद्मिनी चांगदेव दुसंगे यांचा दिनांक १२ जुलै २००८ रोजी मौजे गुळपोळी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)
सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ३१९/२०२४**

**१) सुधाकर महादेव काळदाते,**
रा. येळंब, ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील जे. एस. घोडके) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचा मुलगा संकेत सुधाकर काळदाते, रा. येळंब, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर या ठिकाणी दिनांक २३ नोव्हेंबर २०१३ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा संकेत सुधाकर काळदाते यांचा दिनांक २३ नोव्हेंबर २०१३ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)
सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ३५८/२०२४**

**१) निजाम फरीद पटेल,**
रा. नागणे प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील संभाजी शि. गलांडे) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी ,**
नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराची आत्या मन्नाबी फत्तु सय्यद, रा. नागणे प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १८ मे १९९८ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची आत्या मन्नाबी फत्तु सय्यद यांचा दिनांक सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार. रा. अमन चौक, बारंगुळे प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १८ मे १९९८ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)
सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर प्रसिद्धीकरण

**क्रि. कि. अर्ज नं. ५३७/२०२३**
पुढील नेमलेली तारीख १८/०१/२०२५

**बार्शी येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे कोर्टात**

**प्रकाश प्रभु देशमुख,** वय ७५ वर्षे, धंदा- शेती,
रा. काळेगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**ग्रामपंचायत, काळेगांव,**
ता. बार्शी, जि. सोलापूर — **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार हा मौजे काळेगांव, ता. बार्शी येथील मूळ रहिवासी असून अर्जदार याची आई वेणूबाई प्रभू देशमुख या तारीख २८/२/१९९४ रोजी मौजे काळेगांव, ता. बर्शी येथील राहते घरी मयत झाली. अर्जदाराने त्याचे आईचे मृत्यूची नोंद रितसर सा.वाला ग्रामपंचायतीचे जन्म मृत्यू रजिस्टरला करावी. परंतु अर्जदार व त्याचे कुटुंबातील व्यक्तीचे अडाणीपणामुळे सदर मृत्यूची नोंद संबंधित सा.वाला ग्रामपंचायतीचे जन्म मृत्यूचे रजिस्टरला केली नाही. परंतु हल्ली अर्जदाराला त्याचे कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता त्याचे सदर मयत आईचे मृत्यूचे दाखल्याची गरज भासलेने अर्जदाराने मागणी केली असता संबंधित अधिकाऱ्यांनी जन्म मृत्यूचे रजिस्टरची तपासणी करुन अर्जदार याची आई वेणूबाई प्रभू देशमुख हिचे मृत्यूची नोंद करण्यात आली नाही असे पत्र देवून कळविले. अर्जदाराची आई काळेगांव, ता. बार्शी येथे मयत झालेने तिचे मृत्यूची सा.वाला ग्रामपंचायतीचे जन्म मृयू रजिस्टरला करणेबाबत त्यांना मे. कोर्टाचे जरुर ते आदेश व्हावेत असे कथन करुन अर्जदारानी हल्लीचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदाराच्या अर्जातील मागणी व विधानासंबंधाने जर कोणाचे काही आक्षेप असतील तर संबंधितांनी हे जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत वा पुढील नेमले तारखेस मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून आपले हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. अन्यथा मुदतीनंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे. तारीख : ११/११/२०२४

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

सही/-
**सहा. अधीक्षक**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

# भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ (१) अनुसार अधिसुचना

**क्र.भूसं/एस आर- ३१/२०२४. उप विभागीय अधिकारी यांचे कार्यालय, मंगळवेढा. दि. २८/११/२०२४.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाची अधिसुचना क्र. एम आय एस-११/२०१४/सी आर- ७७/ए-२, दि. ११/०९/२०१५ (यास यापुढे सदर अधिसुचना असे संबोधले जाईल) भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा वापर करून असे अधिसुचित करण्यात आले आहे की, सदर अधिनियमाच्या कलम ३ (झ. अ) अन्वये सार्वजनिक जमीनीच्या संपादनाबाबत १०,००० हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेपर्यंत भूसंपादनासंबंधात अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियम ाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

ज्याअर्थी, सदर अधिसुचनेन्वये जिल्हाधिकारी सोलापूर, हे समुचित शासन आहेत. त्याअर्थी परिशिष्ट-१ मध्ये नमुद जमीन ही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादीत करण्याची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासु शकते. तसेच सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट-२ मध्ये करण्यात आले आहे. त्याअर्थी सदर कायद्याचे कलम ११ उप कलम (१) अन्वये अधिसुचित करण्यात येते की, सार्वजनिक प्रयोजनासाठी सदर जमीन संपादनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते.

त्याअर्थी, परिशिष्ट-३ मधील भूसंपादनामुळे विस्थापित कुटुंबासाठी प्रस्तावित जमीन संपादनाची माहीती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे. आणि त्याअर्थी परिशिष्ट-४ मध्ये सामाजिक आघात निर्धारणाबाबतची संक्षिप्त माहीती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे. आणि, त्याअर्थी, परिशिष्ट-५ मध्ये सदर कायद्याच्या कलम ४३ उपकलम (१) अन्वये कामकाज पार पाडणा-या प्रशासकाचा तपशिल देण्यात आला आहे.

त्याअर्थी सदर कायद्याच्या कलम ११ उपकलम (४) अन्वये असे जाहीर करण्यात येते की, सदर अधिसुचना जाहीर झाल्याच्या दिनांकापासून सदर कायद्याच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पूर्ण होईल अशा कालावधी पर्यंत कोणतीही व्यक्ती प्राथमिक अधिसुचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमीनीचा कोणताही व्यवहार/हस्तांतरण करणार नाही किंवा अशा जमीनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु, जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसुचित केलेल्या संबधित जमीनीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोट कलमाच्या अंमल बजावणीतून अशा जमीनीच्या मालकास सुट देवू शकेल. परंतु, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे जाणीवपुर्वक उल्लंघन केल्यामुळे त्या व्यक्तीला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतिची जिल्हाधिका-याद्वारे भरपाई करण्यात येणार नाही. सदर कायद्याच्या कलम ११ चे उप कलम ५ व भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ चे कलम १० उप कलम ३ अन्वये जिल्हाधिकारी विहीत करेल त्याप्रमाणे भूमी अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेईल. आणि ज्याअर्थी, सदर कलम ३ उपकलम (ग) अन्वये जिल्हाधिकारी सोलापूर हे समुचित शासन असल्याने उप विभागीय अधिकारी, मंगळवेढा विभाग, मंगळवेढा यांना जिल्हाधिकारी यांची कामे पार पाडण्यासाठी प्राधिकृत केले आहे.

## परिशिष्ट-१
## जमीनीचे वर्णन

**उपसा सिंचन योजना, ता. मंगळवेढा टप्पा क्र. २ अंतर्गत ऊर्ध्वगामी नलिका क्र.२ सा.क्र.२/८५३ ते ५/८३० मी. मौजे लेंडवे चिंचाळे, ता. मंगळवेढा क्र. भूसंपादन / एस आर ३१/२०२४.**

| गावाचे नाव | तालुका | गट नंबर | संपादन क्षेत्र हे. आर | इतर बाबी |
|---|---|---|---|---|
| लेंडवे चिंचाळे | मंगळवेढा | ५२७/१ | ०.०५५३ | |
| | | ५२७/२ | | |
| | | ५२७/३ | | |
| | | ५२८ | ०.००४३ | |
| | | ५२९ | ०.०१५० | |
| | | ५३० | ०.०१२२ | |
| | | ५३१ | ०.०१०१ | |
| | | ५३२ | ०.०१७२ | |
| | | ५३३ | ०.०१६४ | |
| | | ५३८/१ | ०.०६८० | |
| | | ५३८/२ | | |
| | | ५३९ | ०.०२११ | |
| | | ५४० | ०.०१८२ | |
| | | ५४१ | ०.०१२० | |
| | | ५४३ | ०.०१८३ | |
| | | ५६५/१/अ | ०.२२५९ | |
| | | ५६५/१/ब | | |
| | | ५६५/२ | | |
| | | ५६५/३ | | |
| | | ५६५/४ | | |
| | | ५६५/५ | | |
| | | ५६५/६ | | |
| | | ५६४ | ०.०३०३ | |
| | | ५६३ | ०.०१५५ | |
| | | ५६२ | ०.०१५० | |
| | | ५६१ | ०.०१२९ | |

| गावाचे नाव | तालुका | गट नंबर | संपादन क्षेत्र हे. आर | इतर बाबी |
|---|---|---|---|---|
| लेंडवे चिंचाळे | मंगळवेढा | ५५७/१ | ०.०६५६ | |
| | | ५५७/२ | | |
| | | ५५८ | | |
| | | ५५९ | | |
| | | ५६० | | |
| | | ५५६ | ०.०१६८ | |
| | | ५५५ | ०.०१७९ | |
| | | ५५४ | ०.०१६४ | |
| | | ५५३ | ०.०२८८ | |
| | | ५५२ | ०.०३४५ | |
| | | १७४/१ | ०.०४२३ | |
| | | १७४/२ | | |
| | | १७४/३ | | |
| | | १७३ | ०.०४२२ | |
| | | १७२ | ०.०७७४ | |
| | | १७१ | ०.०१४० | |
| | | ११९ | ०.०३६९ | |
| | | १२० | | |
| | | १२१ | | |
| | | १२२ | | |
| | | १२३ | | |
| | | १२४ | | |
| | | १२५/१ | | |
| | | १२५/२ | | |
| | | १२६ | | |
| | | १२७ | | |
| | | १२८ | | |
| | | १२९ | | |
| | | १३० | | |
| | | १३१ | | |
| | | १३२ | | |
| | | १३३ | | |
| | | १३४ | | |
| | | १३५ | | |
| | | १३६ | | |
| | | १३७ | | |
| | | १३८ | | |
| | | १३९ | | |
| | | १४० | | |
| | | १४१ | | |
| | | १४२ | | |
| | | १४३ | | |
| | | १४४ | | |
| | | १४५ | | |
| | | १४६ | | |
| | | १४७ | | |
| | | १४८ | | |
| | | १४९ | | |
| | | १५० | | |
| | | १५१ | | |
| | | १५२ | | |
| | | १५३ | | |
| | | १५४ | | |
| | | १५५ | | |
| | | १५६ | | |
| | | १५७ | | |
| | | १५८ | | |
| | | १५९ | | |
| | | १६० | | |
| | | १६१ | | |
| | | १६२ | | |
| | | १६३ | | |
| | | १६४ | | |
| | | १६५ | | |
| | | १६६ | | |
| | | १६७ | | |
| | | १६८ | | |
| | | १६९ | | |
| | | १७० | | |
| | | ७०३ | | |

| गावाचे नाव | तालुका | गट नंबर | संपादन क्षेत्र हे. आर | इतर बाबी |
|---|---|---|---|---|
| लेंडवे चिंचाळे | मंगळवेढा | ८० | ०.४८०० | |
| | | ८१ | | |
| | | ८२ | | |
| | | ८३ | | |
| | | ८४/१ | | |
| | | ८४/२ | | |
| | | ८५ | | |
| | | ८६/१ | | |
| | | ८६/२ | | |
| | | ८७ | | |
| | | ८८ | | |
| | | ८९ | | |
| | | ९० | | |
| | | ९१ | | |
| | | ९२ | | |
| | | ९३ | | |
| | | ९४ | | |
| | | ९५ | | |
| | | ९६/१ | | |
| | | ९६/२ | | |
| | | ९६/३ | | |
| | | ९६/४ | | |
| | | ९७ | | |
| | | ९८ | | |
| | | ९९ | | |
| | | १००/१ | | |
| | | १००/२ | | |
| | | १०१ | | |
| | | १०२ | | |
| | | १०३/१ | | |
| | | १०३/२ | | |
| | | १०३/३ | | |
| | | १०३/४ | | |
| | | १०३/५ | | |
| | | १०४/१/अ | | |
| | | १०४/२ | | |
| | | १०४/३ | | |
| | | १०४/१/ब | | |
| | | १०४/४ | | |
| | | १०४/६ | | |
| | | १०४/७ | | |
| | | १०४/९ | | |
| | | १०४/१० | | |
| | | १०४/५ | | |
| | | १०४/८ | | |
| | | १०५/१/ब | | |
| | | १०६ | | |
| | | १०७ | | |
| | | १०८ | | |
| | | १०९ | | |
| | | ११० | | |
| | | १११ | | |
| | | ७९ | ०.०६८९ | |
| | | ७०/१ | ०.०२०३ | |
| | | ७०/२ | | |
| | | ६९ | ०.०३९१ | |
| | | ६४ | ०.०२४७ | |
| | | ६३ | ०.०१४८ | |
| | | ६२/१/ब | ०.०२२२ | |
| | | ५७/१ | ०.०३२१ | |
| | | ५७/२ | | |
| | | ५७/३ | | |
| | | ५९ | ०.०२९८ | |
| | | ४६ | ०.०७६५ | |
| | | २० | ०.१७०९ | |
| | | २१ | | |
| | | २२ | | |
| | | २३ | | |
| | | २४/१ | | |
| | | २४/२ | | |

| गावाचे नाव | तालुका | गट नंबर | संपादन क्षेत्र हे. आर | इतर बाबी |
|---|---|---|---|---|
| लेंडवे चिंचाळे | मंगळवेढा | २५ | ०.१७०९ | |
| | | २६ | | |
| | | २७ | | |
| | | २८ | | |
| | | २९ | | |
| | | ३० | | |
| | | ३१ | | |
| | | ३२/१ | | |
| | | ३३ | | |
| | | ३४ | | |
| | | ३५ | | |
| | | ३६ | | |
| | | ३७ | | |
| | | ३८/१ | | |
| | | ३८/२ | | |
| | | ३९ | | |
| | | ४० | | |
| | | ४१ | | |
| | | ४२ | | |
| | | ४३/१ | | |
| | | ४३/२ | | |
| | | ४३/३ | | |
| | | ३१७/१ | ०.१३०२ | |
| | | ३१७/२ | | |
| | | ३१४ | ०.३६७६ | |
| | | ३१६ | | |
| | | ३१३/१/अ | ०.१२०४ | |
| | | ३१३/१/ब | | |
| | | १३१/२/अ | | |
| | | ३१३/२/ब/१ | | |
| | | ३१३/२/ब/२ | | |
| | | ३५०/१ | ०.१८३५ | |
| | | ३५०/२/अ | | |
| | | ३५०/२/ब | | |
| | | **एकूण** | **२.७४४२** | |

## परिशिष्ट-२

| | |
|---|---|
| प्रकल्पाचे नाव | मंगळवेढा उपसा सिंचन योजना, ता. मंगळवेढा |
| प्रकल्पाचे विवरण | टप्पा क्र. २ अंतर्गत ऊर्ध्वगामी नलिका क्र. २ सा.क्र. २/८५३ ते ५/८३० मी. मौजे लेंडवे चिंचाळे. तां. मंगळवेढा. |
| सामाजिक फायदे | उपसा सिंचन (सामाजिक, आर्थिक व इतर फायदे) |

## परिशिष्ट-३

**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारे कारण :-**

बाधीत सर्व जमीन धारक विस्थापित होत नाहीत. त्यामुळे विस्थापन करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

## परिशिष्ट-४

**सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा गोषवारा**

भूमी संपादन पुनर्वसन पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १० (ख) अन्वये महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मंत्रायल, मुंबई यांची अधिसुचना दि. १३ मार्च २०१५ अनुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण २ व ३ यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देण्यात आली आहे.

## परिशिष्ट-५

**प्रशासक नियुक्तीचे विवरण**

| | | |
|---|---|---|
| १ | प्रशासकाचे पदनाम | कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र. ९, मंगळवेढा |
| २ | प्रशासकाचा कार्यालयीन पत्ता | मंगळवेढा-पंढरपूर रोड, उजनी वसाहत मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर |
| ३ | ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली त्याचा तपशिल | महाराष्ट्र सिंचन अधिनियम १९७६ व सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. विवसु-१०१५/प्रक्र-२१८/ इमारत-२, दि. १६/१२/२०१६ |

सदर अधिसुचनेद्वारे ज्या जमीनीची सार्वजनिक प्रयोजनाची आवश्यकता आहे. किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याचे कलम (११) चे उपकलम (१) खाली अधिसुचित करण्यात आले आहे. अशा जमीनीच्या संयुक्त मोजणी नकाशाची प्रत प्रशासकाचे कार्यालयीन निरीक्षणार्थ उपलब्ध आहे. बाधीत जमीनधारक यंना प्रारंभिक अधिसुचनेचा प्रसिध्दीच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा विभाग, मंगळवेढा यांच्या कार्यालयात लेखी स्वरुपात आक्षेप नोंदविता येईल.

**स्थळ : मंगळवेढा**
**दिनांक : २८/११/२०२४**

**सही/-**
**(बी.आर. माळी)**
**सक्षम प्राधिकारी भूसंपादन**
**तथा उपविभागीय अधिकारी**
**मंगळवेढा विभाग, मंगळवेढा**

जिमाका/सो/जाहि/२२३/२०२४-२५

## महत्त्वाचे

### मेस्सी-रोनाल्डोला फीफ प्रो एकादशमध्ये स्थान नाही

**नेदरलॅण्ड्स :** लिओनेल मेस्सी आणि क्रिस्टियानो रोनाल्डो हे महान फुटबॉलपटूं फिफप्रो या जागतिक खेळाडूंच्या संघटनेने सोमवारी जाहीर केलेल्या वर्षातील पुरूषांच्या जागतिक संघात स्थान मिळविण्यात अपयशी ठरले. ३७ वर्षीय मेस्सी एमएलएसमध्ये मियामीकडून खेळतो तर ३९ वर्षीय रोनाल्डो सौदी प्रो लीगमध्ये अल-नासरकडून खेळतो. अंतिम अकरा मतदानासाठी निवडलेल्या २६ खेळाडूंच्या यादीत, मेस्सी आणि रोनाल्डो हे एकमेव खेळाडू होते जे कोणत्याही युरोपियन क्लबशी संबंधित नाहीत.

### क्रीडा मंत्रालय खेळांमध्ये राष्ट्रीय लीग सुरू करणार

**नवी दिल्ली :** देशातील खेळाडूंमध्ये मोठ्या संख्येने असलेल्या कलागुणांना संधी देण्याच्या उद्देशाने क्रीडा मंत्रालय अनेक राष्ट्रीय क्रीडा लीग (एनएसएल) सुरू करण्याची योजना आखत आहे. २०३६ मध्ये ऑलिम्पिक आयोजित करण्याची महत्त्वाकांक्षा असलेल्या देशासाठी हे गेम चेंजर ठरेल, असा मंत्रालयाचा विश्वास आहे. याविषयी एका सूत्राने सांगितले की, अंतिम मुदत अद्याप ठरलेली नसली तरी, नियोजन प्रक्रिया आणि खेळांची ओळख प्रगत टप्प्यात आहे आणि वेळ आल्यावर तपशीलवार माहिती दिली जाईल. सरकार आपल्या महत्त्वाकांक्षी स्पोर्ट्स इंडिया कार्यक्रमांतर्गत एनएसएल सुरू करण्याचा विचार करत असून लीग सुरू करण्यापूर्वी भारतीय क्रीडा प्राधिकरण, लीग (आयोजक) आणि त्या खेळाचे राष्ट्रीय क्रीडा महासंघ (एनएसएफ) यांना एकत्र आणले जाईल. एनएसएफ लाँच झाल्यानंतर, प्रत्येक खेळात एकच लीग असेल, असे सूत्राने सांगितले. हॉकी इंडिया लीग (एचआयएल) आणि प्रो कबड्डी लीग (पीकेएल) सारख्या स्थापित आणि लोकप्रिय लीग ज्यांना सरकारी निधीची आवश्यकता नाही त्यांना स्पर्श केला जाणार नाही, असे एका सूत्राने सांगितले

### खो-खो विश्वचषकापूर्वी प्रशिक्षण शिबिर सुरू

**नवी दिल्ली :** पुढील महिन्यात भारतात होणाऱ्या खो-खो विश्वचषक स्पर्धेसाठी राष्ट्रीय संघाचे सराव शिबिर मंगळवारी जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर सुरू झाले. खो-खो विश्वचषकापूर्वी राष्ट्रीय संघाच्या तयारीत सुधारणा करण्यासाठी जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये प्रशिक्षण शिबिर सुरू झाले आहे, अशी माहिती भारतीय खो-खो महासंघाचे अध्यक्ष सुधांशू मित्तल यांनी आज येथे दिली. या प्रशिक्षण शिबिरात देशभरातून निवडलेल्या ६० मुली आणि ६० मुलांना खो-खो खेळातील बारकावे सांगण्यात येतील. शिबिरातील कामगिरीच्या आधारे खो-खो विश्वचषक स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १५ मुले आणि १५ मुलींचा राष्ट्रीय संघ निवडला जाईल. भारतीय राष्ट्रीय संघाचे मुख्य प्रशिक्षक अश्विनी शर्मा यांच्या देखरेखीखाली महिनाभर खेळाडूंचा फिटनेस, त्यांची चपळता आणि तंत्र यावर लक्ष केले जाईल.

### माजी अध्यक्ष एस. एम. कृष्णा यांच्या निधनाबद्दल शोक

**बंगळुरू :** कर्नाटक राज्य लॉन टेनिस असोसिएशन (केएसएलटीए) ने मंगळवारी त्यांचे माजी अध्यक्ष एस. एम. कृष्णा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. कृष्णा यांनी राज्य संघटनेला जागतिक टेनिस नकाशावर आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती, असे शोकसंदेशात म्हटले आहे. कृष्णा यांचे मंगळवारी पहाटे निवासस्थानी निधन झाले. ते ९२ वर्षांचे होते. कर्नाटकचे मुख्यमंत्री आणि भारताचे परराष्ट्र मंत्री असण्यासोबतच ते महाराष्ट्राचे राज्यपालही होते. कृष्णा १९९९ ते २०२० पर्यंत केएसएलटीएचे अध्यक्ष होते. राज्य टेनिस नियामक मंडळाने कृष्णा यांच्या विकासातील भूमिकेचे कौतुक केले. केएसएलटीएचे निवर्तमान अध्यक्ष आणि कर्नाटक विधानसभेतील विरोधी पक्षनेते आर. अशोक यांनी एस. एम. कृष्णा यांच्या निधनबद्दल शोक व्यक्त केला.

# एकतर्फी मालिका पराभव टाळण्याचा प्रयत्न

## आज भारत, ऑस्ट्रेलिया महिला एकदिवसीय सामना

◆ **पर्थ, १० डिसेंबर**

पहिल्या दोन सामन्यांतील दारुण पराभवामुळे खचलेला भारतीय महिला संघ बुधवारी येथे ५० षटकांपूर्वी होणाऱ्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या आणि शेवटच्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात क्लीन स्वीप टाळण्याचा प्रयत्न करणार आहे. पुढील वर्षी होणाऱ्या विश्वचषकात त्यांच्यातील त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करणार आहे.

सात वेळा विश्वविजेत्या ऑस्ट्रेलियाने आतापर्यंत तीन सामन्यांच्या मालिकेत पूर्णपणे वर्चस्व राखले आहे तर भारताने फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही क्षेत्रांत खराब कामगिरी केली आहे.

दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात १२२ धावांनी झालेल्या विक्रमी पराभवामुळे भारताचा ढिसाळपणा दिसला. या सामन्यात भारतीय फलंदाजांनी पॅचमध्ये चांगली कामगिरी केली पण संघ कधीही ३७२ धावांचे लक्ष्य गाठण्याच्या स्थितीत दिसत नव्हता.

कर्णधार हरमनप्रीत कौर आणि उपकर्णधार स्मृती मंधाना या दोन सर्वोत्कृष्ट फलंदाजांनी भारताची सर्वाधिक निराशा केली आहे.





मंधानाने ऑक्टोबरमध्ये न्यूझीलंडविरुद्ध शतक झळकावले होते, पण ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या दोन सामन्यांमध्ये तिला केवळ १७ धावा करता आल्या होत्या. सलामीच्या फलंदाजाच्या फॉर्ममध्ये परतण्याकडे लक्ष असेल.

हरमनप्रीतला तिच्या चांगल्या सुरुवातीचे मोठ्या धावांमध्ये रूपांतर करण्यात अपयश आले आहे. तिने दोन सामन्यांत ५७ धावा केल्या आहेत. भारतीय संघ या वर्षाच्या सुरुवातीला टी-२० विश्वचषकातून लवकर बाहेर पडला होता आणि तेव्हापासून हरमनप्रीतची फलंदाजी आणि कर्णधारपदावर लक्ष ठेवले जात आहे.

सततच्या खराब कामगिरीमुळे संघातून बाहेर पडलेल्या शेफाली वर्माच्या अनुपस्थितीत भारतीय संघाने काही वेगळे प्रयोग केले, पण आतापर्यंत फक्त ऋचा घोषच चांगली कामगिरी करू शकली आहे.

ऋचाने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात ५४ धावा केल्या, जी सध्याच्या मालिकेतील भारतीय फलंदाजाची सर्वोच्च धावसंख्या आहे. दुसरीकडे, ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांनी आतापर्यंत दोन शतके आणि दोन अर्धशतके झळकवली आहेत. यावरून भारतीय फलंदाज धावा काढण्यासाठी किती धडपडत आहेत, हे लक्षात येते.

पहिल्या वनडेत केवळ चार भारतीय फलंदाजांना दुहेरी आकडा गाठता आला होता. भारतीय गोलंदाजांची कामगिरीही आतापर्यंत चांगली झालेली नाही. त्याचे चेंडूवर नियंत्रण नाही. दरम्यान, क्षेत्ररक्षकांनी झेल सोडत त्यांच्या अडचणी वाढवल्या.

ऑस्ट्रेलियाने आतापर्यंत तिन्ही विभागात चांगली कामगिरी केली आहे. हा सामना वेस्टर्न ऑस्ट्रेलिया क्रिकेट असोसिएशन मैदानावर भारतीय वेळेनुसार सकाळी ८.५० वाजता सामना सुरू होईल. (वृत्तसंस्था)

# डी. गुकेशचे विजयाकडे लक्ष

## लिरेनविरुद्ध पुनरागमन करणार

◆ **सिंगापूर, १० डिसेंबर**

महत्त्वपूर्ण आघाडी गमावल्यानंतर, भारतीय ग्रॅण्डमास्टर डी. गुकेशचा बुधवारी जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपदाच्या १३व्या लढतीमध्ये गतविजेता डिंग लिरेनचा सामना होईल. पुन्हा एकदा आघाडी मिळवण्याचा त्यांचा इरादा असेल. दोन्ही खेळाडूंमधील वयाचे अंतर जवळपास दुप्पट असल्याने या सामन्यावर संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

सर्वांत तरुण आव्हानवीर १८ वर्षांचा गुकेश आणि चीनचा ३२ वर्षांचा लिरेन यांच्यात रंजक स्पर्धा सुरू आहे. कोणत्याही खेळाडूला आपली आघाडी जास्त काळ राखता आली नाही. एक दिवसाच्या विश्रांतीनंतर बुधवारी दोन्ही खेळाडू पुन्हा आमनेसामने येणार आहेत. या १४ फेऱ्यांच्या सामन्यात, १२ फेऱ्यांनंतर



गुणसंख्या ६-६ बरोबर आहे आणि जो खेळाडू प्रथम ७.५ पर्यंत पोहोचेल तो विश्वविजेता होईल. १४ फेऱ्यांनंतरही गुण समान राहिल्यास टायब्रेकचा अवलंब केला जाईल.

११वा गेम जिंकल्यानंतर गुकेशला ७.५ चा जादुई आकडा गाठण्याची संधी होती पण पुढचा गेम त्याने गमावला. भारतीय खेळाडूला पुढील गेम पांढऱ्या सोंगट्यांसह खेळायचा आहे. क्लासिकल फॉरमॅटमध्ये खेळल्या जाणाऱ्या या महत्त्वाच्या सामन्यात तो आक्रमक खेळाचा अवलंब करेल, असा विश्वास आहे. आता स्पर्धा एका रोमांचक वळणावर पोहोचली आहे, जो खेळाडू संयम राखेल त्याला फायदा होईल.

या सामन्यात १० गेमनंतर गुणसंख्या ५-५ अशी बरोबरी होती मात्र त्यानंतर पुढील दोन सामन्यांचा निकाल वेगळा लागला. सतत अनिर्णीत राहिल्यामुळे हा सामना निरस झाला होता पण शेवटच्या दोन सामन्यांनी या २.५ दशलक्ष बक्षीस स्पर्धेत नवीन ऊर्जा निर्माण केली आहे. आता खेळाच्या दोन फेऱ्या बाकी असल्याने दोन्ही खेळाडूंना संधी आहे. (वृत्तसंस्था)

# हिराचंद नेमचंदच्या शुभांगी मार्चला हिचा षटकार

## आंतर महाविद्यालयीन जलतरण स्पर्धेत सहा सुवर्णसह १४ पदकांची कमाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन जलतरण स्पर्धेत महिलांच्या गटात हिराचंद नेमचंद महाविद्यालयाच्या शुभांगी मार्चला हिने चौदा प्रकारात सहभाग नोंदवून सहा सुवर्ण, सात रौप्य, एक कांस्य पदक पटकावले. सोनी महाविद्यालयाच्या वतीने पार्क मैदान येथील सावरकर जलतरण तलावावर ही स्पर्धा पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय खेळाडू श्रावणी सूर्यवंशी व क्रीडा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष दशरथ गुरव यांच्या हस्ते झाले. यावेळी सोनी महाविद्यालयाचे सचिव मधुसूदन करवा, संचालिका वासंती आहेर, प्राचार्या आशा रोकडे, निवड समितीचे प्रा. बाळासाहेब वाघचवरे, प्रा. डॉ आनंद ढवण, प्रा. रामहरी नागटिळक, जलतरण संघटनेचे सचिव पार्वतया श्रीराम, प्रशिक्षक श्रीकांत शेटे आदी उपस्थित होते.



**अंतिम निकाल (प्रथम, द्वितीय) :** ५० मीटर फ्रीस्टाइल : शुभांगी मार्चला, प्रणिता खंडाळ (दोघी हि. ने. कॉलेज). १०० मीटर फ्री स्टाइल : शुभांगी मार्चला, क्रांती मोरे (सुलाखे बार्शी ), २०० मीटर फ्रीस्टाइल : शुभांगी मार्चला , क्रांती मोरे. ४०० मीटर फ्रीस्टाइल : क्रांती मोरे, शुभांगी मार्चला, ८०० मीटर फ्री स्टाइल : क्रांती मोरे, शुभांगी मार्चला. ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक : प्रणिता खंडाळ (वालचंद), शुभांगी मार्चला. १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक : शुभांगी मार्चला, भक्ती लोखंडे (संगमेश्वर). २०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक : शुभांगी मार्चला, क्रांती मोरे. ५० मीटर बटरफ्लाय : रिया मुस्तारे (वालचंद अभियांत्रिकी), प्रणिता खंडाळ. शंभर मीटर बटरफ्लाय : क्रांती मोरे, शुभांगी मार्चला. दोनशे मीटर बटरफ्लाय : क्रांती मोरे, शुभांगी मार्चला. ५० मीटर बॅक स्ट्रोक : शुभांगी मार्चला, रिया मुस्तारे. शंभर मीटर बॅक स्ट्रोक : शुभांगी मार्चला, क्रांती मोरे. दोनशे मीटर बॅक स्ट्रोक : शुभांगी मार्चला, क्रांती मोरे. २०० मीटर वैयक्तिक मिडले: क्रांती मोरे , सैम्या हिरेहब्बू. ४०० मीटर वैयक्तिक मिडले: क्रांती मोरे, शुभांगी मार्चला.

# स्वामी विवेकानंदचा साईश्वर गुंटुक १४ वर्षाखालील गटात प्रथम

## मुंबई आंतरराष्ट्रीय नेव्ही मॅरेथॉन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

मुंबई येथे इंडियन ऑइल प्रस्तुत नेव्ही आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेत येथील धावपटू साईश्वर केशव गुंटूक याने यात साईश्वर डिस्ट्रॉयर रन या कॅटेगरीत १४ वर्षाखालील गटात १० किमी पूर्ण करत प्रथम क्रमांक पटकाविला.



जुळे सोलापुरातील स्वामी विवेकानंद प्रशाला येथे इयत्ता नववीत शिकणारा साईश्वरचा नेव्हीचे लेफ्टनट अनिशकुमार गुप्ता व चिफ कमांडर सुखविंदर सिंह पाल यांनी साईश्वरला मेडल व प्रमाणपत्र प्रदान केले. ही स्पर्धा क्रॉसवर्ड मैदान येथून मंत्रालय, गेट वे ऑफ इंडिया, चर्चगेट येथून सकाळी ६ वाजून ३० मिनिटाने सुरुवात झाली व पुन्हा चर्चगेट, गेट वे ऑफ इंडिया, मंत्रालय मार्गे पुन्हा क्रॉसवर्ड मैदान येथे सांगता करण्यात आली. या स्पर्धेत १८ हजार देश विदेशातील धावक सहभाग नोंदवले असून साईश्वरची ८ वी मॅरेथॉन स्पर्धा होती. साईश्वरला सिनियर ऑलिम्पियन केशवराज सिंह, स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, प्राचार्य चिदानंद माळी, क्रीडाप्रशिक्षक कृष्णा कोळी आदींचे मार्गर्शन लाभले.



# गांधी नाथा रंगजी विद्यालयात क्रीडा सप्ताह उत्साहात

**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान संचलित गांधी नाथा रंगजी विद्यालयात क्रीडा सप्ताहास सुरवात झाली. संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली यांचे उद्घाटन माध्यमिकच्या मुख्याध्यापिका स्मिता पुरवत, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सरोजना मुलिंटी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राज्य व राष्ट्रीय खेळाडू साक्षी जिडगे, समृद्धी मुटकुळे, सम्राट वाघमारे, यश जाधव, तृप्ती कोळी, धनश्री कांबळे, समृद्धी जाधव, जयश्री आळंदकर, तनुश्री बद्दुरकर, अक्षरा शिंदे या खेळाडूचा व क्रीडा शिक्षक शिवानंद सुतार गौरव यांचा सत्कार करण्यात आला.

क्रीडा सप्ताहात डॉजबॉल, रनिंग, कबड्डी, संगीत खुर्ची, आट्यापाट्या या खेळाच्या स्पर्धा घेण्यात येणार आहेत. सूत्रसंचालन शुभांगी निंबाळकर यानी केले. शपथ संगिता नरे यांनी घेतली. अनघा कुलकर्णी यानी क्रीडा सप्ताहाचे महत्व सागितले.

# विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय खेळाडूला आर्थिक सहाय्य करणार : कुलगुरु

## दहा लाखाची तरतूद; व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सचिन गायकवाड यांच्या पाठपुराव्याला यश

**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

सोलापूर विद्यापीठ आंतरराष्ट्रीय खेळाडूला आर्थिक सहाय्य करणार आहे. त्यासाठी विद्यापीठाने सन २०२४-२५ या वर्षासाठी १० लाख रुपयांची तरतूद केली असल्याचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी सांगितले.

दक्षिण आफ्रिका येथील दर्बन येथे झालेल्या ११व्या कॉमनवेल्थ कराटे स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्या भुवनेश्वरी जाधव हिचा सत्कार डॉ. महानवर यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. महाविद्यालय व विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या खेळाडूंना आर्थिक सहाय्य करावे यासाठी व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा सचिन गायकवाड यांनी पाठपुरावा केला होता. त्याच्या पाठपुराव्याला यश



**सोलापूर : अकराव्या कॉमनवेल्थ कराटे स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्या विद्यापीठाच्या भुवनेश्वरी जाधव हिचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर. यावेळी डॉ. दामा, डॉ. घारे, डॉ. लकडे, प्रा. गायकवाड आदी.**

आले आहे. यावेळी प्रो. कुलगुरू डॉ लक्ष्मीकांत दामा, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा सचिन गायकवाड, कुलसचिव योगिनी घारे, क्रीडा संचालक अतुल लकडे, बालाजी अमाईन्सचे अधिकारी श्री मल्लिनाथ बिराजदार, सिनेट सदस्य डॉ वीरभद्र दंडे, वित्त अधिकारी डॉ. खराडे, परीक्षा विभाग प्रमुख डॉ. श्रीकांत अंधारे, डॉ व्ही. बी. पाटील, भुवनेश्वरची आई योगाचार्य संगीता जाधव, मिहीर जाधव आदी उपस्थित होते.

व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत या प्रा. गायकवाड यांच्या सूचनेस व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा देवानंद चिलवंत, पद्मजादेवी मोहिते पाटील, ॲड. राजाभाऊ सरवदे, डॉ. समाधान पवार, डॉ प्रशांत पवार, डॉ. आयेशा रंगरेज, प्रा डॉ सुशील शिंदे आदींनी सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

## ओऑसिस सोलापूर ओपन २५ हजार डॉलर महिला आयटीएफ टेनिस




पुनिन (थायलंड) | बुन्यावी (थायलंड) | वैष्णवी आडकर (भारत) | नाकलो (थायलंड) | सहजा यमलापल्ली (भारत)

# भारताच्या वैष्णवी आडकर, सहजा यमलापल्ली यांची आगेकूच

**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

ओॲसिस, प्रिसीजन, इलिझियम-जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत ओॲसिस सोलापूर ओपन एमएसएलटीए-एसडीएलटीए २५हजार डॉलर महिला आयटीएफ टेनिस स्पर्धेत एकेरीत मुख्य ड्रॉमध्ये भारताच्या वैष्णवी आडकर, सहजा यमलापल्ली यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच केली.

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशन व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व एम. एस. एल. टी. ए. टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत एकेरीत पहिल्या फेरीत भारताच्या वैष्णवी आडकर हिने वाईल्ड कार्डद्वारे प्रवेश केलेल्या मधुरिमा सावंतचा ६-०, ६-१ असा पराभव करून आगेकूच केली. गतवर्षीच्या विजेत्या दुसऱ्या मानांकित भारताच्या सहजा यमलापल्ली हिने क्वालिफायर ईश्वरी माथेरेचा ६-०, ६-० असा एकतर्फी पराभव केला. थायलंडच्या बुन्यावी थामचैवत हिने भारताच्या रिया भाटियावर ६-०, ६-३ असा विजय मिळवला. थायलंडच्या पुनिन कोवापिटुकटेडने पात्रता फेरीतून मुख्य फेरीत प्रवेश केलेल्या भारताच्या बेला ताम्हणकरचा ६-१, ६-१ असा सहज पराभव केला. कझाकस्तानच्या चौथ्या मानांकित झिबेक कुलंबायेवा हिने लकी लुझर ठरलेल्या पवनी पाठकचे आव्हान ६-१, ६-३ असे मोडीत काढले.

दुहेरीत पहिल्या फेरीत भारताच्या स्म्रिती भसीन व श्राव्या शिवानी चिल्कालापूडी या जोडीने अव्वल मानांकित ग्रीसच्या व्हॅलेंटिनी ग्राममेटीकोपौलो व रशियाच्या एकतेरिना याशिना यांचा ६-४, ६-२ असा पराभव करून सनसनाटी निकालाची नोंद केली. भारताच्या आकांक्षा नित्तूरेने सोहा सादिकच्या साथीत लात्वियाच्या डायना मार्सिन्केविका व स्लोव्हाकियाच्या व्हिक्टोरिया मोर्वायोवा यांचा ६-०, ०-६, १०-७ असा तीन सेटमध्ये पराभव केला. भारताच्या वाइल्ड कार्ड द्वारे प्रवेश केलेल्या भारताच्या ईश्वरी माथेरे व यशस्विनी पन्वर यांनी आकृती सोनकुसरे व साहिरा सिंग यांचा ७-६(७), ६-३ असा पराभव करून दुसरी फेरी गाठली.

### अन्य निकाल: मुख्य ड्रॉ- पहिली फेरी :

**एकेरी :** बुन्यावी थामचैवत(थायलंड)वि.वि.रिया भाटिया (भारत) ६-०, ६-३; थासापोर्न नाकलो(थायलंड)वि.वि.विक्टोरिया मोर्वायोवा(स्लोव्हाकिया) ६-४, ६-१; टियांसोआ सारा राकोटोमांगा राजोनाह(फ्रांस)३वि.वि.पूजा इंगळे(भारत) ७-५, ६-२;

**दुहेरी:** व्हिएरा डीपर्म(थायलंड)/मधुरिमा सावंत(भारत)वि.वि.सोनल पाटील (भारत)/अभया वेमुरी(भारत) ६-१, २-६, १०-८; झुझाना पावलीकोव्स्का(पोलंड)२ /तियांसोआ सारा राकोटोमांगा राजोनाह(फ्रांस) वि.वि.मारिया मिखाइलोवा/सोफिया नागोर्निया(इस्त्राईल) ६-३, ६-२;

# जिल्ह्यात बास्केटबॉलच्या दोन संघटना, दोघांच्या उद्या स्वतंत्र निवड चाचण्या

## एकाची हौम मैदानावर, एकाची इनडोअर स्टेडियमवर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

जिल्ह्यात दोन बास्केटबॉल संघटना कार्यरत असून दोन्ही संघटनेने जिल्ह्याचे पुरुष व महिला बास्केटबॉल संघ निवडण्यासाठी निवड चाचण्या ठेवल्या आहेत.

खासदार खासदार धैर्यशील मोहिते-पाटील अध्यक्ष असलेल्या संघटनेची १२ डिसेंबर रोजी राजीव गांधी इनडोअर स्टेडियम वरील बास्केटबॉल कोर्टवर सायंकाळी ५.३० वाजता निवड चाचणी होईल. इच्छुकांनी असोसिएशनचे सचिव एम. शफी (मो. ९८९०३५६७०७) यांच्याशी संपर्क साधावा

के. डी. पाटील अध्यक्ष असलेल्या संघटनेची चाचणी १२ डिसेंबर रोजी होम मैदानावर सायंकाळी ६ वाजता होईल. इच्छुकांनी असोसिएशनचे सचिव साकीब शेख (मो. ९८९००७७३७७) यांच्याशी



संपर्क साधावा.

मुंबई येथे १७ ते २० डिसेंबर दरम्यान होणाऱ्या चाचणीसाठी ४ पुरुष व ४ महिला खेळाडू पाठविण्यात येणार आहेत. दोन्ही जिल्हा संघटना नोंदणीकृत आहेत. सध्या राज्य बास्केटबॉल संघटनेत वाद आहे.

त्यामुळे अखिल भारतीय संघटनेचे पाँडेचरीचे प्रा. डॉ. व्ही रघुत्तम यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रात समिती कार्यरत आहे. ही समिती महाराष्ट्राचे संघ निवडतील. चाचणी असल्यामुळे दोन्ही संघटनेच्या खेळाडूंना चाचणीत सहभाग मिळणार असल्याचे सांगण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# शरद पवारांच्या आमदार, खासदारांनी प्रशिक्षण घ्यावे

## आ. गोपीचंद पडळकर; मारकडवाडी येथे महाविकास आघाडीच्या ईव्हीएम बचाव प्रचाराला दिले उत्तर

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १० डिसेंबर-**

भारत देशामधला धनगर समाज हा लोकशाहीला मानणारा आहे, म्हणून आम्ही पवारांचा डाव लाथ मारून उधळून लावण्यासाठी आम्ही येथे आलोय. मारकडवाडीच्या लोकांना मी एवढेच सांगतो की पवारांच्या आमदार-खासदारांनी प्रशिक्षण घ्यावे. शरद पवार हे हम करे सो कायदा म्हणजेच भारतीय संविधान व कायदा मानत नाहीत. मोहिते-पाटील तर भारतीय जनता पार्टीला कृतघ्न ठरले, विरोधात काम केले लोकसभेला आणि विधानसभेला त्यांनी भाजपाच्या विरोधात काम केले म्हणून भाजपा श्रेष्ठींनी त्यांना आता जवळ करु नये, असे प्रतिपादन आमदार गोपीचंद पडळकर यांनी मारकडवाडी येथे महाविकास आघाडीच्या ईव्हीएम बचाव प्रचाराला उत्तर देताना मारकडवाडी येथे केले.




आ. गोपीचंद पडळकर पुढे म्हणाले, अहमदनगरला अहिल्यानगर हे नाव महायुतीच्या सरकारनेच दिले तसेच सोलापूरच्या विद्यापीठाला पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ हे नाव सुद्धा महाविकास आघाडी देत नव्हती ते नाव देण्याचे काम देवेंद्र फडणवीस यांनी केले. त्यामुळे विरोधक जे म्हणत आहेत की, ईव्हीएम हॅक केली तर मी सांगतो ईव्हीएम हॅक कुणी केली तर महाराष्ट्रातील तीन पक्षांच्या सरकारने व केंद्रातील भाजपा सरकारने महाराष्ट्रातील जनतेला दिलेल्या विविध योजनांच्या लाभार्थींनी म्हणजेच, लाडक्या बहीण योजनेच्या, शेतातील मोटारीचे विज बिल माफ करणाऱ्या तसेच पोलीस पाटील मानधनात वाढ, महाराष्ट्रातील सर्व वैद्यकीय कोर्समध्ये शिकणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण लाभ घेणाऱ्या तसेच एसटी बसमध्ये अर्धे तिकीट व अशा अनेक नागरिकांना सुख-सुविधा देणाऱ्या योजनांचा लाभ घेणाऱ्या माझ्या महाराष्ट्रीयन बंधू-भगिनी, वृद्धांनीनी सरकारच्या योजनांना पाठिंबा म्हणून या सर्व योजनांच्या लाभार्थ्यांनी मशीनी हॅक केल्या व या सरकारला पुन्हा एकदा जनतेची सेवा करण्याची संधी दिली. अशा अनेक केली.

ओबीसी, भटक्या युक्त जातीने सुद्धा केली. रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या विषयी ती म्हणाले की जर त्यांना जर लाज वाटत असेल तर त्यांनी आमदारकीचा राजीनामा द्यावा. आमदार सदाभाऊ खोत म्हणाले, नवतंत्रज्ञान काँग्रेसनेच आणले. काँग्रेसनेच ईव्हीएम मशीन आणली अन् आता म्हणतात ती ईव्हीएम गडबड करते म्हणून मारकडवाडीच्या जनतेला मी सलाम करतो की त्यांनी या गावांमध्ये लोकशाही जिवंत ठेवली. माझ्या आमदार फंडाचं पहिलं पत्र मी मारकडवाडीच्या विकासाला देतो. तसेच माजी आमदार रामभाऊ सातपुते म्हणाले, मोहिते-पाटलांच्या गुंडांनी सभेला येऊ नये, म्हणून प्रत्येक ठिकाणी चिटबाय उभे केले. जे आम्हाला पाच हजार मतदान पडणार नाही, म्हटले त्यांनाच आम्ही गुडघ्यावर आणले. मोहिते-पाटलांना माझी एक सूचना आहे, वश्या मारुतीच्या बोटीमध्ये येऊन बघा कसं गार गार वाटतय. अशाप्रकारे महाविकास आघाडीच्या फेक नेरिटीव्ह विरूद्ध मारकडवाडीमध्ये प्रचार सभा संपन्न झाली. या प्रचार सभेस अनेक मान्यवर व तसेच मारकडवाडीचे ग्रामस्थ व महिला भगिनी उपस्थित होत्या.

# वैरागच्या खर्च केलेल्या शासकीय निधीच्या कामाची चौकशी करा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १० डिसेंबर-**

वैराग येथे नगरपंचायतीसमोर गेल्या आठ दिवसांपासून माजी पंचायत समिति सदस्य संपत धेंडे यांचे आमरण उपोषण सुरू आहे. वैराग ग्रामपंचायत व नगरपंचायत काळात खर्च झालेल्या शासकीय निधीच्या कामाची चौकशी आणि कर्मचारी नियुक्ति बाबतच्या प्रश्नावर त्यांचे उपोषण सुरू आहे. मात्र अद्याप शासन स्तरावर आंदोलनाची दखल घेतली जात नसल्याने त्यांनी गुरुवारी नगरपंचायत समोरील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा इशारा वैराग पोलिस ठाण्याला दिलेल्या निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांना दिला आहे.



वैराग येथील माजी तालुका पंचायत समिति सदस्य संपत धेंडे यांनी ३ डिसेंबरपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाच्या दहाव्या दिवशी गुरुवार १२ डिसेंबर रोजी पहाटे वैराग नगरपंचायत कार्यालयासमोर झाडाला फाशी घेऊन आत्महत्या करणार असल्याचे त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. वैराग ग्रामपंचायतीचे कर्मचारी नगरपंचायतीकडे सामावून घेण्यासाठी बोगस कागदपत्राद्वारे शासनाने १८ पदे मंजूर केली व २९ पदे भरली. ज्या कर्मचाऱ्यांना डावलले त्यांना सामावून घ्यावे म्हणून पहिले आमरण उपोषण सोलापूर येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दहा दिवस केले. त्यानंतर वैराग नगरपंचायतीसमोर १८ दिवस, पुन्हा सहा दिवस, आणि चौथ्यांदा ३ डिसेंबरपासून सध्या आमरण उपोषण सुरू आहे. तसेच वैराग ग्रामपंचायत काळात २०१८ ते २०१९ मध्ये ग्रामपंचायत एक कोटी ५४ लाखांचा तर चालू काळात वैराग नगरपंचायतीने ४ कोटी ५२ लाखांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप करत त्यांनी चौकशी करण्याची मागणी केली आहे.

याबाबत निवेदनाच्या प्रती ई-मेलद्वारे त्यांनी मुख्यमंत्री, बार्शीचे माजी आमदार, पुणे विभागीय आयुक्त यांना दिल्या आहेत. उपोषणा विषयी माहिती घेवून माहिती देवू, असे वैरागचे मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांनी सांगितले.

# बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचाराचा निषेध; अक्कलकोट तहसीलदारांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१० डिसेंबर-**

बांगलादेशात अल्पसंख्यांक हिंदूवर होत असलेल्या अत्याचार विरोधात निषेध केल्यामुळे संन्यासी चिन्मय कृष्णदास यांच्या वर राजद्रोहाचा खटला टाकून अटक केल्याच्या निषेधार्थ समाजसेवक तम्मा शेळके यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट मध्ये सकल हिंदू समाजाच्या वतीने तहसीलदारांना लेखी निवेदन देण्यात आले.



याप्रसंगी समाजसेवक तम्मा शेळके म्हणाले, बांगलादेशमध्ये गेल्या ऑगस्ट महिन्यापासून ५० जिल्ह्यातील हिंदू समाजावर अत्याचार होऊन २००० पेक्षा अधिक जातीय हल्ले झाले आहेत. यामध्ये हिंदूंची घरे, हिंदू समाजाचे व्यवसाय, हिंदू समाजाची मंदिरे यांच्यावरील हल्ल्याचा समावेश आहे. ही कटकारस्थाने थांबविण्याकरिता प्रयत्न नाही झाले तर हिंदू समाजाचे बांगलादेशातील अस्तित्व धोक्यात येईल. बांगलादेशातील हिंदूंच्या मानव अधिकाराचे संरक्षण करणे आणि मानव अधिकारांच्या बाजूने उभे राहणे आपल्या राष्ट्राच्या आणि राष्ट्रातील नागरिकांचे कर्तव्य आहे. याकरिता अक्कलकोट सकल हिंदू समाजाच्या वतीने लेखी निवेदन दिले.

याप्रसंगी नायब तहसीलदार विकास पवार, भीमराव साठे, संतोष वगाले, सुशील हिरस्कर, प्रितीश किलजे, संतोष पत्तरगे, ऋषिकेश लोणारी, प्रवीण घाटगे, संजय किणीकर, राहुल वाडे, महेश वागदरे, लखन झंपले, मदन राठोड, गुरु माळी, विजय लांडगे, महेश जोजन, श्रीशैल गवंडी, देविदास गवंडी, प्रसन्न गवंडी, धनराज पाटील, संजय जमादार आदी उपस्थित होते.

# अतिरिक्त झालेल्या ६९ शिक्षकांच्या हरकतींवर सुनावणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागांतर्गत कार्यरत असणाऱ्या जिल्ह्यातील अतिरिक्त झालेल्या शिक्षकांच्या समायोजन संदर्भात माध्यमिक शिक्षणाधिकारी संजय जगताप यांच्यासमोर सुनावणी संपन्न झाली. अतिरिक्त झालेल्या शिक्षकांच्या सुमारे ६९ हरकती प्राप्त झाल्या होत्या.

या हरकतींवर सुनावणी घेण्यात आली. दरम्यान, ज्या वर्गात विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी आहे. त्या खाजगी आणि जिल्हा परिषद शैक्षणिक संस्था आणि शाळेतील शिक्षकांना माध्यमिक शिक्षण विभागाने अतिरिक्त घोषित केले होते. अतिरिक्त झालेल्या शिक्षकांना इतर शैक्षणिक संस्था आणि जिल्हा परिषद शाळेमध्ये समायोजन करण्यासंबंधी आदेश निर्गमित करण्यात आले होते. त्यानुसार ही प्रक्रिया सुरू होती. समायोजित शिक्षकांच्या नियुक्तीनंतर नवीन भरती प्रक्रिया राबवली जाणार होती. त्यानुसार अतिरिक्त झालेल्या शिक्षकांचे समायोजन करण्यासंबंधी माध्यमिक शिक्षण विभागाने प्रक्रिया राबवली, त्यामध्ये शिक्षकांना समायोजित करण्यात आले. मात्र या समायोजनावर ६९ शिक्षकांनी हरकती घेतल्या होत्या. त्यावर माध्यमिक शिक्षण विभाग शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयात सुनावणी झाली.

### माध्यमिक शिक्षण विभागात शिक्षकांची एकच गर्दी

सोलापूर जिल्हा परिषद अंतर्गत माध्यमिक शाळांमधील अतिरिक्त झालेल्या शिक्षकांच्या समायोजना संबंधी हरकती प्राप्त झाल्या होत्या. त्या हरकतींवर शिक्षणाधिकारी माध्यमिक शिक्षण विभाग यांच्यासमोर सुनावणी घेण्यात आली.६९ हरकती प्राप्त झाल्याने, माध्यमिक विभागात शिक्षकांची मोठी गर्दी होती. संपूर्ण दिवस हरकतींवर सुनावणी घेण्यात गेला. रात्री उशिरापर्यंत यावर सुनावणी सुरू होती. त्यामुळे शिक्षण विभागांमध्ये शिक्षकांची मोठी गर्दी दिसून आली. यावेळी काही काळ नियोजनामध्ये गोंधळ उडाल्याने शिक्षकांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त केली.

# भिवंडी येथून बेपत्ता झालेली मुलगी मिळाली सोलापुरात

## जेलरोड पोलिसांकडून मुलगी नातेवाईकांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० डिसेंबर-**

ऑपरेशन मुस्कानअंतर्गत जेलरोड पोलिसांनी भिवंडी येथून बेपत्ता झालेल्या मुलीला तिच्या नातेवाईकांच्या स्वाधीन केले.




जेलरोड पोलिस ठाण्याकडी ऑपरेशन मुस्कान पथकातील कर्मचारी हे ९ डिसेंबर रोजी अशोक चौक परिसरात गस्त करीत असताना त्यांना एक मुलगा व एक मुलगी संशयास्पदरीत्या फिरताना मिळून आले. या दोघांकडे पोलिसांनी चौकशी केली असता त्यांनी त्यांची नावे महेश लक्ष्मीनारायण एकलदेवी (वय २०, रा. दत्त नगर, आडम मास्टरचे ऑफिसजवळ, सोलापूर) आणि डिंपल हितेश मकवाना (वय १८, रा. घर नं.११९, शहा बिल्डींग, अजंठा कंपाऊंड, जैन मंदिराजवळ, धामणकर नाका, भिवंडी, जि. ठाणे) अशी असल्याचे सांगितले. त्यामुळे जेलरोड पोलिसांनी दोघांकडे अधिक चौकशी करून माहिती घेतली असता महेश एकलदेवी याच्या बेपत्ताबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात तर डिंपल मकवाना हिच्या बेपत्ताबाबत भिवंडी पोलिस ठाण्यात नोंदी असल्याचे दिसून आले. त्यानुसार जेलरोड पोलिसांनी एकलदेवी याच्या नातेवाईकांना बोलावून महेश यास त्यांच्या ताब्यात दिले तर भिवंडी पोलिसांशी संपर्क साधून त्यांच्याकडील बेपत्तामधील डिंपलबाबत माहिती दिली. भिवंडी पोलिसांनी सोलापुरात येऊन डिंपल हिस ताब्यात घेतले.

ही कामगिरी पोलिस आयुक्त एम. राजकुमार, उपायुक्त डॉ. दिपाली काळे, विजय कबाडे, सहायक आयुक्त प्रताप पोमण, पोलिस निरीक्षक सुरेश चाटे, भाऊसाहेब बिराजदार, यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक जोत्स्ना भांबिष्टे, पोलिस हवालदार चव्हाण, पोलिस शिपाई साखरे, महिला पोलिस शिपाई सय्यद, भुजबळ यांनी पार पाडली.

# स्वामी समर्थ मंदिर परिसरातील अनधिकृत इमारत पाडण्याचे काम सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१० डिसेंबर-**

मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी अर्ज फेटाळल्याने अक्कलकोट स्वामी समर्थ मंदिर परिसरात असलेल्या अनधिकृत तीन मजली टोलेजंग इमारत पुन्हा एकदा पाडण्यास सुरवात होणार आहे. याबाबत नगरपालिकेने पाडकाम सुरू करण्याचे पूर्ण तयारी केला आहे.

स्वामी समर्थ मंदिर परिसरात जागेच्या मालकाने कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता अनधिकृतपणे तीन मजली टोलेजंग इमारत बांधली होती. त्याबाबत जागा मालक व नगरपालिका यांच्यात स्थानिक व मुंबई कोर्टात वाद सुरु होता. बांधकाम पाडण्यात येऊ नये अशा प्रकारचे आदेश नव्हते. या आधारावर तीन दिवसांपूर्वी इमारत पाडण्याचे काम सुरू केले होते. तेव्हा स्थानिक कोर्टाने उच्च न्यायालयातील सोमवारी होणाऱ्या सुनावणीपर्यंत स्थगिती दिली होती. त्यामुळे तीन दिवस काम बंद होते. सोमवार, दि. ९ डिसेंबर रोजी सकाळी मुंबई येथील उच्च न्यायालयाचे न्यायाधीश ए. एस. गडकरी व कमल खाता यांच्यासमोर सुनावनी झाली.

यावेळी अर्ज फेटाळल्याने पुन्हा पाडकाम सुरू करण्याचा नगर परिषदचा मार्ग मोकळा झाला आहे.



> स्वामी समर्थ मंदिर परिसरातील इमारत मालकांनी दाखल केलेले तक्रार अर्ज मुंबई कोर्टाने फेटाळला आहे. पुन्हा पोलिस बंदोबस्त घेऊन लवकरच पाडकाम सुरू करू.
> **- रमाकांत डाके,**
> मुख्याधिकारी अक्कलकोट

### असा झाला युक्तिवाद

आरक्षण अनेक वर्षांपासून आहे. शासनाकडून काहीच हालचाल होत नसल्याने आम्ही कोट्यवधी रुपये खर्च करुन इमारत उभी केली आहे. ती पाडण्यात येऊ नये, असा युक्तिवाद इमारत मालकाकडून करण्यात आला. आरक्षित जागा असताना अनधिकृत बांधकाम कसे काय केले, असे सवाल करुन त्यासाठी संबंधित कार्यालयात अर्ज केला होता का, परवानगी दिली नाही तर का बांधकाम केला, असे सवाल करित अर्ज फेटाळला. याप्रकरणी नगरपालिकेकडून ड. अजित होन, तर जागा मालकांकडून ड. सारंग आराध्ये यांनी केला.

यावेळी नगरपालिका मुख्याधिकारी रमाकांत डाके, नगररचनाकार शुभम माहुरे उपस्थित होते.



# हिंदूवरील अत्याचाराच्या निषेधार्थ मोहोळमध्ये मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १० डिसेंबर-**

बांगलादेश मधील अल्पसंख्यांक हिंदूवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ मंगळवारी मोहोळमध्ये निषेध मोर्चा काढण्यात आला.

नॅशनल हायवे वरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला हार घालून या मोर्चाला सुरुवात करण्यात आली यामध्ये भारत माता की जय वंदे मातरम छत्रपती शिवाजी महाराज की जय, हिंदू वरील अत्याचाराचा निषेध असो अशा आशयाच्या घोषणा देण्यात आल्या. मोहोळचे तहसीलदार यांना याबद्दलचे निवेदन देण्यात येऊन यापुढे यापेक्षा उग्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला. याचीच एक प्रत पोलीस स्टेशनचे प्रभारी पाटील यांना देण्यात आली. यावेळी रा.स्व. संघाचे माजी तालुका कार्यवाह राजाभाऊ देशमुख, तालुका संघचालक एडवोकेट अमोल देशपांडे, तालुका सहकार्यवाह प्रा. मदनसिंह लाळे नितीन पवार भाजपचे प्रज्ञावंत आघाडीचे जिल्हा सहसंयोजक अविनाश पांढरे जिल्हा उपाध्यक्ष सतीश काळे, नितीन गुंड ,अरुण डोंगरे, ज्ञानेश्वर मेलगे, संभाजी वाघमोडे, महादेव नरुटे, शुभम गायकवाड, सागर चोरमले, गुंड पाटील, शुभम सिताप आदींसह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### प्रहार संघटनेचे जिल्हा संघटक अजित कुलकर्णी दोन वर्षासाठी तडीपार

**सोलापूर, दि. १० डिसेंबर -**



गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेल्या प्रहार जनशक्ती संघटनेचे जिल्हा संघटक अजित कुलकर्णी यांना पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले आहेत. तडीपारीच्या आदेशानंतर पोलिसांनी कुलकर्णी यास पुणे येथे सोडले आहे. अजित प्रभाकर कुलकर्णी (वय ४८, रा. विजय देशमुख नगर, विजापूर नाका, सोलापूर) असे तडीपार करण्यात आलेल्याचे नाव आहे. अजित कुलकर्णी हे प्रहार जनशक्ती संघटनेचे जिल्हा संघटक असून त्यांच्याविरुध्द सन २०१८, २०२०, २०२१, २०२२ व २०२४ या कालावधीमध्ये साथीदारांसह खंडणी मागणे, दंगा व मारामारी करणे, सरकारी नोकरांच्या कामात अडथळा करून दमदाटी करणे, सरकारी आदेशाचे उल्लंघन करणे असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे कुलकर्णी यांस सोलापूर जिल्ह्यातून तडीपार करण्याबाबतचा प्रस्ताव सदर बझार पोलिस ठाण्याकडून पोलिस उपायुक्त कबाडे यांच्याकडे पाठविण्यात आला होता. या प्रस्तावास पोलिस उपायुक्त कबाडे यांनी मंजुरी देत कुलकर्णी यांस सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपारीच्या आदेशानंतर कुलकर्णी यास पोलिसांनी पुणे येथे सोडले आहे.

### शासनाच्या फसवणुकप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर. दि. १० डिसेंबर -**

एकसारखी नावे असल्याचा गैरफायदा घेत तोतया व्यक्तीकडून दस्त नोंदणी करून शासनाची फसवणुक करणाऱ्या दोघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रफिक गफूर शेख (वय ५८, रा. देशमुख प्लॉट नं. १, उपळाई रोड, शासकीय गोडाऊन शेजारी, बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नरसय्या रामदास इप्पाकायल (धाकटा) आणि नरसिमलू यल्लप्पा कोंडा यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रियदर्शनी गृह निर्माण संस्थेचे चिफ प्रमोटर नरसय्या रामदास इप्पाकायल (थोरले) हे आहेत. दोघांची नावे एकसारखी असल्याचा गैरफायदा घेऊन नरसय्या रामदास इप्पाकायल (धाकटा) याने सही बनावट कुलमुखत्यार पत्र तयार करून नरसिमलु कोंडा यांना देऊन शासकीय अधिकाऱ्यांची फसवणुक केली. त्यामुळे कुलमुखत्यार दस्त क्र. ३०/९७ मध्ये लिहून देणार नरसय्या इप्पाकायल (धाकटा) याने तोतया व्यक्ती उभा करून दस्त नोंदणी करून शासनाची फसवणुक केली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक अहिवळे पुढील तपास करीत आहेत.

### आशा सेविकांना त्यांच्या कामाचा पूर्ण मोबदला द्या

**जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ नवले यांचे आदेश**

**सोलापूर, दि.१० डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात गटप्रवर्तक आणि आशा स्वयंसेविका यांच्यात गेल्या काही दिवसांपासून शीतयुद्ध सुरू होते. याबाबत सोलापूर जिल्ह्याच्या दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव आरोग्य केंद्रातील गटप्रवर्तकाच्या विरोधात एका आशा स्वयंसेविकेने तक्रार दिली होती. या संदर्भातील चौकशी अहवाल जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. संतोष नवले यांच्याकडे सादर करण्यात आला होता. त्या संदर्भात मंगळवार (दि.१०) रोजी डॉ.संतोष नवले यांच्यासमोर सुनावणी घेण्यात आली. दरम्यान, या प्रकरणाची संपूर्णपणे चौकशी करून संबंधित आशा सेविकांनी त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला तपासणीअंती पूर्णपणे देण्यात यावा, असे आदेश ब्लॉक अकाउंटंट यांना देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे या प्रकरणा संदर्भात दोन्ही पक्षकारांना योग्य ते समुपदेशन करून प्रकरण निकाली काढण्यात आल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संतोष नवले यांनी दिली.

#### यासाठी घेतली होती सुनावणी

कंदलगाव (ता. दक्षिण सोलापूर) आरोग्य केंद्रातील एका गटप्रवर्तकाच्या विरोधातील तक्रारींबद्दल जिल्हा समन्वयक बबिता शिंदे यांनी सादर केलेल्या याअहवालात गटप्रवर्तकाच्या कामकाजात आर्थिक अनियमितता आढळली असल्याचे नमूद करण्यात आले आहे. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पुन्हा चौकशी करण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार सदरची फेरचौकशी करून त्या प्रकरणावर सुनावणी घेण्यात आली आहे.

### जिजामाता प्रसुतीगृहातील नवजात बालक मृत्यूप्रकरणी डॉक्टरसह चार जणांना नोटीसा

**सोलापूर, दि.१० डिसेंबर-**

महापालिकेच्या जिजामाता प्रसूतीगृहात बुधवारी झालेल्या एका नवजात बालकाच्या मृत्यू प्रकरणी समितीने चौकशी अहवाल सादर केल्यानंतर संबंधित डॉक्टरसह चार जणांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. तीन दिवसात खुलासा करण्याचे स्पष्ट केले आहे, अशी माहिती महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली. सोलापूर महापालिकेच्या जिजामाता प्रसूतीगृहात बुधवारी दुपारी सोलापुरातील सरवदेनगर येथे राहणाऱ्या सना बागवान या प्रसुतीसाठी दाखल झाल्या होत्या. यानंतर प्रसुती होऊन नवजात बालकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती. दरम्यान, या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी प्रहार संघटनेचे शहराध्यक्ष अजित कुलकर्णी यांनी केली होती. चौकशीसाठी महापालिका प्रशासनाने एक समिती नियुक्त केली होती. या समितीने प्राथमिक अहवाल शनिवारी सादर केला. या अहवालाच्या आधारे महापालिका प्रशासनाने संबंधित डॉक्टर, नर्ससह एकूण चार जणांना नोटिसा दिल्या आहेत. खुलासा करण्यासाठी तीन दिवसांची मुदत देण्यात आली आहे. खुलासे आल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल, अशी माहिती महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली.

### मंगलचन्दजी भंसाली यांचे निधन

**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**



येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे निवृत्त कार्यकारी अभियंता मंगलचन्दजी भैरूदानजी भंसाली (वय ८४) यांचे मंगळवारी (दि.१०) अल्प आज़ाराने निधन झाले. त्यांच्या पश्च्यात संजय, अभय हे दोन इंजिनियर मूले, सुना, मुलगी व नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंतयात्रा त्यांच्या निवास्थानापासून बुधवार (दि.११)सकाळी ११ वाजता निघेल.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# खुल्या प्लॉटधारक मिळकतदारांकडे १२५ कोटींची थकबाकी

**तब्बल ८२ हजार ४६२ खुले प्लॉट मिळकतदार**

**महापालिकेकडून धडक मोहिमेतून सीलबंद, जप्ती कारवाईचे नियोजन**

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

शहरात विशेषतः हद्दवाढ भागामध्ये तब्बल ८२ हजार ४६२ विना बांधकाम खुले प्लॉट मिळकतदार आहेत. यापैकी ६० टक्के मिळकतदारांकडे वर्षानुवर्षे महापालिका मिळकत कराची थकबाकी राहिली आहे. त्यांच्याकडील सुमारे १२५ कोटी रुपयांची थकबाकी आहे. तर दीड लाख मिळकतदारांकडे मागील आणि चालू आर्थिक वर्षातील अशा सुमारे ५०० कोटी रुपयांचा कर थकीत आहे. या थकबाकी वसुलीसाठी महापालिकेच्या मालमत्ता कर विभागातील अधिकारी आणि कर्मचारी हे सतत विविध मार्गाने प्रयत्नशील आहेत.

सोलापूर शहर आणि हद्दवाढ भागात २ लाख ६० हजार मिळकतदार आहेत. या मिळकतदारांपैकी लाखभर मिळकतदारांनी महापालिकेच्या तिजोरीत चालू आर्थिक वर्षात जवळपास ११४ कोटी ७ लाख रुपयांचा भरणा केला आहे. मात्र अद्यापही उर्वरित दीड लाख मिळकतदारांकडे मागील आणि चालू आर्थिक वर्षातील अशा सुमारे ५०० कोटी रुपयांची थकीत आहे. या थकीत वसुलीसाठी महापालिकेच्या मालमत्ता कर विभागातील अधिकारी आणि कर्मचारी हे सतत विविध मार्गाने प्रयत्नशील आहेत. तर यापूर्वी कारवाई मोहीम देखील हाती घेण्यात आली होती मात्र निवडणुका कालावधीमध्ये ही मोहीम थांबविण्यात आली होती.

शहरात विशेषतः हद्दवाढ भागामध्ये तब्बल ८२ हजार ४६२ विना बांधकाम खुले प्लॉट मिळकतदार आहेत. यापैकी ६० टक्के मिळकतदारांकडे वर्षानुवर्षे महापालिका मिळकत कराची थकबाकी राहिली आहे. त्यांच्याकडील सुमारे १२५ कोटी रुपयांच्या थकीत वसुलीसाठी देखील महापालिका प्रशासन लवकरच कामाला लागणार असून पुढील महिनाभरात अशा थकबाकीदारांची ही यादी तयार करण्यात येऊन त्यांना नोटिसा बजावण्यात येणार आहेत. मोठ्या थकबाकीदारांनी दिलेल्या मुदतीत कर न भरल्यास त्यांच्या प्लॉट जागा महापालिका ताब्यात घेण्याच्या प्रक्रियेचे नियोजन देखील करत आहे.

सोलापूर शहरातील ८ हजार ७५७ मिळकतदारांकडे २२७ कोटी १३ लाख रुपयांच्या कराची थकबाकी असून या वसुलीसाठी महापालिका मालमत्ता कर विभागातील अधिकारी आणि कर्मचारी हे सरसावले आहेत. थकबाकी मिळकतदारांना आणखी एक संधी म्हणून लोकअदालतीचे माध्यम ठेवण्यात आले आहे. यानंतर मात्र विशेष धडक मोहिमेतून सीलबंद आणि जप्तीचे नियोजनही महापालिका प्रशासनाने आखले आहे.

दोन महिन्यापूर्वीच झालेल्या राष्ट्रीय लोकअदालतीत मोठ्या थकबाकीदारांना नोटीसा पाठविण्यात आल्या होत्या. यावेळी मोठी वसुली झाली होती. दि. १४ डिसेंबर रोजी महापालिकेने पुन्हा लोक अदालतीत शहर हद्दवाढ भागातील थकबाकी असलेल्या तब्बल २४ हजार मिळकतदारांना वसुलीच्या नोटीसा पाठविल्या आहेत. शहरातील लाखावरील थकबाकीदारांकडून वसुलीसाठी जोरदार प्रयत्न सुरू झाले असून जवळपास थकबाकीदारांना नोटीसा बजावण्यात देखील आले आहेत.

यानुसार लाखावरील थकबाकीदारांकडे सव्वा दोनशे कोटी रुपयांची थकीत असल्याने त्यांच्याकडे अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. यंदा लोकअदालतून थकबाकीदारांकडून किमान १०० कोटी रुपयांच्या वसुलीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. विविध ७० पथके त्या थकबाकीदारांकडे जाऊन वसुलीसाठी प्रयत्नशील आहेत.

### थकबाकीदारांची नावे प्रसिद्ध करणार

यापूर्वी थकबाकी मिळकतदारांनी आपली संपूर्ण थकबाकी भरावी यासाठी अनेकवेळा ५० ते ८० टक्के पर्यंत शास्त्री व दंड माफीची आणि गतवर्षी एक वेळेस १०० टक्के शास्ती आणि दंड माफीची योजना देण्यात आली. त्या- त्या भागातील चौकांमध्ये थकबाकी मिळकतदारांची नावे दर्शविणारी फलके झळकविण्यात आली. कारवाई मोहीम राबविण्यात आली. आता मात्र शहरासह संपूर्ण लोकांसमोर थकबाकीदारांची नावे यावीत म्हणून महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.

### १५ डिसेंबरपासून कारवाईची मोहीम

लोक अदालती च्या माध्यमातून थकबाकी वसूल न झाल्यास त्यांच्यावर थेट नळजोड तोडण्यासह सीलबंद आणि जप्तीची कारवाई देखील मोठ्या प्रमाणात विशेष मोहिमेद्वारे करण्यात येणार आहे यासाठी संपूर्ण नियोजन देखील करण्यात आले असून कारवाईची ही मोहीम १५ डिसेंबर पासून सुरू होणार आहे. तसे नियोजन करण्यात येत आहे.

### अशी आहे मिळकत कराची थकबाकी

२५ हजाराच्या आतील - सुमारे ९० हजार मिळकतदार (१०० कोटी रुपये मिळकत कर) , २५ हजार ते १ लाख पर्यंत- ३५ हजार ३३६ (१५९ कोटी ११ लाख) , १ लाख ते ५ लाखापर्यंत- ८ हजार १५२ (१३३ कोटी २७ लाख), ५ लाख ते त्यापुढील- ६०५ मिळकतदार (९३ कोटी ८६ लाख).

## संक्षिप्त वृत्त



### नीलकंठ बँक, विश्वनाथ करवा परिवाराचा प्रेरणा निधी

**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

येथील नीलकंठ बँकेचे संस्थापक विश्वनाथ करवा यांच्या ९ व्या स्मृतिदिनानिमित्त नीलकंठ को-ऑपरेटिव्ह बँक आणि करवा परिवाराच्या वतीने शहरातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांना प्रेरणा निधी धनादेश प्रदान करण्यात आला. यावेळी नंदा करवा, निकीता कौस्तुभ करवा, बँकेचे चेअरमन विजयकुमार उपाध्ये, व्हाईस चेअरमन सीए धनराज नोगजा, चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, अंकुश पंधे, किशोर चंडक, पवन सोनी, यलप्पा येलदी, माणिकचंद डागा, विजय जाजू, नितीन हबीब, जमनादास भुतडा, चंद्रकांत तापडीया, शरद कालाणी, सीए आनंद झंवर, नंदा भटटड, सचिन कोठारी, असीम सिंदगी, तुळशीदास भुतडा आदी उपस्थित होते.



### अमृत संस्थेची शासकीय सल्लागार सामितीची बैठक संपन्न

**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

अमृत (ॲकॅडमी ऑफ महाराष्ट्र रिसर्च अप्लिफ्टमेंट अँड ट्रेनिंग) संस्थेची शासकीय सल्लागार समिती काल स्थापन झाली सदर समितीची पहिली बैठक आज पुण्यातील अमृतच्या कार्यालयात संपन्न झाली. यावेळी अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी नवनियुक्त सदस्यांचा सत्कार केला तसेच अमृतच्या योजना तळागळापर्यंत पोचविण्यासाठी नियोजन करण्यात आले. यावेळी सल्लागार समिती सदस्य सर्वश्री विश्वजीत देशपांडे निखिल लातूरकर बाजीराव भैय्या धर्माधिकारी क्षितिज पाटुकले अमृतच्या अधिकारी प्रिया देशपांडे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.



### शरद पवार इन्स्पायर फिलोशिप मिळाल्याबद्दल रोहिणी चौधरी यांचा सत्कार

**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

शरद पवार इन्स्पायर फिलोशिप इन एज्युकेशनची घोषणा करण्यात आली आहे. प्राथमिक २० तर माध्यमिक १० अशा महाराष्ट्रात एकूण ३० शिक्षकांची फेलोशिप घोषित करण्यात आली आहे. प्राथमिकमधून आपल्या सोलापूरच्या नू.म.वि. शाळेच्या रोहिणी सचिन चौधरी यांच्या करिअर फाउंडेशन फॉर लिटिल चॅम्प या उपक्रमाची निवड झाली आहे. त्यांना ६० हजार रुपये फेलोशिप मिळणार आहे. त्याबद्दल त्यांचा सत्कार शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा जेधे, हरिभाई देवकरण प्रशालेचे मोतीबने, नू.म.वि. शिशू शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी तसेच शाळेतील शिक्षकांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.




### ऑर्किड स्कूलमध्ये साने गुरुजी अभिसंवाद यात्रा

**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

सोलापूर शहरातील नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये साने गुरुजी यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवा निमित्ताने साने गुरुजी अभिसंवाद यात्रा पार पडली. या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सचिवा वर्षा विभुते, स्कूलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे तसेच राष्ट्र सेवादलचे सदाशिव मगदूम, शोभा मगदूम, मिलिंद कांबळे हे उपस्थित होते. यावेळी राष्ट्र सेवादल मिरज यांच्यावतीने साने गुरुजी अभिसवांद यात्रेचे औचित्य साधून या संवाद यात्रेत साने गुरुजींच्या जीवनावर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यावेळी प्राचार्या रुपाली हजारे यांनी साने गुरुजींच्या आयुष्यातील विविध प्रसंग सांगून त्यांच्या कार्याला उजाळा दिला. प्रास्ताविक व आभार तृप्ती चाटी यांनी मानले.




# अस्थिरोगांवरील रशियन एलिझारोव्ह फेलोशिप

**कार्यक्रमास जगभरातून डॉक्टरांची उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर -**

आडके हॉस्पिटल, आडके फाउंडेशन, व आसामी- इंडियन यांच्या संयुक्त विद्यमाने सात दिवसीय इलिझारोवह फेलोशिप कार्यशाळेस जगभरातील डॉक्टरांनी उपस्थिती लावली.

ही कार्यशाळा हॉटेल प्रथम येथे पार पडली. या कार्यशाळेचे उद्घाटन सोलापूरचे जगप्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ. कांतीलाल डागा यांच्या हस्ते व फादर विकास रणसिंगे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. एलिझारोव्ह हे एक अतिशय प्रगत रशियन अस्थिरोगांवरील तंत्रज्ञान असून अस्थिरोगांवरील ८० टक्के व्याधींवर यामुळे अतिशय अचूक, प्रभावशाली व खात्रीलायक रित्या, विना चिरफाड उपचार करता येतात. या सात दिवसीय कार्यशाळेमध्ये आडके हॉस्पिटलचे अस्थिरोग व इलिझारोव्ह तज्ञ डॉ. संदीप आडके हे जगभरातील अस्थिरोग तज्ञांना या तंत्रज्ञानाचे सखोल प्रशिक्षण देणार आहेत. या कार्यशाळेचे हे दहावे वर्ष असून जगातील सात दिवसांमध्ये फेलोशिप देण्याचा हा पहिलाच अत्यंत यशस्वी प्रयोग डॉ. संदीप आडके व त्यांच्या आडके हॉस्पिटलने केलेला आहे. या कार्यशाळेसाठी भारतातील कानाकोपऱ्यातून तसेच श्रीलंका, कॅमेरुन, बुगांडी, इथिओपिया, सुदान अशा अनेक आफ्रिकन देशातून अस्थिरोग तज्ञांनी शिकण्यासाठी नोंद केलेली आहे. सोलापुरात विमानसेवा नसताना सुद्धा जगभरातून हे तंत्रज्ञान शिकण्यासाठी अस्थिरोग तज्ञ सोलापुरात येतात ही सोलापूरच्या वैद्यकीय क्षेत्रासाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. ही कार्यशाळा संपन्न करण्यासाठी डॉ.डायना आडके व आडके हॉस्पिटलच्या सर्व कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केलेले आहेत.

# इंटॅकच्यावतीने मंदिर-वाडा फेरी उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर -**

नुकत्याच झालेल्या ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी सोहळ्याचे औचित्य साधून इंटॅक सोलापूर विभागाकडून वारसा फेरीचे आयोजन केले होते.

वारसा फेरीमध्ये प्रारंभी भडंगे गल्लीतील अभिजीत भडंगे यांचा दुमजली वाडा दाखविण्यात आला. या वेळी सुलेखनकार अक्षर तज्ञ अभिजित भडंगे यांनी सुमारे साडेतीन वर्षापासून अथक परिश्रम करून स्वतःच्या सुंदर हस्ताक्षरात ज्ञानेश्वरी लिहिली, तसेच त्यापूर्वी लिहिलेली गाथा पाहण्याचा आनंद उपस्थितांनी घेतला. या वेळी जेष्ठ पत्रकार अरविंद जोशी यांच्या हस्ते अभिजित भडंगे यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर भंडगे गल्लीतील विठ्ठल मंदिराची संपूर्ण माहिती उपस्थितांनी जाणून घेतली.

मार्गशीर्ष महिन्यातील पहिला रविवार असल्या मुळे विठ्ठलाच्या मूर्तींची खंडोबा रूपातील सुंदर सजावट मंदिराचे पुजारी केशवराव भडंगे यांनी केली होती. त्यानंतर केकडे राधाकृष्ण मंदिराची माहिती केकडे वंशजांनी दिली. मंदिराचा दुमजली लाकडी वाडा, बेल्जियम काचेची झुंबरे, व संगमरवरी सोज्वळ रूपाचे राधा कृष्ण मूर्ती पाहून उपस्थित वारसाप्रेमी भारावून गेले. वारसा फेरीचे नियोजन डॉ सीमंतिनी चाफळकर यांनी केले. यशस्वितेसाठी श्वेता कोठावळे, नितीन अणवेकर यांनी प्रयत्न केले. ऐतिहासिक मंदिर- वाडे पाहण्यासाठी इतिहास अभ्यासक व इंटॅक सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते.

### चंपाषष्ठी निमित्त खंडोबारायाचे रुप

आजची दोनच मंदिराची वारसा फेरी फारच छान झाली. मी ४२ वर्षात प्रथम या भागात गेले. अभिजीत भडंगे यांच्या हस्ताक्षर वर्गविषयी ऐकून होते पण आज त्यांनी स्वहस्ते लिहिलेली ज्ञानेश्वरी बघून थक्क झालो. साडे तीन वर्षाची मेहनत, जिद्द, अथक परिश्रम बघून खूप आनंद झाला. तेथील समोरच रुक्मिणी विठ्ठल मंदिरात आज चंपाषष्ठी निमित्त खंडोबारायाचे रुप बघायला मिळाले. मंदिरांच्या छतावर आकर्षक बेल्जियम काचेची झुंबरे आणि ५० हंड्या बघण्यात आल्या. त्यानंतर बाजूचे केकडे यांचे घरातील राधा कृष्ण मंदिरातील संगमरवरी मूर्ती अतिशय सुरेख होत्या. तेथे पण अत्यंत आकर्षक रंगीबेरंगी बेल्जियम काचेची झुंबरे होती. इंटॅकचे पदाधिकारी चाफळकर, श्वेता कोठावळे आणि नितीन अनवेकर यांचे आभार.- **डॉ. संध्या रघोजी**

# लग्नसराईमुळे बटाट्याला भाव

**बाजार समितीत मिळतोय ३० रुपयांचा दर, दोन महिन्यानंतर येणार नवीन बटाटा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१० डिसेंबर-**



कांद्या पाठोपाठ सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचा बटाटा देखील प्रसिद्ध होत आहे. लग्नसराईमुळे बटाट्याचा भाव सध्या तेजीमध्ये आहे. बाजार समितीत नवीन बटाट्याला सुमारे २५ ते ३० रुपयांपर्यंतचा दर मिळत आहे. तर जुन्या बटाट्याला २५ ते २८ रुपयांचा घाऊक दर मिळत आहे. किरकोळ बाजारात हाच बटाटा सुमारे ४० ते ५० रुपयांपर्यंत विकला जात आहे.

बाजार समितीमध्ये आग्र्यातून बटाटा आयात केला जात आहे. त्यानंतर दिल्ली आणि आता स्थानिक बटाटा देखील बाजारपेठ येथे विक्रीस येणार आहे. आग्र्यातील बटाट्याची आवक अंतिम टप्प्यात आलेली आहे. त्यानंतर दोन महिन्यांच्या विश्रांतीनंतर पुन्हा एकदा दिल्ली आणि स्थानिक शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या बटाटा बाजारपेठेत विक्रीसाठी येईल असे सांगण्यात येत आहे.

सध्या शहर जिल्ह्यात लग्नसराईचा धुमधडाका सुरू आहे. लग्नसराईमध्ये वराडी मंडळींसाठी मिक्स भाजी तसेच बटाटा वडा बनवला जातो. त्यामुळे आचारी वर्गाकडून बटाट्याला सर्वाधिक मागणी आहे. मागणी जास्त व आवक कमी असल्यामुळे बटाट्याचे दर सध्या वाढलेले आहेत.

बाजार समितीमध्ये बटाट्याची आवक कमी झाल्याने दरामध्ये चढ-उतार निर्माण होत आहेत.

### बाजार समितीत पाच ट्रक बटाट्याची आवक

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती मधून आग्र्याहून चार ते पाच ट्रक बटाट्याची आवक होत आहे. आग्र्यातील बटाटा शेवटच्या टप्प्यात आहे. यानंतर दोन महिने बटाट्याचे सीझन नसणार आहे. त्यानंतर स्थानिक आणि दिल्लीतील बटाटा विक्रीसाठी दाखल होईल. मागणी मोठ्या प्रमाणात असल्याने दर वाढ होत आहे.

**-वाहिद चौधरी**, बटाट्याचे व्यापारी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती

### सर्व स्तरातील ग्राहकांची बटाट्याला पसंती

रोजच्या आहारामध्ये बटाट्याची भाजी मोठ्या प्रमाणात केली जाते. घरामध्ये बटाटा सर्वांना आवडतो. बटाटा वडा तसेच मिक्स भाजी करण्यासाठी बटाट्याची खरेदी मोठ्या प्रमाणात केली जाते.

**-राजेश पाटील, ग्राहक**

### बटाटा मागणीत वाढ

लग्नसराई असल्याने लग्न घरात बटाट्याची सर्वाधिक मागणी आहे. त्याच पद्धतीने इतर धार्मिक कार्यक्रम होत असल्याने, बटाट्याची मागणी वाढत आहे. आचारी वर्गातून बटाट्याला सर्वाधिक पसंती दिली जाते. प्रत्येक भाजीसाठी बटाट्याचा वापर होत आहे.

**-पांडूरंग दीक्षित, किरकोळ व्यापारी**



# बाजार समितीत वाढला तुरीचा तोरा

**प्रतिक्विंटल तुरीला मिळतोय ९ हजाराचा भाव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१० डिसेंबर-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथील भुसार बाजारपेठेत सध्या लाल तुरीला चांगला दर मिळत आहे. सर्वसाधारणपणे लाल तुरीला नऊ हजार प्रति क्विंटल एवढा दर मिळत आहे. तर कमीत कमी दर हा ७७०० तर जास्तीत जास्त ९ हजार ३०५ रुपये प्रति क्विंटल इतका दर सध्या बाजारपेठेत शेतकऱ्यांना मिळत आहे. बाजार समितीत दोनशेहून अधिक क्विंटल तुरीची आवक येत आहे.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोलापूर जिल्ह्यासह मराठवाडा आणि आंध्र कर्नाटक तेलंगणा येथील विविध शेतमालाची आवक मोठ्या प्रमाणात येत सध्या सोलापूर बाजार समितीमध्ये सोलापूर जिल्ह्यातील लाल तुरीची आवक येत आहे. तुरीची काढणी सर्वत्र सुरू असल्याने, तुरीची आवक आणखीन वाढेल असे व्यापाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. तसेच तुरीला देखील चांगला दर प्राप्त होत असल्याचे दिसून येत आहे.

### तुरीला मिळतोय दर

सोलापूर बाजार समितीमध्ये लाल तुरीला चांगला दर मिळत आहे. जास्तीत जास्त दर हा ९ हजार प्रतिक्विंटल इतका आहे. सध्या आवक कमी असल्याने दर जास्त आहेत. आवक वाढल्यास दर स्थिर राहतो का कमी होतो. हे पहावे लागेल

**-शिवा कादे,** तुर उत्पादक शेतकरी

### तुरीचे उत्पादन क्षेत्र वाढत आहे

तुरीमध्ये लाल आणि पांढरे अशा दोन प्रजाती असून लाल तुरीला सर्वाधिक मागणी असते. त्यानुसार शेतकरी लाल तुरीची पेरणी मोठ्या प्रमाणात करतो आहे. सध्या तुरीचे उत्पादन क्षेत्र वाढल्याने तुरीचे आवक देखील वाढत असल्याचे दिसत आहे. मात्र तुरीला दर चांगला मिळत आहे. आवक वाढल्यास दर कमी होईल, असे वाटत आहे.

**- बसवराज इटकळे,** व्यापारी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## महापालिकेच्या टॅक्ससंदर्भात सोलापूर विकास मंचची आज बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

सोलापूर महापालिकेच्या करा संदर्भात चर्चा व उपाययोजना करण्यासाठी सोलापूर विकास मंचने तातडीची बैठक बुधवार दि. ११ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता शासकीय विश्रामगृह, सात रस्ता, सोलापूर येथे आयोजित केली आहे. महानगरपालिकेची कर पद्धती ही मुंबई, पुणे, हैदराबाद, बंगळुरूसारख्या महानगरांपेक्षा अधिक असून ती अत्यंत सदोष असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे ना फक्त नागरिकांवर आर्थिक बोजा पडतो आहे. महापालिकेच्या उत्पन्नालाही फटका बसतो आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या सदोष कर पद्धतीमुळे महापालिकेचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे तसेच सामान्य नागरिकांनाही अव्यवहार्य कराचा सामना करावा लागत आहे. या ज्वलंत मुद्द्यावर सोलापूर विकास मंचने चर्चा व उपाययोजना ठरवण्यासाठी तातडीची बैठक आयोजित केली आहे. महानगरपालिकेच्या कर पद्धतीविरोधात पत्रव्यवहार केला असेल, सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने नोटिसा बजावल्या असतील किंवा ज्यांना या विषयाचा अभ्यास असेल असे नागरिक, वकील आणि तज्ज्ञ यांनी या बैठकीत उपस्थित रहावे, असे आवाहन सोलापूर विकास मंचचे सदस्य मिलिंद भोसले, योगिन गुर्जर, केतन शहा, ॲड. दत्तात्रय अंबुरे, मनोज क्षिरसागर, विजय जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.






## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### माव्याच्या टेबलाजवळ तरूणास खल्लास करण्याची धमकी

**सोलापूर. दि. १० डिसेंबर -**

शहरातील मोदी पोलिस चौकीजवळील माव्याच्या टेबलाजवळ तरूणास खल्लास करण्याची धमकी देणाऱ्या तिघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अबुसईद खताळ दंडु (वय ३१, रा. मोदीखाना, मोदी मशिदजवळ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन शुभम गायकवाड, राहुल गायकवाड व एक अनोळखी व्यक्ती (रा. रामवाडी, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ७ डिसेंबर रोजी रात्री नऊच्या सुमारास अबुसईद दंडु हे मोदी पोलिस चौकीजवळील मोसीन शेख याच्या माव्याच्या टेबलाजवळ थांबला होते. त्यावेळी मोटारसायकलचा धक्का लागल्याचे कारणावरून शुभम गायकवाड व त्याच्या साथीदारांनी दंडु यास शिवीगाळ करून हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. यावेळी मी एक मर्डर करून आलो आहे, तुला खल्लास करून टाकीन अशी दमदाटी केली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक संजीवनी व्हट्टे पुढील तपास करीत आहेत.

### महिलेच्या विनयभंगप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर. दि. १० डिसेंबर -**

पाण्याच्या कारणावरून झालेल्या भांडणात महिलेच्या विनयभंगासह मारहाण केल्याप्रकरणी चौघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन विराज शिवशिंगवाले, रविंद्र शिवशिंगवाले, महेंद्र शिवशिंगवाले, सारिका शिवशिंगवाले यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ डिसेंबर रोजी सकाळी नऊच्या सुमारास यातील पिडीता ही विडीचे माप देण्यासाठी जात होती. त्यावेळी पाणी टाकण्याच्या कारणावरून तिचा भाऊ, बहिण व आई यांना विराज शिवशिंगवाले, रविंद्र शिवशिंगवाले, महेंद्र शिवशिंगवाले यांनी लाकडाने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. तसेच पिडीतेचा हात ओढून तिच्या मनाज लज्जा वाटेल असे कृत्य केले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार इनामदार पुढील तपास करीत आहेत.

### धरमशी लाईन येथून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. १० डिसेंबर -**

शहरातील धरमशी लाईन येथून चोरट्याने ३० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत मारूती धोंडीराम रुपनर (वय ६१, रा. अभिमान श्री नगर, ब्लॉक नं. ८, मुरारजी पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २९ नोव्हेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास मारूती रुपनर यांनी त्यांची एमएच १९ बीसी ९६०३ क्रमांकाची दुचाकी ही धरमशी लाईन येथे हॅन्डल लॉक करून पार्क केली होती, ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद फौजदार चावडी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.



### महिलेस विनयभंगासह मारहाण; महिलांसह चौघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर. दि. १० डिसेंबर -**

पाण्याच्या कारणावरून झालेल्या भांडणात महिलेच्या विनयभंगासह मारहाण केल्याप्रकरणी चौघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन अंकुश रामसिंग शिवशिंगवाले, अनिलता परदेशी, लक्ष्मी लंगडेवाले, पार्वती शिवशिंगवाले यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ डिसेंबर रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास यातील पिडीता ही घरात स्वयंपाक करीत होती. त्यावेळी सांडपाणी व घाण टाकण्यावरून पिडीतेच्या पतीला अंकुश शिवशिंगवाले हा लाथाबुक्क्याने मारहाण करीत होता. त्यावेळी पिडीता ही भांडण सोडविण्यास आली असता लाकडी दांडक्याने तिला मारहाण करून तिच्या अंगाशी झोंबाझोंबी करून तिचा विनयभंग केला तर अनिता परदेशी, लक्ष्मी लंगडेवाले व पार्वती शिवशिंगवाले या महिलांनी पिडीतेला लाथाबुक्क्याने मारहाण केली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक साखरे पुढील तपास करीत आहेत.

# बांगलादेशातील हिंदूंना न्याय द्या अन्यथा जशास तसे उत्तर देऊ

### सकल हिंदू समाजाची मागणी

### बांगलादेशाचा झेंडा आणि राष्ट्राध्यक्षांच्या प्रतिमेला जोडोमार करत प्रतिमेचे दहन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१० डिसेंबर-**

सोलापुरात सकल हिंदू समाजाच्या वतीने न्याय यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी सात रस्ता चौक येथील वीर शिरोमणी महाराणा प्रतापांच्या पुतळ्यास आणि छत्रपती शिवरायांचे पूजन करून तेथून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत ही न्याय यात्रा काढण्यात आली. यानंतर बांगलादेश झेंडा आणि तेथील राष्ट्राध्यक्षांच्या फोटोला जोडोमार करत त्याचे दहन करण्यात आले.

बांगलादेशात हिंदूवर अन्याय त्याच्यावर होत आहे हिंदूचे घर जाण्याचे मंदिर पाडण्यात येत आहेत अशा घटना घडत आहे त्यामुळे भारतभर या घटनेच्या निषेधार्थ मोर्चे व आंदोलन करण्यात येत आहेत आज सोलापूर शहरांमध्ये हिंदू संघटनेतर्फे न्याय यात्रा काढण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने हिंदू बांधवांनी विविध मागण्या सरकार समोर मांडले आहेत येणाऱ्या काळामध्ये बांगलादेशमध्ये होणारे हिंदू वरती अन्याय अत्याचार हे थांबले गेले पाहिजे अन्यथा याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील असे सरकारला इशारा देखील यावेळी दिला आहे.

बांगलादेशातील हिंदूंवर अत्याचार करणाऱ्या मुस्लिमांना इस्कॉन मंदिर अन्नदान कपडे वाटप करून त्यांना करोना काळात सांभाळलं होतं. नैसर्गिक आपत्ती आल्यानंतर इस्कॉन मंदिरातील चिन्मय कृष्णदास आणि हिंदू बांधवांनी मुस्लिमांना नेहमी मदत केलेली आहे. हिंदूवर अत्याचार करणे ही इस्लामची संस्कृती आहे का असे म्हणत सकल हिंदू समाज न्याय यात्रेचे आयोजक सुधाकर बहिरवाडे यांनी प्रश्न उपस्थित केला. यावेळी सकल हिंदू समाज न्याय यात्रेस विश्व हिंदू परिषदेच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांत मार्गदर्शक मंडळाचे सदस्य ह.भ.प लक्ष्मण महाराज चव्हाण, आमदार देवेंद्र कोठे, भाजपा शहराध्यक्ष नरेंद्र काळे, शिवसेनेचे नेते पुरुषोत्तम बरडे, हिंदू महासभेचे शहर अध्यक्ष सुधीर बहिरवाडे, अंबादास गोरंटला, बजरंग दल नागेश बंडी, हिंदुराष्ट्र सेना रवी गोणे, ओमसाई प्रतिष्ठानचे शिवराज गायकवाड, राजु हौशेट्टी, टेम्पलचे पवन हरीनामदास, बालयोगी सज्जन महाराज, सतीश आनंदकर, समर्थ बंडे, तेजस शहा, आनंद मुसळे, महिला सदस्य रोहणी तडळवकर, विजया वडेपल्ली, श्रीकांचना यन्नम, नरसुबाई गदवालकर, अश्विनी चव्हाण, लतेश हिरवें, अर्जुन मोहिते, नंदकुमार झवर, ओंकार चव्हाण, विशाल पवार यांच्यासह हजारो हिंदू बांधव युवक महिला वकील, इंजिनिअर, आर्किटेक्चर, डॉक्टर, व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हिवाळी अधिवेशनात हा विषय मांडू : आ. कोठे

यावेळी बोलताना भाजप आमदार देवेंद्र कोठे म्हणाले, बांगलादेशांमधील हिंदूंचा आवाज आम्ही हिवाळी अधिवेशनात मांडू आणि त्यांना न्याय देण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा करू. महाराष्ट्रातील आणि भारतातील बांगलादेशी घुस्कोरांना हाकलून लावू. हिंदूंसाठी देशभर एकतेचे आंदोलन उभा करू.

## वृद्ध बांधकाम व्यावसायिकाची फसवणूक करणाऱ्या चौघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.१० डिसेंबर-**

येथील प्रसिध्द वृध्द बांधकाम व्यावसायिकासह शासनाची फसवणुक करणाऱ्या चौघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत किशोर वल्लभ चंडक (वय ७०, रा. जे एन हॉस्पीटल, पार्क चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शमीम फरदीन शेख, फारूख महिबूब डोंगरी, म. सलीम इलाहीबक्ष शेख, तौसिफ जब्बार शेख (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील संशयित आरोपी शमीम शेख यांनी १३ डिसेंबर २०२२ ते २४ जानेवारी २०२४ या कालावधीत मजरेवाडी येथील सर्व्हे नं. ११/१ब/२ब/प्लॉट नं. ५६ व ५७ क्षेत्र २२३.८६ चौमी या मिळकतीचा दस्त क्र. ६००१/२००० दि. १३ डिसेंबर २००० रोजीचा खोटा दस्त दुय्यम निबंधक कार्यालयात तयार केला. त्यानंतर आरोपींनी हा खोटा दस्त खरा म्हणून मंडल अधिकारी मजरेवाडी कार्यालय येथे खोटा अर्ज व दस्ताची कागदपत्रे सादर केला. या खोट्या कागदपत्रांवरून फेरफार क्र. ६५१२३ व ७/१२ उताऱ्यावर नोंद घेतली व दस्ताच्या आधारे स्वतःचे नाव लावून घेतले. त्यानंतर शमीम शेख याने फारूख डोंगरी (दस्त क्र. २४३१/२०२१), म. सलीम शेख (दस्त क्र. ३५७३/२०२२) आणि तौसिफ शेख (दस्त क्र. ५५०/२०२४) शहरातील प्रसिध्द बांधकाम व्यावसायिक किशोर चंडक यांच्याशी संगनमत करून किशोर चंडक यांचे प्लॉट अनधिकृत व बेकायदेशीर खरेदी - विक्रिचा व्यवहार करून चंडक व शासनाची फसवणुक केली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक साखरे पुढील तपास करीत आहेत.








## राजस्थानी मंडळातर्फेनेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर उद्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

श्री राजस्थानी विकास मंडळ व ओम सच्चिदानंद वाचनालयाच्या वतीने मंडळाचे माजी अध्यक्ष विश्वनाथ करवा यांच्या स्मरणार्थ गुरुवार दि. १२ डिसेंबर रोजी सकाळी १० ते ११.३० वाजेपर्यंत गरीब, गरजू व्यक्तींसाठी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष माणिकचंद डागा यांनी पत्रकार परिषदेत दिली. सोलापूर शहरातील कस्तुरबा मंडईच्या माडीवरील ओम सच्चिदानंद वाचनालयात हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. नीलकंठ को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन विजय उपाध्ये यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन होणार आहे. नंदा करवा परिवार यांच्या सहकार्याने गेल्या सहा वर्षांपासून हे शिबिर घेण्यात येते. मिश्रीबाई गुलाबचंद तोष्णीवाल नेत्रपेढीचे डॉ. नवनीत तोष्णीवाल हे या शिबिरात तपासणी करणार आहेत. या शिबिरात नोंदणीसाठी संबंधितांनी ९२ २६ २० ६४ ३२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. जास्तीत जास्त लोकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष माणिकचंद डागा आणि सचिव कल्पेश मालू यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस नंदा करवा, श्रीगोपाल मंत्री, शरद कालानी, निकिता करवा आदी उपस्थित होते.

# रेल्वे मार्गात बाधित होणाऱ्या यश नगरातील रहिवाशांचा आक्रोश



### नियोजित सोलापूर-धाराशिव रेल्वे मार्ग प्रकरण

### बिल्डर ऐवजी थेट रहिवाशांच्या नावे मोबदला जमा करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० डिसेंबर-**

नियोजित सोलापूर-धाराशिव रेल्वे मार्गातील यश नगरातील बाधित होणाऱ्या रहिवाशांना थेट भूसंपादन नुकसान भरपाई मिळण्यात डॉ. आडके हे तक्रारी करून अडचणी निर्माण करीत आहेत असा आरोप करत शरद मुथा हाउसिंग डेव्हलपर व्यवस्थापकाना हमीपत्र देण्याचे आदेश द्यावेत. नुकसान भरपाईची रक्कम बिल्डरच्या नावे न देता थेट रहिवाशांच्या नावे जमा करावी अन्यथा आम्हाला आत्मदहनाशिवाय पर्याय नाही, असा इशारा बाधित रहिवाशांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.


या पत्रकार परिषदेत अरविंद धाम समोरील उमा गृहनिर्माण हाउसिंग सोसायटी यश नगर भाग २ , सोलापूर येथील बाधित रो हाऊस धारकांनी आपली कैफियत मांडली. या मागण्यांसंदर्भात येथील दहा रहिवाशांनी सोलापूर जिल्हाधिकारी पोलीस आयुक्त सोलापूर डिव्हिजन रेल्वे मॅनेजर आणि आमदारांना निवेदन दिले असल्याचे संतोष जाधव आणि संतोष अंजीखाने यांनी सांगितले. सोलापूर-धाराशिव या नियोजित रेल्वे मार्गात आम्हा रहिवाशांची घरे बाधित झाली आहेत. त्याचा मोबदला आम्हा रो हाऊस धारक रहिवाशांनाच मिळाला पाहिजे. मात्र यामध्ये डॉ. संदीप आडके हे खोट्या तक्रारी करून आमच्या सर्व कुटुंबियांना नुकसान भरपाई मिळण्यात अडचणी निर्माण करीत आहेत. यामध्ये आडके हे कागदपत्रे सादर करत नाहीत. याप्रकरणी डॉ. आडके यांची संपूर्ण चौकशी करण्यात यावी. आम्ही या जागेवरील बिल्डर शरद मुथा यांच्या रो हाउस घराचे रीतसर अग्रीमेंट करून कुटुंबासहित राहत आहोत. या परिसरामध्ये रेल्वे मार्गात आमची घरे कायमची जात आहेत. त्यामुळे आमच्या समोर स्थलांतराचा गहन प्रश्न उभा राहिला आहे. बद्दलची रक्कम रो हाऊस धारकांना देण्यास हरकत नाही असे हमीपत्र बिल्डर शरद मुथा हाउसिंग डेव्हलपर यांच्याकडून लेखी सादर करण्याचे आदेश द्यावेत अन्यथा या डेव्हलपरचे व्यवस्थापक गांधी यांच्याविरुद्ध कारवाई करावी, अशी मागणीही यावेळी संतोष जाधव आणि संतोष अंजीखाने यांनी केली आहे. या पत्रकार परिषदेस अनिल जाधव, विजय भोसले, शैला खुर्द, बापू गायकवाड, आकाश जगताप, राहुल मोरे आदींसह संबंधित रहिवासी उपस्थित होते.

### आत्मदहनाशिवाय पर्याय नाही

रेल्वे मार्गामुळे आधीच आमचे कुटुंब रस्त्यावर आले आहे. घरे रिकामी करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने तीन महिन्याची मुदत दिली आहे. आम्हाला रेल्वेचे अधिकारी घरी येऊन याविषयी वारंवार सूचना देत आहेत. त्यामुळे बाधित रहिवासी हवालदिल झाले आहेत. कोणत्याही परिस्थितीत बिल्डरच्या नावे मोबदला न देता थेट रहिवाशांना मोबदला मिळावा. आम्हाला न्याय न मिळाल्यास आमची घरेही जातील व पैसेही जातील. आमचा संसार उघड्यावर पडणार आहे. त्यामुळे आत्मदहन करण्याशिवाय पर्याय नाही. तेव्हा जिल्हाधिकारी, रेल्वे प्रशासन आणि पोलीस आयुक्तांनी न्याय द्यावा, अशी मागणीही यावेळी संतोष जाधव आणि संतोष अंजीखाने यांनी केली आहे.

# उजनीच्या काठावर पाणपक्ष्यांची विणीसाठी लगबग

### वारकरी पक्षी नवजात पिल्लांच्या संगोपनात व्यस्त





**तभा वृत्तसेवा । नंदकिशोर वलटे**
**करमाळा, दि.१० डिसेंबर-**

सोलापूर व पुणे जिल्ह्याला वरदायिनी ठरलेल्या तसेच देशी विदेशी पक्ष्यांसाठी नंदनवन ठरलेल्या उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पाणवनस्पतींच्या गचपणात वारकरी हे पाणपक्षी आपल्या वंशाभिवृद्धीसाठी सरसावल्याचे दृश्य नजरेस पडत आहे.मासेमारी व्यवसाय करणाऱ्या कोळी बांधवांना अनेक ठिकाणी पाणवनस्पतींची दाटीवाटीत त्यांची अंडी- पिल्ले दिसून येत आहेत.

इंदापूर तालुक्यातील पळसदेवतसेच करमाळा तालुक्यातील टाकळी,कोंढार चिंचोली शिवारातील जलाशयाच्या पाणीपुरवठ्याच्या काठावर वाढलेल्या पाणकणिस या जलवनस्पतीच्या गचपणीत वारकरी या जलपक्ष्यांची घरटी,अंडी पिल्लं स्थानिक मत्स्य व्यवसायक प्रवीण नगरे यांना आढळून आले. नामधारी या नावानेही ओळखले जाणारे हे पाणपक्षी समूहाने अंडी पिल्लांच्या संगोपनात मग्न असल्याची माहिती मच्छिमार लक्ष्मण नगरे यांनी दिली आहे.

**वारकरी पक्ष्याचे वैशिष्ट्ये**

काळाकुट्ट शरीराच्या या पक्ष्याच्या कपाळावर पांढरा शुभ्र नाम असतो.या कारणामुळे या पक्ष्याला वारकरी व नामधारी असे नाव पडले आहेत. चांदवा किंवा चांदणी या नावानेही या जलपक्ष्याला ओळखतात. इंग्रजीत याला कूट (ऊें) असे नाव आहे.या पक्ष्याचे संपूर्ण शरीर काळपट पिसाने झाकलेले असते कपाळावर चांदी सारखा टिळा असतो चोच हस्ती दंतासारखी पांढरी शुभ असते कपाळावरील केल्यामुळे याला चांदणी किंवा चांदवा या नावाने ओळखतात. हे पक्षी पोहण्यात तरबेज असतात पाण्यात तरंगताना किंवा बुडताना दुरून पाहिले की हे बदकासारखे दिसतात परंतु हे बदकांच्या गणात मोडत नाही.

या पक्ष्यांमध्ये मिलनकाळ आक्टोबर - नोव्हेंबर मध्ये असतो. या काळात नर व मादी दोघे मिळून पाणवठ्याच्या काठावर सुरक्षित ठिकाण पाहून घरटे तयार करतात. मादी त्यात चार-पाच राखाडी रंगाची मध्यम आकाराच्या अंडी ठेवते. महिनाभराच्या उबवणीनंतर पिल्ले या ठिकाणी दिसून येतात. सध्या पळसदेव (ता.इंदापूर) व टाकळी कोंढार चिंचोली (ता.करमाळा) परिसरात वारकरी पक्ष्यांची पिल्ले मुक्त विहार करताना नजरेस पडतात. भारतभर आढळणारे हे पक्षी पाणगवताचे कोंब, अंकुर, कोवळे खोड, पाणकणिसाची नवी पालवी व पाण्यातील तण, वनस्पतींचे मृदु भाग या खाद्यांवर गुजराण करतात. याचबरोबर जलकीटक व कृमी, बारीक शंख शिंपले, गोगलगायी, बेडूक व त्यांची अंडी पिल्ले वारकरी पक्षी आपले भक्ष्य बनवतात.अन्न मिळविण्यासाठी हे पक्षी पाण्यात बदकांप्रमाणे सारखे सूर मारत राहतात.स्थलांतरित पट्टकदंब, ब्राह्मणी बदक,परी बदक,चक्रांग व स्थानिक पाणबुडी, हळदीकुंकू बदक, पाणकोंबडी या विविध पक्ष्यांशी सलगी करत वावरतात.

प्रदूषित पाण्याचे द्योतक म्हणून ओळख असलेल्या वारकरी पक्ष्यांचा सध्या विणीचा काळ आहे. उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रासह जिल्ह्यातील हिप्परगा तलाव,अष्टीचे ऐतिहासिक तलाव, पंढरपूरच्या यमाई तलाव आदी ठिकाणी हे जलपक्षी आपल्या पिल्लावळींच्या संगोपनात मग्न असल्याचे चित्र दिसते. स्थानिकांनी या पक्ष्यांच्या अस्तित्वात बाधा न आणता त्यांच्या वंशाभिवृद्धीसाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत.

**- डॉ.अरविंद कुंभार, पक्षी व पर्यावरणाचे ज्येष्ठ अभ्यासक.**

मध्य युरोप आणि हिमालयाच्या रांगातून दरवर्षी अनेक पक्षी आवर्जून पूर्वीचे उजनी जलाशयावर हजेरी लावतात. साधारणपणे नोव्हेंबरच्या सुरुवातीला रोजी सरलाईन,कॉमन चिपचॉप,कॉमन सॅड पायपर,ऍसिड रंगो आदि वेगवेगळ्या जातीचे,रंगाचे,आकाराचे पक्षी येत असतात.

**-कल्याणराव साळुंके,पक्षीप्रेमी, कुभेज, करमाळा**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## ज्ञानामृत आनंदलहरी - ९७१

**तुका म्हणे सेखीं स्मशान तें वरी ।**
**संबंध गोवरी आगीसवें ।।**

रिक्त हाताने जन्माला येणारा माणूस रिक्त हातानेच जात असतो. हे सर्वांना माहिती आहे. तरीपण आयुष्यभर या हाताने नको तेवढी व नको ती जमवा-जमव माणूस करीतच असतो. इतर गोष्टी तर सोडाच पण हा देहसुध्दा टाकून द्यावा लागतो, याचीही जाण माणसाला असते. मी, माझे म्हणणारा हा माणूस आयुष्यभर विविध गोष्टीवर, व्यक्तिंवर आपला अधिकार गाजवत असतो. पण सरतेशेवटी स्वत:च्या देहावरही त्याला अधिकार गाजविता येत नाही. ज्या देहाच्या लालन-पालनासाठी वाट्टेल ते केले, त्या देहाचे एक-एक अवयव माणसाची साथ सोडू लागतात. माझ्यासाठी आयुष्यभर खूप केलेस आता मी तुझी साथ सोडू का? असेही हे अवयव, इंद्रीय माणसाला विचारत नाहीत. आई-वडील, बहिण-भाऊ, पती-पत्नी, सगे-सोयरे, ईष्ट-मित्र, मुले यांपैकी कोणीही मृत्यूसमयी मदत करीत नाहीत. मृत्यूनंतर स्वत:चे घर-दार, संपत्ती सर्व कांही जिथल्या तिथे टाकून जावे लागते. हा देहसुध्दा दुसऱ्यांच्या खांद्यावर द्यावा लागतो. अर्थात, सर्व गोष्टींपासून परावलंबित्व पत्करावे लागते. हा परत्वलंबी झालेला देह शेवटी स्मशानात जातो. मी-मी म्हणून जोपासलेल्या या देहाचे गोवऱ्या आणि आगीशी लग्न लागते. अर्थात, या देहाची गोवऱ्या,आग यांच्याशी एकरुपता होते. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात, तुका म्हणे सेखीं स्मशान तें वरी । संबंध गोवरी आगीसवें ।।



तुकाराम महाराज

कांही लोकांना तर स्मशानही प्राप्त होत नाही. कोठेतरी घाणीमध्ये किंवा नको त्या ठिकाणी देह पडून सडून जातो. कांहींना तर अत्यंत वाईट मरण येते. अनेकांच्या चितेला अग्नी द्यायलाही कोणी मिळत नाही. ज्याला कोणीच नाही, असा माणूस सापडणे कठीण आहे. प्रत्येकाला कोणीतरी नातेवाईक, सगे-सोयरे, मित्र असतातच. पण असे सर्व असूनही अनेकांच्या नशिबी मृत्यू हा सर्वांपासून दूर अशा ठिकाणी येऊ शकतो. बरेच लोक आपल्यांपसून दूर गेलेले असतात. आपण कोठे, केव्हा, कसे मरणार याचे ज्ञान आपणालाही नसते. चार लोक येऊन आपली मूठ-माती करतील का ? याबद्दल कोणालाही निश्चितपणे सांगता येत नाही. हे सत्य असले तरी, अनेक लोक असे म्हणतात की, माझ्या चितेला.. याला अग्नी देऊ देणार नाही. माझ्या मातीला.. याला येऊ देणार नाही. खरे म्हणजे मृत्यूसमयी आपल्या हाती कांहीच नसते. त्यामुळे कोणाला येऊ देण्याचा किंवा रोखण्याचा आपणाला अधिकार असण्याचा प्रश्नच उद्धवत नाही. मृगजळाप्रमाणे माणूस नको त्या खोट्या गोष्टीच्या मागे लागत आयुष्य घालवतो. आयुष्यभर अशा धावण्यात एके दिवशी मृत्यूच्या सापळयात अडकतो. ज्यासाठी तो धांवत होता, त्यांपैकी त्याला कांहीही प्राप्त होत नाही. कारण खऱ्या प्राप्तीचा विषयच त्याला समजलेला नसतो. माया, मोह, मत्सर, द्वेष, ईर्षा, अहंकार, काम-क्रोध हे एक प्रकारचे मृगजळच आहे. हा देह नाशवंत असल्याची जाण अगोदरच असेल तर मृत्यूसमयी माणसाला वाईट वाटणार नाही. आपण कोण आहोत? याचा खरा परिचय झाला तर माणूस माया-मोह, मत्सर, द्वेष, अहंकार आदीमध्ये अडकणार नाही. म्हणून माणसाने मृगजळाला खरे जल न समजता खऱ्या जलाचा म्हणजे स्वत:चा खरा परिचय करुन घ्यावा. आयुष्यभर वाईट केले तर त्याचा परिणामही वाईटच होणार असतो. वाईट करुन वाईट भोगत बसण्यापेक्षा वाईट न केलेलेच बरे. तारुण्यात मीचा जोर जास्त असतो. म्हातारपणी पराधिनता येऊ लागली म्हणजे सर्व आठवू लागते. तेव्हा आपल्या हाती कांही नसते. म्हणून आत्तापासूनच चांगले वागलेले बरे असते. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - |
| दि. ११ डिसेंबर २०२४ | मोक्षदा एकादशी |
| विक्रम संवत् २०८०-८१ | गीता जयंती |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. एकादशी - (२५.०९) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - रेवती (११.४७) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वरियन (१८.४७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (१४.२८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** नवीन योजना कार्यान्वित होऊन त्या यशस्वी होतील. कायदेशीर वाद विवादातून योग्य मार्ग निघेल. कार्यक्षेत्रात प्रगती राहील. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका.

**वृषभ :** आगोदर केलेल्या कामाचा आज आपल्याला निश्चितच फायदा होणार असून आर्थिक आवक वाढणार आहे. मान सन्मानाचे योग संभवतात.

**मिथुन :** विचार पूर्वक कामे केली तर आजच दिवस चांगला जाईल. आपल्या कामाची स्तुती होईल. कौटुंबिक संबध सुधारतील. दुसऱ्याची निंदा करण्याचे टाळावे.

**कर्क :** कौटुंबिक समस्या आणि स्थावर मालमत्ता या संबंधीतील समस्या दूर होतील. समाजात प्रतिष्ठा मिळाल्याने आनंदी रहाल.

**सिंह :** व्यवसायामध्ये अनकूल अशी सफलता मिळेल. येणाऱ्या खर्चामुळे चिंतेत रहाल.

**कन्या :** देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधपणा ठेवा. मुलांच्या बाबतीत काळजी वाटेल. देवाधर्मावरील विश्वास वाढेल.

**तुळ :** व्यापार, व्यवसाय चांगला राहील. महत्वाचे काम हाती घेतले असेल तर ते पूर्ण होण्याचे योग आहेत. वाईट सवयींपासून दूर रहा. प्रवास यशस्वी होऊन आनंददायी राहील.

**वृश्चिक :** नवीन योजना आखल्यामुळे निश्चितच फायदा होणार आहे. मानसिक शांती मिळेल. सहचरणीची साथ लाभेल. मुलांच्या नौकरीची चिंता राहणार आहे. आर्थिक स्थिती मध्यम राहील.

**धनु :** आत्मविश्वासामध्ये वाढ झाल्याने काम सहजतेने काल. लक्ष दिले असता घरातील समस्या दूर होतील. प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका.

**मकर :** भांडण, वादविवादामुळे मानसिक ताण वाढेल. आर्थिक स्थिती मध्यम राहील. पारिवारीक सहकार्याने कामात यश मिळेल.

**कुंभ :** मुलांच्या प्रगतीमुळे मन प्रसन्न राहील.

**मीन :** कामकाजामध्ये वाढ होईल अनकुल स्थिती राहणार आहे. वेळेचा उपयोग करून आपल्या आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने कामकाजाला सुरूवात करा.

# 'आपले सरकार' सेवा केंद्राकरिता जिल्ह्यातील ३३० रिक्तपैकी ३१८ उमेदवारांची निवड

- आरडीसी मनिषा कुंभार यांची माहिती
- १२ केंद्रांसाठी सुनावणीनंतर होणार निवड
- पात्र,अपात्र उमेदवारांची यादी संकेतस्थळावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

आपले सरकार सेवा केंद्राकरिता आलेल्या अर्जांपैकी २ हजार ४०९ उमेदवार पात्र ठरले असून, ५८९ उमेदवार अपात्र ठरले होते. पात्र उमेदवारांच्या यादीमधून एकूण ३१८ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. उर्वरीत आपले सरकार सेवा केंद्राकरिता अर्ज प्राप्त न होणे, अर्जदार स्थानिक नसल्याने सर्व उमेदवार अपात्र ठरणे प्राप्त होणे याबाबीमुळे सदरच्या केंद्राकरिता उमेदवारांची निवड करणेत आलेली नाही, दरम्यान, १२ केंद्रांच्या उमेदवारांच्या बाबतीत तक्रार अर्ज प्राप्त झाल्यानं त्याबाबत सुनावणी अंतीम निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये दिली आहे. दरम्यान, आपले सरकार सेवा केंद्रांबाबत पात्र अपात्र आणि निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची यादी/ केंद्रांची यादी ins://solapur.gov.in या वेबसाईटवर पाहण्यास उपलब्ध असल्याचेही त्यांनी नमूद केले.

माहिती व तंत्रज्ञान (साप्रवि) मंत्रालय, यांच्या आदेशान्वये आपले सरकार सेवा केंद्राबाबत केंद्र शासनाच्या CSC २.० अंतर्गत मार्गदर्शक सूचना नमूद केल्या आहेत. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातील एकूण ३३० रिक्त आपले सरकार सेवा केंद्राची यादी दि. २६.०७.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून, दि. १२ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०२४ पर्यत अर्ज सादर करणेची मुदत देण्यात आली होती.

त्यास अनुसरून आपले सरकार सेवा केंद्र मंजुरीकरिता एकूण २ हजार ९९८ अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाले आणि जाहिरनाम्यातील खालीलप्रमाणे नमूद अटी व शर्तीनुसार सर्व प्राप्त २ हजार ९९८ अर्जाची छाननी करून पात्र व अपात्र उमेदवारांची अंतिम निवड यादी दि. ३ डिसेंबर २०२४ रोजी तयार करण्यात आली. त्याच दिवशी अंतिम निवड यादी जिल्हा सेतू समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आली. त्यामध्ये २ हजार ४०९ उमेदवार पात्र ठरले असून, ५८९ उमेदवार अपात्र ठरले आहेत. पात्र उमेदवारांच्या मधून एकूण ३१८ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे.

उर्वरीत आपले सरकार सेवा केंद्राकरिता अर्ज प्राप्त न होणे, अर्जदार स्थानिक नसल्याने सर्व उमेदवार अपात्र ठरणे प्राप्त होणे याबाबीमुळे सदरच्या केंद्राकरिता उमेदवारांची निवड करणेत आलेली नाही, तसेच (१३ केंद्रांच्या उमेदवाराच्या बाबतीत तक्रार अर्ज प्राप्त झाल्यानं त्याबाबत सुनावणी अंती निर्णय घेण्यात येणार आहे. यामध्ये आपले सरकार सेवा केंद्रासाठी पुढील बाबींच्या आधारे पात्रता ठरविण्यात आली आहे. यामध्ये अर्जदार स्थानिक रहिवासी असावा, किमान शैक्षणिक पात्रता १० पास असावी, पात्रतेनंतर आपले सरकार सेवा केंद्रासाठी प्रसिध्द करणेत आलेल्या गावाच्या भौगोलिक क्षेत्रातील सीएससी केंद्रधारकांना/ संबंधित तालुक्यातील सीएससी केंद्रधारकांना प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच त्यांच्या सीएससी केंद्रातून दिलेल्या सर्वाधिक व्यवहारांच्या संख्यानुसार निवड करण्यात आली आहे. या निकषाच्या आधारे निवड करण्यात आलेल्या केंद्रांची संख्या २५० आहे. एखादया गावासाठी सीएससी केंद्रधारकांचे अर्ज प्राप्त नसतील तर एकापेक्षा जास्त उमदवार पात्र ठरत असल्यास त्याकरिता उच्चतम शैक्षणिक पात्रतेच्या आधारे निवड करणेत आली आहे. या निकषाच्या आधारे निवड करणेत आलेल्या केंद्रांची संख्या ३५ आहे. पात्र उमेदारांमध्ये समान उच्यतम शैक्षणिक पात्रता असणाऱ्या उमेदवारांच्या मध्ये वयाच्या ज्येष्ठतेनुसार पात्र उमेदवाराची निवड करण्यात आली आहे. या निकषाच्या आधारे निवड करणेत आलेल्या केंद्रांची संख्या ३३ आहे. आपले सरकार सेवा केंद्राचा यापूर्वीचा २०० केंद्रांचा जाहिरनामा २०२१ साली प्रसिध्द करण्यात आला होता. तदनंतर प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर जुलै २०२४ साली ३३० केंद्राकरिता आपले सरकार सेवा केंद्राची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. सदरची निवड प्रक्रीया ही जिल्हा प्रशासनामार्फत संपूर्ण पारदर्शकपणे व गुणवत्तेच्या निकषांच्या आधारे राबविणेत आली आहे.

# जिल्हा मध्यवर्तीच्या बड्या थकबाकीदारांचे प्रशासनाला टेंशन!

- वसुलीच्या कार्यवाहीकडे लागले जिल्ह्याचे लक्ष
- कर्जदारांना 'राजकीय गॉडफादर' मिळाल्यास वसुलीचा होणार उडणार का फज्जा?



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या ३५ कर्जदारांकडे तब्बल २३८ कोटी रुपये ४४ लाख मुद्दल, त्यावरील व्याज, दंड आणि प्रोसिजर असे मिळून जवळपास ११०३ कोटी रुपये थकीत आहेत. ही थकीत असलेली रक्कम कशा पद्धतीने वसूल करायची? याचे टेन्शन प्रशासन आणि प्रशासकांना आले असल्याची चर्चा सध्या सुरू आहे. दरम्यान, या कर्जदारांना सत्तेतील राजकीय गॉडफादर मिळाल्यास मात्र वसुलीचा फज्जा उडतो की काय? अशीही भीती वसुलदार अधिकाऱ्यांना वाटत असल्याची चर्चा शेतकरी सभासद करू लागले आहेत.

डीसीसीला शेतकरी आणि सर्व सामान्याची बँक म्हणून ओळखले जाते. या बँकेचे कर्ज घेऊन राजकिय नेते मोठे उद्योगपती झाले. याच उद्योगपतींनी आपली संस्था, कारखाने, दूध संस्थांना कोणत्याही प्रकारचे तारण न घेता स्वत:चा फायदा करून घेण्यासाठी भले मोठे कर्ज घेतले. असे जिल्ह्यातील ३५ हुन अधिक नेते,पदाधिकारी यांच्याकडे २३८ कोटी ४६ लाखाचे मुद्दल, व्याज व इतर काही रक्कम थकीत आहे. प्रशासक येताच थकीत रकमा वसुलीसाठीचा प्रयत्न सुरू झाला. चौकशी आणि कारवाई करण्यासाठी तब्बल ६ वर्षाच्या कालावधीनंतर वसुली करण्यात यावी म्हणून सहनिबंधक योगीराज सुर्वे यांनी आदेश काढून अध्यादेशाची प्रत सोलापूर जिल्हा प्रशासनास पाठविली आहे. यामुळे आता प्रश्न पडला आहे की, या बड्या नेत्यांची वसुली कोण करणार? कोणत्या नेत्यांपासून करायचा वसुलीचा श्री गणेशा? आता अजून कोणाच्या आदेशाची प्रशासन वाट पाहणार? असे विविध सवाल सभासद आणि शेतकऱ्यांतून उपस्थित केले जात आहेत.



# पुणे विभागीय युवा महोत्सवात सिंहगड इन्स्टिट्यूट उपविजेते

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आयोजित पुणे विभागीय युवा महोत्सव २०२४ मध्ये एनबीएन सिंहगड इन्स्टिट्यूटने विज्ञान व तंत्रज्ञान नवसंकल्पना या प्रकारात द्वितीय क्रमांक पटकाविला. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

क्रीडा व युवक सेवा, संचालनालय पुणे, क्रीडा मंत्रालय भारत सरकार व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर द्वारा आयोजित पुणे विभागीय युवा महोत्सव २०२४ सोमवारी (ता.९) डॉ. फडकुले सभागृहात पार पडला. यात सांस्कृतिक, कौशल्य विकास आणि नवसंकल्पनावर आधारित विज्ञान व तंत्रज्ञान स्पर्धा पार पडल्या.

या विज्ञान प्रदर्शनात सिंहगड इन्स्टिट्यूटच्या आदित्य बनसोडे, रितेश सुलाखे, ओंकार जगताप या तीन विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून आभासी माउस हा प्रकल्प सादर केला. यास विभागीय स्तरावर द्वितीय क्रमांक मिळाला. संघ व्यवस्थापक म्हणून सिंहगड इन्स्टिट्यूटचे प्रो. एस. एस शाखापुरे यांनी काम पाहिले. या यशाबद्दल संस्था सहसचिव संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. आर टी व्यवहारे यांनी कौतुक केले आहे.

# शालेय गटात पंढरपूरचे अरिहंत स्कूल प्रथम

**भगवान महावीर अहिंसा राज्य प्रश्नमंजुषा स्पर्धा** | **अन्य गटात वालचंदची बाजी**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

भगवान महावीरांच्या अहिंसा, सहिष्णुवाद, सर्वोदय तत्वज्ञानाचा प्रचार-प्रसार व्हावा या हेतूने ऐ.प.दि.जैन पाठशाळेच्या वालचंद महाविद्यालय (स्वायत्त) व हिराचंद नेमचंद महाविद्यालय संचालित भगवान महावीर स्टडी सेंटर व श्री भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय अहिंसा तत्त्वज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा शनिवार ७ डिसेंबर २०२४ रोजी भव्य उत्साहात संपन्न झाली. आज विश्व महायुद्धाच्या उंबरठ्यावर आहे. अशावेळी अहिंसा, सत्य, अचौर्य, अपरिग्रह, ब्रम्हचर्य ही भगवान महावीरांची पंचसूत्री अत्यंत आवश्यक आहे असे डॉ. आदर्श मेहता यांनी उद्घाटन सत्रात विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रप्रमुख प्रो. महावीर शास्त्री यांनी केले आहे.


कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थिनी नैना मुटकरीने णमोकार पठणाने, लक्ष्मी बांगरने सुमधुर बासरी वादन केले. अरुण धुमाळ, अरुण उपाध्ये, सौ. दीपा शहा, सौ. श्रेया शहा, विजयकुमार काळेगोरे, पं. अनंत बळ्ळे, नेमचंद आग्रे, श्रेयांस पंडित, राहुल उपाध्ये हे या विविध गटांसाठी परीक्षक म्हणून लाभले. सांस्कृतिक कार्यक्रमात डॉ माधुरी शास्त्री यांच्या मार्गदर्शनात लक्ष्मी मसरे, नंदिनी बोला, कीर्ती पाथरूट, सृष्टी दोरनाळ, स्नेहल गोन्याल, कृष्णवेणी ज्यांनी अहिंसा एकतेवर नृत्य सादर केले. या कार्यक्रमाचे आभार स्पर्धा समन्वयक श्रेराज पंडित, सूत्रसंचालन रवींद्र काळे व चेतन तुपकर यांनी केले. या कार्यक्रमास प्रतिष्ठानचे सेक्रेटरी प्रदीप पंडित प्राचार्य डॉ सत्यजित शहा, प्राचार्य अश्विन बोंदार्डे, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक जीवराज कस्तुरे डॉ चंद्रकांत चव्हाण, डॉ आनंद महाजन, डॉ संगमेश्वर नीला यांच्यासह विविध संस्थांचे शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**● प्रौढ गटात वीरसागरनगर स्वाध्याय मंडळ पंढरपूर प्रथम**

- **शालेय गट -** प्रथम-अरिहंत पब्लिक स्कूल-पंढरपूर, द्वितीय-श्री दिगंबर जैन प्रशाला सोलापूर, तृतीय-बी. एफ दमाणी प्रशाला, उत्तेजनार्थ-सेंट जोसेफ स्कूल, देशभूषण कुलभूषण हायस्कूल-कुंथलगिरी-धाराशिव, भारती विद्यापीठ.
- **कनिष्ठ महाविद्यालयीन गट-** प्रथम- वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स, द्वितीय-एस व्ही सी एस ज्युनिअर कॉलेज, तृतीय- मातोश्री गंगुबाई केकडे कॉलेज, उत्तेजनार्थ- सेवासदन हायस्कूल.
- **वरिष्ठ महाविद्यालयीन गट-** प्रथम- डब्ल्यू आय टी कॉलेज, द्वितीय- शेठ गोविंद रावजी आयुर्वेदिक महाविद्यालय, तृतीय-वालचंद कॉलेज , उत्तेजनार्थ -एच. एन. कॉलेज, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ कन्नड विभाग.
- **खुला प्रौढ गट-** प्रथम- वीरसागर नगर स्वाध्याय मंडळ पंढरपूर, द्वितीय क्रमांक- जैन महिला विकास मंडळ सोलापूर, तृतीय क्रमांक - सोनाली फडे गट पंढरपूर, उत्तेजनार्थ- चैतन्य जैन मंडळ-आळंद .

# केल्याने होत आहे रे...आधी केलीचे पाहिजे..!

**विकास काकतकर यांनी आपल्या संस्थेच्या गेटवर ड्युटी करत असलेल्या सेक्युरिटी गार्डला बोलावून घेतले. आदल्या दिवशी सगळी कामे संपवून घरी जाताना त्यांनी जे दृश्य पाहिलं होतं त्याने त्यांच्यात थोडी बेचैनी आणि कमालीची उत्सुकता निर्माण झाली होती. आपल्या संस्थेचा एक विद्यार्थी दिवसा अभ्यास, क्लासेस, लायब्ररी यात व्यस्त असतो आणि रात्री त्याच कॉलेजचा सेक्युरिटी गार्ड म्हणून काम करतो, हे त्यांना त्या दिवशी घरी जाताना लक्षात आले होते.**



वाशीम पासून पंचवीस किलोमीटर लांब एका खेड्यातील, ग्रामीण भागातील एका युवकाची ही एक प्रचंड प्रेरणादायी सक्सेस-स्टोरी आहे. हातावर पोट असलेल्या शेतकऱ्याच्या घरी जन्माला आलेल्या युवकाच्या संघर्षाची ही कहाणी आहे. जीवनाचा आणि संसाराचा गाडा हाकताना अनेक खस्ता खाल्लेल्या, पण वारकरी संप्रदायातील आध्यात्मिक विचारांची बैठक असलेल्या गरीब कुटुंबातील युवकाची ही कहाणी आहे. ग्रामीण भागातून मुंबई-पुणे गाठताना अनेक चॅलेंजेस भेडसावत असतात, तिकडे 'दिल्ली दूर है' म्हणजे नेमकी किती दूर असेल, याचा विचारही मनाला शिवला नसेल अशा युवकाची ही कहाणी आहे. शालेय जीवनात जिल्ह्याच्या ठिकाणी गेल्यावर राहण्याची व्यवस्था नसल्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयात रात्रीचा मुक्काम करणाऱ्या युवकाची ही कहाणी आहे! पण, घरच्या माऊलीने अशा परिस्थितीतही एक हट्ट मात्र कायमच धरला होता आपल्या लेकराकडे, तो म्हणजे आम्ही इकडे कसेही सांभाळू स्वत:ला पण तू शिक्षण घे.. भरपूर शीक आणि स्वतःच्या पायावर उभा रहा. एवढीच काय ती एकमेव अपेक्षा! असा हा युवक बारावी पूर्ण करून पुण्यात आला आणि पॉलिटिकल सायन्स मध्ये आपले शिक्षण घेऊ लागला. घरची परिस्थिती पाहता, खेडेगावातून पुण्यासारख्या ठिकाणी येणे हेच मोठे दिव्य! ते कसेबसे जुळले तर त्यात गावाकडून आलेल्या युवकांचा पाय सहजच घसरेल असा फर्ग्युसन कॉलेज सारखा माहौल - प्रचंड distractions!! पण या आपल्या कहाणीतील युवकाचा मात्र एकच फोकस, शिक्षण एके शिक्षण!! अशात, गावाकडून पैसे मागविणे शक्य नसल्याने या युवकाने आपल्या कॉलेजच्याच सेक्युरिटी एजन्सीतील गोविंदअण्णा यांच्याकडे एकच तगादा लावला, आणि रात्रपाळीत त्याच कॉलेजच्या सेक्युरिटी गार्डची नोकरी मिळवली. 'कमवा आणि शिका' ही काही कोणती सरकारी योजना नव्हे, तर मजबुरी आणि जिद्द होती या युवकाची!

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या विकास काकतकर यांनी आपल्या ऑफिसमध्ये बोलावून या युवकाची अतिशय आपुलकीने चौकशी केली आणि परिस्थिती समजून घेतली. ची.चीं.काकतकर यांनी मग या युवकाला केवळ अभ्यासावर फोकस करायचा प्रेमळ सल्ला आणि तेवढ्याच प्रेमाने एकप्रकारे दमच दिला! फी, हॉस्टेल सगळी व्यवस्था आपल्या पदरचे पैसे देऊन काकतकर दाम्पत्याने केली. मन लावून अभ्यास करत मग त्या युवकानेही आपली फर्ग्युसनमधील इनिंग्स तर पूर्ण केलीच, पण त्यानंतर दिल्लीत जाऊन इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन मधून जर्नलीजम पण पूर्ण केले!! त्याच सुमारास, देवेन्द्रजी फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांना आपली दिल्ली येथील कामे पाहण्यासाठी एक योग्य व्यक्तीची आवश्यकता निर्माण झाली. त्यांनी ही आपली गरज बोलून दाखवली, तेंव्हा त्यांच्या परिचयातील एका व्यक्तीने या युवकाचे नाव सुचवले आणि जात, ग्रामीण पार्श्वभूमी, आडनाव असल्या कोणत्याही गोष्टीचा विचार न करता देवेन्द्र फडणवीस यांनी या युवकाला संधी देण्यास क्षणार्धात होकार दिला!! देवेन्द्र फडणवीस यांचे दिल्ली-स्थित पीए म्हणून पुढच्या काळात या युवकाने प्रामाणिकपणे काम करत जीवापाड परिश्रम घेतले आणि त्यांच्या 'पर्सनल टीम'चा एक अविभाज्य भाग बनले. दुर्दम्य इच्छाशक्ती असेल तर माणूस अवघड गोष्टीही सहज साध्य करतो आणि अशा व्यक्तीला अनेकांचे साह्य प्रोत्साहनही मिळते, याचे हे एक सुंदर उदाहरण आहे. रामदास स्वामी म्हणलेच आहेत - केल्याने होत आहे रे आधी केलेचि पाहिजे। यत्न तो देव जाणावा अंतरी धरिता बरे।।

आजच्या घडीचे राज्यातील निर्विवादपणे सगळ्यात पावरफुल नेते देवेन्द्रजी फडणवीस यांच्या जवळच्या या माणसाला कधी कोणी विचारलं, की आजवर कोणत्या कामाचे सर्वाधिक समाधान लाभले.. तर तुम्हाला त्यांच्या घरच्या, त्या माऊलीच्या विचारांमधील धार्मिक, अध्यात्मिक बैठकीची प्रचिती आल्याशिवाय राहवणार नाही. देवेन्द्रजी यांच्या सुचनेनुसार त्यांनी केलेल्या अनेक कामांपैकी स्वातंत्र्यसैनिकाच्या पत्नीला २३ वर्षांनंतर मिळवून दिलेली पेन्शन, अनेक गरजू रुग्णांना मदत व्हावी यासाठी केलेला पाठपुरावा, परदेशात अडकलेल्या अनेक मराठी विद्यार्थी, पर्यटकांना युद्धकाळात, कोविडकाळात भारतात परत आणण्यासाठी साऊथ ब्लॉक मध्ये ठाण मांडून बसणे यांसारख्या अनेक गोष्टी सांगताना त्यांच्या चेहऱ्यावरून समाधान ओसांडून वाहत असते. त्याहून महत्वाचं म्हणजे, यांना कधी 'आय मी मायसेल्फ' करताना कोणी पाहिलं नाहीये, उलट यांच्या सहवासात लोकांना कमालीची विनम्रताच अनुभवायला मिळते.

या कहाणीत मी ज्या युवकाबद्दल सांगत आहे, ते युवक आहेत मनोजजी मुंडे. देवेन्द्रजी फडणवीस यांचा ५ तारखेला मुख्यमंत्रीपदी शपथविधी झाल्यानंतर देवेन्द्रजी यांनी मनोजजी यांची ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी, अर्थात ओएसडी (सिएमओ) म्हणून नेमणूक केली आहे.

## संक्षिप्त वृत्त




### 'जनसेवा हिच ईश्वरसेवा'च्या सभासदांचा आदर्श गाव पाटोदाला अभ्यास दौरा

**करमाळा, दि.१० डिसेंबर**

करमाळा तालुक्यातील केत्तुर येथील जनसेवा हिच ईश्वरसेवा सोशल फाउंडेशनच्या सभासदांनी नुकतीच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पाटोदा या आदर्श गावाला भेट दिली व येथील कल्याणकारी योजनांचा धावता आढावा घेतला. याप्रसंगी पाटोदा गावचे माजी सरपंच भास्कर पेरे पाटील यांनी त्यांना मार्गदर्शन केले. राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श गाव असणाऱ्या पाटोदा गावाला जे काही यश मिळाले त्यामागे गावातील नागरिकांची साथ व ग्रामपंचायत मार्फत राबवले गेलेला पारदर्शक कारभार हे गमक असल्याचे फाउंडेशनच्या सभासदांनी सांगितले. गावातील नागरिकांसाठी ग्रामपंचायत मार्फत वर्षभर मोफत धान्य दळण सुविधा, थंड आरओचे पिण्याचे पाणी,व सोलर यंत्रणेवरील आंघोळीसाठी उपलब्ध असणारे गरम पाणी या योजना नक्कीच अनुकरणीय असल्याचे मत ग्रा पं सदस्य महादेव नगरे यांनी व्यक्त केले. चोवीस तास घरोघरी उपलब्ध असणारे मीटरवरील पाणी, इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग सुविधा व स्वस्त धान्य दुकान, मोफत इंटरनेट वायफायची सुविधा ग्रामपंचायत पुरवत असल्याचे पाहून युवक सभासद हरिभाऊ खाटमोडे यांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी रावसाहेब जरांडे, रामचंद्र देवकाते, हरिश्चंद्र पवार, दीपक गाढवे, अंबर लोभे, लक्ष्मीकांत पाटील, प्रदीप नरुटे, नितीन पतुले व रेवण पवार उपस्थित होते. गावचा कारभार करणाऱ्या ग्रामपंचायत ने व ग्रामस्थांनी मनात आणले तर प्रत्येक गाव हे स्मार्ट व्हिलेज नक्कीच बनेल,व गांधीजींचा गावाकडे चला हा संदेश खऱ्या अर्थाने सार्थ ठरेल, असे मत सभासद डॉ. जिनेंद्र दोभाडा यांनी व्यक्त केले.



### राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक

**पंढरपूर,दि.१० डिसेंबर -**

पंढरपूर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने येत्या १२ तारखेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक अध्यक्ष शरदचंद्रजी पवार यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी पंढरपूर शहरातील सर्व राष्ट्रवादी काँग्रेस श.प.पक्षाचे पदाधिकारी व माजी नगरसेवकांची बैठक झाली. यावेळेस विविध विषयावर चर्चा करण्यात आली. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत आलेल्या अपयश वर देखील या वेळी साधकबाधक चर्चा करण्यात आली. त्याचप्रमाणे येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिकेच्या निवडणुका पुन्हा एकदा पूर्ण ताकदीने लढवण्याचे सर्वानुमते ठरवण्यात आले. यावेळेस प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या विचाराने पुढची रूपरेषा ठरवण्यात आली. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### साई होमिओपॅथी मेडिकल कॉलेजतर्फे एड्स जनजागृती कार्यक्रम

**वैराग, दि. १० डिसेंबर-**

श्री साई आयटीआय, कॉलेज सासूरे फाटा वैराग येथे जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून साई होमिओपॅथी मेडिकल कॉलेज यांनी एड्स जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाचा उद्देश एड्स संदर्भातील प्रतिबंध, कारणे आणि योग्य-अयोग्य कृतींबाबत लोकांना जागरूक करणे हा होता. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून साई होमिओपॅथी मेडिकल कॉलेजचे प्राचार्य, डॉ. अशोक अनपट, यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी एड्स प्रतिबंधाबाबतची माहिती दिली आणि उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तर दिले.जागरूकता निर्माण करून त्यांनी आपल्या समुदायामध्ये एड्सविषयी माहिती पसरविण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री साई आयटी आय कॉलेजचे प्राचार्य श्याम गोवर्धन होते. प्रास्ताविक डॉ. स्वप्नाली बुरांडे आणि डॉ. वर्षा कुंभार यांनी केले तर आभार डॉ. स्वाधिका देशमुख यांनी मानले. यावेळी साई होमिओपॅथी हॉस्पिटलच्या वैदकीय अधिकारी डॉ सपना मलमे व डॉ कोमल जामदार, श्री साई आयटीआयचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाबासाहेब भोसले, राहुल अवचारे यांनी सहकार्य केले.


### मोहोळच्या 'त्या' कारवाईसंदर्भात माहिती द्यावी : बंगाळे

**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

मोहोळ विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबर रोजी मतदान पार पडल्यानंतर मध्यरात्री स्ट्राँग रूम परिसरात १४ मोबाईलसह संशयास्पदरीत्या सापडलेल्या उत्तर प्रदेशच्या लोकांवर काय कारवाई केली. यासंदर्भात प्रशासनाने माहिती द्यावी, अशी मागणी या मतदारसंघातील अपक्ष उमेदवार अमोल बंगाळे यांनी पत्रकार परिषदेत केली. दि. २० नोव्हेंबर स्ट्राँग रूम परिसरात जे १४ मोबाईलसह सापडलेल्या लोकांना माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर यांनी पकडले. बारसकर यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी त्यांना मोहोळ पोलीस स्टेशनला नेले. त्यानंतर कोणतीही कार्यवाही न करता पोलिसांनी त्या लोकांना सोडून दिले. याबाबत कार्यवाही केली याची सखोल चौकाशी होऊन प्रशासनाने अहवाल सादर करावा व त्याची प्रत मला मिळावी. या प्रकारणाची चौकशी न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी अमोल बंगाळे यांनी दिला आहे.

# श्री बृहन्मठ होटगी संस्थेत विविध कार्यक्रम

## योगिराजेंद्र पुण्याराधनानिमित्त १३ ते २२ डिसेंबरपर्यंत आयोजन







**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

होटगी मठाचे तपोरत्नं योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामी यांच्या सातव्या पुण्याराधनानिमित्त शुक्रवार दि. १३ ते रविवार दि. २२ डिसेंबरपर्यंत विविध धार्मिक, शैक्षणिक व समाजोपयोगी कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष चन्नयोगिराजेंद्र शिवाचार्य स्वामी यांच्या नेतृत्वाखाली आयोजीत करण्यात आल्याची माहिती काशीपीठाचे जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

होटगी, (ता.द. सोलापूर) येथील मठात शुक्रवार दि. १३ डिसेंबर रोजी सकाळी ६ वा. श्री जगद्गुरु पंचाचार्य ध्वजारोहण, रविवार दि. १५ डिसेम्बर रोजी सकाळी ६ वा. बाळीवेस येथील मठातून तपोरत्नं योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामी यांच्या शिलामूर्तीचे राजवैभवाने मिरवणूक निघून श्री मल्लिकार्जुन मंदिर, मधला मारुती, आजोबा गणपती, गुरुमेट, सात रस्ता, मजरेवाडी (विसावा), साखर कारखाना मार्गे ही मिरवणूक होटगी येथील मठात पोहोचल्यानंतर मिरवणूकीची सांगता होईल. दुपारी ४ वा. नूतन मंदिरास शिखराभिषेक करण्यात येणार आहे. शुक्रवार दि. २० डिसेंबर रोजी रात्री १०.१० मी. तपोरत्नं योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामी आत्मज्योत प्रज्वलन व गुरुवंदना, शनिवार दि. २१ डिसेंबर रोजी सकाळी ८ वा. आत्मज्योतीचे मिरवणूक, दुपारी १.३० मी. धर्मसभा व महाप्रसाद, रविवार दि. २२ डिसेंबर रोजी पाळणा कार्यक्रम होणार आहे. शुक्रवार दि. १३ ते सोमबार दि. १६ पर्यंत दररोज सकाळी ८ वा. श्रीरुद्र होमहवन पूजा, दि. १३ ते दि. १९ डिसेंबर पर्यंत दररोज सायं. ७ वा. शिवकथाकार स्वरसम्राट अमृतेश्वर शिवाचार्य महास्वामी, जितूर यांचे शिवकथा प्रवचन होणार आहे.

अक्कलकोट रोड, सोलापूर येथील मठात दि. १७ डिसेंबर रोजी संस्था अंतर्गत (तपोरत्नं चषक) क्रीडा स्पर्धा, दि. १८ रोजी भवानी पेठ शिक्षण संकुल येथे रक्तदान शिबीर, दि. २० रोजी सकाळी ८ वाजता पायी पालखी सोहळा बोरामणी, (ता. द. सोलापूर) येथील महादेव मंदिरातून निघून दर्गनहळ्ळी, कुंभारी मार्गे या पालखी सोहळ्याचे श्री वीरतपस्वी मंदिर, एम.आय.डी.सी. येथे आगमन होईल. रात्री १०.१० मी. तपोरत्नं योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामी यांचे आत्मज्योत दीपप्रज्वलन व गुरुवंदना कार्यक्रम संपन्न होणार आहे.

या पत्रकार परिषदेस नागणसूर मठाचे श्रीकंठ शिवाचार्य, शहापूर मठाचे सुगुरेश्वर शिवाचार्य स्वामीजी, संस्थेचे सचिव शांतव्या स्वामी,, शिवानंद पाटील, मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे, अमोगसिध्द कुंभार, यमनप्पा होटगौड आदी उपस्थित होते. योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या सातव्या पुण्याराधनाचे औचित्य साधून सोमवार दि. १६ डिसेंबर रोजी तपोरत्नं योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामी यांची क्रीया समाधी शिलामंदिर लोकार्पण, मूर्तीप्राणप्रतिष्ठापना, कळसारोहण व धर्मसभेचे आयोजन उज्जैन जगद्गुरु सिध्दलिंग राजदेशीकेंद्र शिवाचार्य महास्वामीजी, श्रीशैल पीठाचे जगद्गुरु चन्नसिध्दाराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामी, काशीपीठाचे जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी व डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामी यांच्या अमृतहस्ते, महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र प्रदेशातील अनेक शिवाचार्यांच्या उपस्थितीत भक्तिभावात करण्यात येणार असल्याची माहिती काशी जगद्गुरुंनी दिली.

**होटगीत इष्टलिंग महापूजा**

श्रीशैल जगद्गुरु यांची इष्टलिग महापूजा तपोरत्नं योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामी यांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठापनेनिमित्त मंगळवार दि. १७ ते दि. २० डिसेंबरपर्यंत दररोज सकाळी ८ वा. श्री बृहन्मठ होटगी, ता.द. सोलापूर येथे श्रीशैल जगद्गुरुंची इष्टलिंग महापूजा संपन्न होणार आहे. तरी या पूजेत भक्तांनी सहभागी होऊन पुनित व्हावे असे संस्थेच्या वतीने आवाहन करण्यात आलेले आहे.

**सुकन्या करणार खर्च**

विशेष म्हणजे या कळसारोहणाचा संपूर्ण खर्च होटगी गावातील सासरी गेलेल्या सर्व जाती धर्मातील सुकन्या व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आल्याची माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली.

## माढा शहराला नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर व्हावी

- दादासाहेब साठे यांचे उपमुख्यमंत्री अजित पवारांना निवेदन
- उपमुख्यमंत्र्याकडून संबंधित कार्यालयाला योग्य कारवाईचे दिले आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १० डिसेंबर-**

माढा शहराला नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर व्हावी यासाठी मुंबई येथे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची दादासाहेब साठे यांनी भेट घेऊन माढा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा ॲड. मीनल साठे यांच्या पत्राद्वारे मागणी केली आहे. अजित पवार यांच्या भेटीला काही कारणास्तव ॲड. मीनल साठे या उपस्थित नव्हत्या. या निवेदनात म्हटले आहे की, माढा शहर पाणीपुरवठा योजना ही ग्रामपंचायत कालीन असून ३० वर्षे जुनी झाली असून सर्व पाईपलाईन जीर्ण झालेली आहे. त्यामुळे पाईपलाईन वारंवार लिकेज होऊन माढा शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होतो आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियाना अंतर्गत माढा नगरपंचायतीने ५२.७५ कोटी रुपये रक्कमेचा पाणीपुरवठा योजना प्रकल्प तयार केला आहे. सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यता घेऊन, प्रशासकीय मान्यतेसाठी सदर प्रस्ताव, नगरपरिषद प्रशासन संचालनालय सी.बी.डी. बेलापुर नवी मुंबई या कार्यालयास २ डिसेंबर २०२४ रोजी सादर केलेला आहे.

माढा शहरास नविन पाणीपुरवठा योजना मंजुर होणे आवश्यक आहे. प्रस्तावास तात्काळ प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी आपल्या स्तरावरुन संबंधित कार्यालयास योग्य ते आदेश व्हावेत असे म्हटले आहे. निवेदन देताना संत कुर्मदास सहकारी साखर कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे उद्योजक धनाजी वसेकर उपस्थित होते.



माढा शहराला नवीन पाणीपुरवठा योजना मंजुर व्हावी म्हणून उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना काल मुंबईत निवेदन देण्यात आले. त्यावर त्यांनी तात्काळ संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना या निवेदनावर योग्य कारवाई करण्याचे आदेश दिल्याचे दादासाहेब साठे यांनी सांगितले आहे. त्यामुळे येवती तलाव ते माढा ही नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर होण्याच्या अशा पल्लवीत झाल्या आहेत

## बेलाटीत शनिवारी मूर्ती प्राणप्रतिष्ठाना व भक्तनिवास लोकार्पण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी येथील सद्गुरु संत बाळूमामा मंदिरात परिसरात शनिवार दि.१४ डिसेंबर रोजी दत्त जयंतीचे औचित्य साधून अक्कलकोट स्वामी समर्थ, शिर्डी साईबाबा, शेंगावचे गजानन महाराज व गोंदवले येथील ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना व भक्तनिवासाचे लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सद्गुरू संत बाळूमामा मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीराम पाटील-बेलाटीकर यांनी दिली आहे.

दत्त जयंतीनिमित्त विजयपूर-पुणे बायपास रस्त्यावरील बेलाटीच्या बाळूमामा मंदिर परिसरात चार महाराजांच्या मूर्तींचे प्राणप्रतिष्ठापना व भक्तनिवासाचे लोकार्पण सोहळा शनिवारी सकाळी ९ वाजता होणार आहे. यानंतर सकाळी १० ते १२ यावेळेत अखिल भारतीय वारकरी संप्रदायचे अध्यक्ष ह.भ.प. सुधाकर महाराज इंगळे यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम होणार असून या मंदिर परिसरात वृक्षारोपण, रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यानंतर बाळूमामा अन्नछत्र येथे महाप्रसादाची सोय करण्यात आली आहे.

या सर्व कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन अध्यक्ष पाटील यांनी केले आहे. या कार्यक्रमासाठी मंदिर समितीचे उत्तर पंचायत समितीच्या माजी सभापती विजया पाटील, सचिव श्रीकांत पाटील, मधुकर महाराज, सुनील काटकर, विजया वाघमोडे, सेवेकरी घुटूकडे हे परिश्रम घेत आहेत.

## अक्कलकोट-दुधनी महामार्गावर खड्डे

**गाणगापूरला जाणाऱ्या भाविकांची संख्या प्रचंड; खड्डे बुजवून मार्ग दुरुस्त करण्याची मागणी**



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१० डिसेंबर-**

दत्त दर्शनार्थ गाणगापूरला जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठी आहे. गाणगापूरला दुधनी मार्गे जावे लागते. अक्कलकोट ते दुधनी १५० किलोमिटर महामार्ग अंत्यंत खराब झाला असून या महामार्गावर खड्डे पडले आहेत. या महामार्गावरून वाहने चालविताना वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहेत. अक्कलकोट ते दुधनी महामार्गावरील खड्डे बुजवून हा मार्ग दुरुस्त करण्यात यावा, अशी मागणी वाहन चालकातून व गाणगापूरला जाणाऱ्या भाविकारकडू न नागरिकतून केली जात आहे.

अक्कलकोट ते दुधनी हा महामार्ग एक महत्वाचा रस्ता आहे. गाणगापूरला जाणारे वाहने भाविकांची संख्या प्रचंड आहे . या रस्त्यावरून दररोज हजारो वाहने ये जा करतात. सदरच्या महामार्ग वर काही ठिकाणी खड्डे पडले असून रस्ता खराब झाला आहे. या महामार्ग वरून प्रवास करणाऱ्या वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. सदरचा महामार्ग हा अपघातास आमंत्रण देत आहे.संबंधित महामार्ग प्राधिकरण कार्यालयास याबाबत नागरिकांनी तक्रार केली आहे. रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून रस्त्यावर भेगा पडत आहे. अक्कलकोट ते दुधनी या महामार्गावरील खड्डे बुजवून तो दुरुस्त करावा.

वाहनचालकांना तसेच नागरिकांना होणारा त्रास संबंधित विभागाने लक्ष घालून कमी करावा. गाणगापूरला जाणाऱ्या भाविकांचा त्रास कमी करावा, अशी मागणी भाविकांकडून केली जात आहे.



## सांगोला विद्यामंदिरात पहिले पुष्प निवडणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१० डिसेंबर-**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त पहिले पुष्प निवडणूक संपन्न झाली. यामध्ये ज्युनिअर कॉलेज विभागातून प्राचार्यपदी गुरुनाथ संतोष व्हटे, जनरल सेक्रेटरीपदी शिवराज जयवंत नवले व विद्यार्थिनी प्रतिनिधी या पदासाठी साक्षी बापूसो गायकवाड यांची निवड झाली. प्रशाला विभागातून मुख्याध्यापक पदी वरद यल्लाप्पा निंबाळकर, जनरल सेक्रेटरी पदी सुमित विठ्ठल कोळवले व विद्यार्थिनी प्रतिनिधी या पदासाठी वैष्णवी विजय शेंबडे यांची निवड झाली.

शालेय निवडणुकीमध्ये निवडून आलेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा प्राचार्य अमोल गायकवाड यांचे हस्ते उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, प्रदीप धुकटे, मच्छिंद्र इंगोले, ज्यु. कॉलेज निवडणूक विभागप्रमुख प्रा. डी. के.पाटील, प्रा. शिवशंकर तटाळे, उत्सव विभागप्रमुख प्रा.तानसिंग माळी, प्रशाला निवडणूक विभागप्रमुख शिवाजी चौगुले, उत्तम सरगर, उत्सव विभाग प्रमुख बाळराजे सावंत, नरेंद्र होनराव यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, खजिनदार शंकरराव सावंत, विश्वेश झपके यांनी शुभेच्छा दिल्या.

**निवडणुकीत मोठी चुरस**

वर्गप्रतिनिधींची निवड करताना प्रथम सत्र परीक्षेमध्ये सर्व विषयात उत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना उमेदवार म्हणून उभा राहता आले. त्यांना संपूर्ण वर्गातील विद्यार्थ्यांचे मतदान होते. यातून निवडून आलेल्या वर्ग प्रतिनिधींच्या मतदानातून विद्यार्थी-शिक्षक दिन प्राचार्य, जनरल सेक्रेटरी व विद्यार्थिनी प्रतिनिधींची निवड झाली. त्यामुळे या निवडणुकीमध्ये मोठी चुरस पाहावयास मिळाली. त्यातूनच लोकशाहीची मूल्ये, ती जपण्याची आवश्यकता, आपण मतदान हक्क का बजावायचा हे विद्यार्थ्यांना कळले.


## मोडनिंब येथील वळणरस्ता झाला धोक्याचा

**सुरक्षा कठडा नसल्याने अपघाताची शक्यता**

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १० डिसेंबर-**

मोडनिंब (ता. माढा) येथे शहरातील करकंब मोडनिंब स्टेशन रोड वरील वळण अपघाताना निमंत्रण ठरत आहे. महालिंगेश्वर मंदिर नजीक या वळणावर भरधाव जात असताना वाहन चालकांना कुठलाही अंदाज येत नाही. अनेकदा या वळणावर समोरून येणाऱ्या वाहनांना अंदाज येत नसल्याने हुलकावणी बसून अपघात होण्याची शक्यता आहे. बाजूला मोठी चारी गटार असून सुरक्षा कठडा नसल्याने भरधाव वेगामुळे गाडी रस्त्यावरून खाली उतरून अपघाताची शक्यता आहे. यासाठी वळणदार रस्ता घातक ठरत आहे.

या मार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक असून रस्ता गुळगुळीत व अरुंद झाला असला तरी अपघात टाळण्यासाठी योग्य उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी नागरिक करीत आहेत. आजूबाजूच्या परिसरातील बहुतांश नागरिकांना येजा करण्यासाठी हाच रस्ता पर्याय आहे. त्यामुळे वाहनधारकांकडून या रस्त्याचा उपयोग केला जातो. सध्या या मार्गावर वर्दळ वाढली आहे. वाहनांचा वेग वाढलेला आहे. वळण रस्ता दिशादर्शक आणि मार्गदर्शन सूचना फलक बसविण्याची गरज आहे. पूर्वीपासून हा वळण रस्ता आहे परंतु ही बाब अपघाताचे कारण ठरत आहे. वळणात रस्त्याच्या कडेला चार फूट खोल गटार आहे. त्यामुळे रस्त्याच्या कडेला कठडा करावा. सध्या या मार्गावरून दररोज शेकडो मोटरसायकली, चारचाकी वाहने, जडवाहने धावतात. यासह रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या नागरी वसाहतीतील वाहतूक येथूनच होते. दुचाकी व कार यासारख्या वाहनांची संख्या वाढली आहे. परिणामी संबंधित विभागाने या ठिकाणी दुर्घटना टाळण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. शहरातील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण झाले नाही. त्याची डागडुजी केली नाही. मोडनिंबकरांना दररोज धुळीचा संकटांचा सामना करावा लागत आहे. वळणरस्ता असल्याने वाहने भरधाव धावतात. त्यामुळे प्रवाशांच्या जीवितासही धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिक करीत आहे. परंतु याकडे दुर्लक्ष होत असल्याने अपघात होण्याची शक्यता आहे.या रस्त्याची देखभाल आणि दुरुस्ती कोणाकडे आहे याबाबत संभ्रम असल्याने याची डागडुजी होत नसल्याचे दिसते.



मोडनिंब (ता.माढा) येथील वळणरस्ता समोरून येणाऱ्या वाहनांना अंदाज येत नसल्याने हुलकावणी बसून अपघात होण्याची शक्यता आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सेवालाल आश्रम शाळेची परख राष्टीय सर्वेक्षणासाठी निवड

**वळसंग, दि. १० डिसेंबर -**

दि. ४ डिसेंबर रोजी संपूर्ण देशभरात काही निवडक शाळामध्ये इयत्ता तीसरी, सहावी, नववी वर्गातील किमान ३० विद्यार्थ्यांसाठी NCERT नवी दिल्ली यांच्यामार्फत परीक्षा आयोजित करण्यात आली होती. सेवालाल आश्रम शाळेसाठी इयत्ता ९ वी चा वर्ग निवड करण्यात आला होता. वर्गातील ३० विदयार्थी यांची चार विषयासाठी ६० प्रश्नांसाठी दोन तास वेळ देण्यात आले होते. प्रश्न वस्तू निष्ठ स्वरूपाचे होते. सदर परीक्षेसाठी क्षेत्रीय अन्वेषक म्हणून बी.आर.सी विषयतज्ञ सिद्रामय्या स्वामी तर ऑबझरव्हर म्हणून वसीम इनामदार यांची नियुक्ती करण्यात आली होती. परीक्षा सुरळीत पार पडण्यासाठी प्रचार्य रवींद्र राठोड तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांचे सहकार्य लाभले.





### संक्षिप्त वृत्त...



## पंढरपूरच्या वीर पिता व वीर माता यांचा बेंगलोर येथे सन्मान

**पंढरपूर, दि.१० डिसेंबर -**

शहीद मेजर अक्षय गिरीश मेमोरियल ट्रस्ट व मिलिटरी कॅम्पस बेंगलोर यांच्या संयुक्त विद्यमाने विजय दिवस स्मरण आणि सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यामध्ये कारगिल युद्धात शहीद झालेले नगरोटा येथे शहीद झालेले शहीद मेजर कुणाल गोसावी यांच्या कुटुंबियांचा सन्मान निवृत्त जनरल वेद मलिक यांच्या हस्ते करण्यात आला. नगरोटा येथे झालेल्या दहशती हल्ल्यात लेखन लेखिका भावना आरोरा यांनी नगरोठा अंडर सीज या पुस्तकाचे अनावरण व प्रकाशन सर्व शहीद कुटुंब फॅमिली व वीर पिता मुन्नागीर गोसावी व वीरमाता वृंदादेवी गोसावी यांच्या हस्ते करण्यात आले. सदरच्या कार्यक्रमासाठी गिरीश कुमार, विक्रम सिंग, मेघना सिंग, निवृत्त एअरमार्शल फिलिप राजकुमार, भावना अरोरा व विकास, निवृत्त जनरल वेदमलिक, मेजर जनरल विटी मॅथू हे उपस्थित होते. सदरच्या कार्यक्रमांमध्ये सर्व कुटुंबीयांच्या समवेत शहीद झालेल्या जवानांच्या कारकिर्दीचे व्हिडिओ व स्मरण याचे चित्रीकरण दाखवण्यात आले व सर्वांचा सन्मान करण्यात आला. सदस्य कार्यक्रमाप्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये मेजर अक्षय गिरीश मेमोरियल ट्रस्टच्या विद्यार्थ्यांनी सुंदर अशा देशभक्तीपर गीतातून नृत्य सादर केले. सर्व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गोसावी कुटुंबीयांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.



## कराटे स्पर्धेत मंद्रुपच्या खेळाडूंचे यश

**मंद्रुप, दि. १० डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतरमहा विद्यालयीन कराटे स्पर्धेत दक्षिण सोलापूर तायक्कांदो अकॅडमी मंद्रुपची खेळाडू शिवराज सोमनिंग बोळकोठे सुवर्णपदक पटकावले, प्रीती मोहन राठोड हिने रोप्य पदक मिळवले तर प्रणाली व्हानमाने कांस्यपदक पटकावले. तर सुवर्णपदक विजेत्या खेळाडू शिवराज बोळकोठे यांचे सोलापूर विद्यापीठ संघात निवड झाली आहे. शिवदारे कॉलेज सोलापूर येथे कराटे स्पर्धा झाल्या. यामध्ये शिवराज बोळकोठे याने सुवर्णपदक पटकावले. निवड झालेल्या या खेळाडूला दक्षिण सोलापूर तायक्कांदो अकॅडमी मंद्रूपचे मुख्य प्रशिक्षक शिवराज मुगळे यांचे मार्गदर्शन लाभले. व दक्षिण सोलापूर तायक्कांदो ॲकॅडमीचे अध्यक्ष प्रवीण जोडमोटे, रेश्मा राठोड, दिपक धुळखेडे, सचिन कुंभार, सिद्धाराम विजापूरे यांनी अभिनंदन केले. तसेच पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



## महासिद्ध विद्यामंदिर डोणजमध्ये माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

**ग्रंथालयासाठी लिगाडे यांची २५ हजारांची देणगी**

महासिद्ध विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, डोणज येथे १९९४-२०२३ मधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्राचार्य चंद्रकांत लाड व प्रमुख पाहूणे ॲड. मधुकर भंडगे होते. याशिवाय १९९२ ते २०२४ मध्ये या शाळेत सेवेस असलेले प्राचार्य, सहशिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते. सुरुवातीला सर्व गुरुवर्यांचा सन्मान चिन्ह, नॅपकीन बुके, शाल व टोपी देवून सत्कार करण्यात आला. सर्व माजी विद्यार्थ्यांचे प्रशालेच्या वतीने गुलाब फुल व माजी विद्यार्थी संघटनेकडून शॉल व टोपी देवून स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशालेचा माजी विद्यार्थी दत्तात्रय भिमराव लिगाडे यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना वाचनासाठी ग्रंथालयात पुस्तके घेण्यासाठी रोख २५ हजार रुपयेची वर्गणी दिली. या कार्यकमास स्वीस बँक आय टी विभाग पुणे येथे कार्यरत असलेले अनिल धुरपे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष श्रीमंत केदार, डोणजचे माजी उपसरपंच संतोष मलगोंडे उपस्थित होते. यावेळी माजी विद्यार्थ्यांकडून शाळेस डिजिटल घडयाळ भेट देण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.धानेश लिगाडे यांनी केले व आभार श्रीकांत पुजारी यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. सारिका केदार यांनी केले.

# टीसीएस कंपनीकडून टोकन दर्शन प्रणालीच्या प्रस्तावास मंजूरी

**सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर; भाविकांना अधिकाधिक सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने शिर्डी, शेगाव देवस्थानचा अभ्यास दौरा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१० डिसेंबर -**

श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी येणा-या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. येणाऱ्या भाविकांचे सुलभ व वेळेत दर्शन व्हावे यासाठी तिरूपती व शिर्डी देवस्थानच्या धर्तीवर टोकन दर्शन पद्धती राबविण्यासाठी आवश्यक संगणक प्रणाली विकसित करुन देण्याबाबत टीसीएस कंपनीला प्रस्ताव देण्यात आला होता. त्यावर सदर कंपनीने मोफत संगणक प्रणाली विकसित करुन देण्याचा प्रस्ताव मंजूर केला असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास येथे मंदिर समितीची सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. बैठकीस मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, हभप ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, ॲड. माधवी निगडे, हभप प्रकाश जवंजाळ, अतुल शास्त्री भगरे गुरूजी, हभप शिवाजीराव मोरे तसेच कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा व मंदिर समितीचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.



यावेळी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिर जतन, संवर्धन व जिर्णोद्वार कामाचा आढावा घेऊन कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण पूर्ण करावीत अशा सुचना पुरातत्व विभाग व संबधित ठेकेदारास देण्यात आल्या. तसेच तात्पुरत्या स्वरूपात मानधन तत्वावर मालमत्ता अधिकारी नियुक्त करणे, श्री क्षेत्र आळंदी येथे मंदिर समितीसाठी जागा उपलब्ध करुन घेणे, सन २०२५ मधील श्रींच्या पूजा ऑनलाईन बुकींग करणे, रक्षक सिक्युरिटी कंपनी विषयी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने त्यांना अंतिम नोटिस देणे, मंदिरातील निर्माल्यापासून धूप-अगरबत्ती तयार करण्याबाबत थर्ड वेव्ह टेक्नॉलॉजीज, पुणे यांनी कोणत्याही स्वरूपाची कार्यावाही न केल्याने प्रस्ताव रद्द करुन ऋषिकेश भट्टड, पंढरपूर यांचा प्रस्ताव योग्य त्या अटी व शर्तीवर मंजूरी देण्यात आली आहे. बैठकीत आदी महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले. तसेच अनंत अरुण माळवदकर, गुरूदत्त अभिमन्यू क्षिरसागर, संकेत अशोक कोले, स्नेहा अमोल वाडेकर इत्यादी कर्मचा-यांना अनुकंपा तत्वावर मंदिर समितीमध्ये नोकरी देऊन नियुक्ति पत्रे वाटप करण्यात आली. त्याचबरोबर वेदांता व व्हिडीओकॉन भक्तनिवास येथील उपहारगृहाचे भूमिपूजन करण्यात आले व दैनंदिनी २०२५ चे प्रकाशन देखील करण्यात आले.

शिर्डी व शेगांव देवस्थाने ही प्रसिद्ध देवस्थाने आहेत. या देवस्थानमधील अत्याधुनिक साधनांचा वापर, भाविकांना देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांची माहिती घेण्यासाठी मंदिर समितीच्या आस्थापनेवरील अधिकारी, पदाधिकारी व वरिष्ठ कर्मचा-यांचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात येणार असल्याचे यावेळी व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.

## जिल्ह्यातील कारखानदारांनी ऊस दर जाहीर करण्याची मागणी

**सोलापूर, दि.१० डिसेंबर -**

सोलापूर जिल्ह्यातील यंदाच्या हंगामात सर्व कारखाने चालू होऊन जवळजवळ तीन आठवडे झाले आहेत मात्र जिल्ह्यातील दोन साखर कारखान्यांचा अपवाद वगळता इतर सर्व कारखान्यांनी अद्यापही ऊस दर जाहीर केला नाही. तो तातडीने जाहीर करावा, अशी मागणी शेतकरी राघवेंद्र बिराजदार यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

गळीत हंगाम सुरू झाला आहे. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरचा विठ्ठल साखर कारखाना आणि माढा येथील कारखान्याने ॲडव्हान्स ३५०० रुपये दर जाहीर केला आहे. याव्यतिरिक्त इतर कारखान्यांनी अद्याप दर जाहीर केला नाही. एफआरपी कायद्यानुसार १४ दिवसाच्या आत गाळप झालेल्या उसाचे दर दिले पाहिजे मात्र अजून ऊस दर सुद्धा जाहीर करण्यात आला नाही. दर जाहीर केल्याशिवाय कारखान्यास शेतकऱ्यांनी ऊस देऊ नये, असे आवाहन यावेळी राघवेंद्र बिराजदार यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेत धर्मराव पुजारी, नागनाथ बिराजदार, पंचलिंग पाटील, सोमनाथ बिराजदार आदी उपस्थित होते.

## हिंदू बांधवांकडून पंढरपुरात मोर्चा

**बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचार प्रकरण**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि. १० डिसेंबर-**

बांगलादेशातील हिंदू वर होत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात पंढरपूर शहरातील सकल हिंदू बांधवांनी एकत्र येत याचा निषेध केला. यासाठी मूक मोर्चा काढून निवेदन देण्यात आले.

बांगलादेश येथे काही दिवसांपूर्वी सत्तांतर झाल्यानंतर हिंदूवर मोठ्या प्रमाणात अत्याचार केला जात आहे. विशेष म्हणजे बांगलादेशचे लष्करच यासाठी सहकार्य करीत असल्याचे पुरावे पुढे आले आहेत. हिंदू वर होत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात पंढरपूर येथील सकल हिंदू समाजाने एकत्रित मानवाधिकार मूक मोर्चा




काढला. सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास येथील टिळक स्मारक मैदानात एकत्र आलेल्या पदाधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक, स्वातंत्र्यवीर सावरकर चौक ते तहसील कार्यालय मूक मोर्चा काढला. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांच्या हातात बांगलादेशातील हिंदूंना पाठिंबा देणारे फलक होते.

याबाबत तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले असून हिंदू बांधवावर होत असलेले अत्याचार थांबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर योग्य अशी भूमिका घ्यावी अशी मागणी याद्वारे करण्यात आली आहे.

## ..अखेर 'त्या' अंगणवाडीला मिळाला निवारा

**पालक वर्गातून होतेय समाधान**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१० डिसेंबर-**

माचणूर येथील मुंढेवाडी रस्त्यावरील अंगणवाडी एका घराच्या अंगणात उघडयावर भरत असल्याचे वृत्त छाया चित्रासह सोलापूर दैनिक तरुण भारत मध्ये प्रसिध्द होताच या वृत्ताची दखल घेवून तेथील एका शेतकऱ्याने जागरूकता दाखवत

> माझ्या शेतात रस्त्याच्या कडेला एक गुंठा जागेत पत्र्याचे शेड तयार होते. हे शेड लहान मुलांना अंगणवाडी भरविण्यासाठी मी स्वखुशीने दिले आहे. मुलांची बसण्याची व्यवस्था त्यामुळे झाली आहे.
> **- भाऊसाहेब सरवळे**
> शेतकरी, माचणूर



**मुंढेवाडी रस्त्यावर निवारा मिळाल्याने मुलांसह भरलेली अंगणवाडी छायाचित्रात दिसत आहे. ( छाया : प्रथमेशराजे, मंगळवेढा.)**



सोलापूर तरुण भारत
माचणूर येथील अंगणवाडीला नाही इमारत

पत्र्याच्या शेडमध्ये जागा दिल्याने ती अंगणवाडी येथे मागील तीन दिवसापासून भरत असल्याने अखेर त्या चिमुकल्यांना न्याय मिळाल्याने पालकांनी दैनिक सोलापूर तरुण भारतला धन्यवाद दिले आहेत.

माचणूर येथील एक आंगणवाडी ब्रम्हपुरी-मुंढेवाडी रस्त्यालगत एका घराच्या मोकळ्या अंगणात भरत असल्याचे वृत्त सोलापूर तरुण भारत मध्ये ४ डिसेंबर रोजी पान नं ११ वर प्रसिद्ध झाले होते. दरम्यान या वृत्ताची बालविकास प्रकल्प अधिकारी जगन्नाथ गारुळे यांनी दखल घेवून ग्रामपंचायतीचे ग्राम सेवक यांना सुचना देण्यात आल्या होत्या. या वृत्ताची दखल घेवून त्याच परिसरात राहणारे शेतकरी भाऊसाहेब सरवळे यांनी मन मोठे करून आपले स्वतःचे पत्र्याचे उभा केलेले शेड अंगणवाडीसाठी दिल्यामुळे सदर आंगणवाडी सध्या येथे भरत असल्याने चिमुकल्यांना ऊन, वारा, पाऊस यांच्यापासून होणारा त्रास या निवाऱ्यामुळे थांबला आहे. यासाठी सरपंच दीपाली कलुबर्मे, उपसरपंच नितीन पाटील, सदस्य उमेश डोके, तंटामुक्त अध्यक्ष मोहन सरवळे, माजी संचालक राजू बाबर, महिला बचत गटाच्या अध्यक्षा विद्या डोके आदींनी यासाठी परिश्रम घेतले.

## पंढरपूर अर्बन बँकेच्या व्यवहारावर कोणताही परिणाम नाही : चेअरमन सतीश मुळे

**बारामती शाखा येथील प्रकार**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.१० डिसेंबर-**

पंढरपूर अर्बन बँकेच्या बारामती शाखेमधील व्यवस्थापकाने केलेल्या नऊ कोटी अपहाराचा कोणताही परिणाम बँकेच्या व्यवहारावर होणार नसून खातेदारांची सर्व रक्कम सुरक्षित आहे. याबाबत बँकेची सर्व रक्कम वसुलीची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती बँकेचे चेअरमन सतीश मुळे यांनी दिली.




पंढरपूर बँकेच्या बारामती शाखेचा व्यवस्थापक अमित प्रदीप देशपांडे याने आपल्या पदाचा गैरवापर करत ९ कोटी तीन लाखांचा अंतर्गत बँकिंग फसवणूकीचा आर्थिक गैरव्यवहार केला आहे. याप्रकरणी बँकेने बारामती शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून देशपांडे याने गुन्ह्याची कबूली देखील दिली आहे. बँकेच्या अंतर्गत तपासणीमध्ये एक महिन्यापूर्वी सदर आर्थिक अपहार केल्याची माहिती समोर आली. यानंतर तातडीने बँकेच्या अधिकाऱ्यांनी देशपांडे याची व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची सर्व खाती गोठवली आहेत. हा प्रकार फक्त बारामती शाखेपुरता मर्यादित असून कोणत्याही ग्राहकांच्या खात्याशी संबधित नाही. यामुळे बँकेच्या कोणत्याही खातेदाराचे नुकसान झाले नाही. राज्यात पंढरपूर अर्बन बँकेच्या ३० शाखा असून दोन हजार ५०० कोटीहून अधिक व्यवसाय आहे. झालेल्या अपहारामुळे सभासदांनी घाबरण्याचे कोणतेही कारण नसून बँकेची आर्थिक परिस्थिति मजबूत आहे. याबाबत आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली असल्याचे बँकेचे सीईओ उमेश विरधे यांनी स्पष्ट केले.

# अक्कलकोटमधून १० हजार स्टील ताटे अन् कापडी पिशव्यांचे नियोजन

**'एक थाली, एक थैली' उपक्रम; पर्यावरण धार्मिक गतिविधिचे प्रमुख महेश वागदरे यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा । बसवराज बिराजदार**
**अक्कलकोट दि.१० डिसेंबर -**

उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये १४४ वर्षांनी होणाऱ्या महाकुंभमेळला सुमारे शंभर देशातून ४० कोटींहून अधिक भाविक येण्याची शक्यता आहे. मात्र या भाविकांना जेवण देताना प्लास्टिक व थर्माकोलच्या ताटांचा वापर होणार असल्याने दररोज १ हजार २०० टन कचरा निर्माण होणार आहे. म्हणून अक्कलकोट शहर तालुक्यातून 'एक थाली, एक थैली' हा उपक्रम नुसार १० हजार स्टील ताटे व कापडी पिशव्याचे नियोजन केले असल्याची माहिती अक्कलकोट पर्यावरण धार्मिक गतिविधिचे प्रमुख महेश वागदरे यांनी दिली.



प्रयागराज येथे मकर संक्रांतीपासून ते महाशिवरात्री पर्यंत महाकुंभमेळा होणार आहे. या कुंभमेळ्याच्या वेळी होणारा प्लास्टिक कचरा टाळण्यासाठी आणि कचऱ्या पासून होणारे प्रदूषण रोखण्यासाठी थाळी व पिशवी देण्याचा उपक्रम सध्या सर्वत्र देशभरात राबविण्यात येत आहे. दरम्यान या ठिकाणी विविध संस्था, संघटनांकडून मोफत भोजनाची व्यवस्था केली जाते.

मात्र, जेवण देताना प्लास्टिक व थर्माकोलच्या ताटांचा वापर होणार आहे. म्हणून या उपक्रमा अंतर्गत अक्कलकोटात देखील निसर्गप्रेमी युवकांचा मोठा सहभाग असून शहर आणि तालुक्यातील हजारो लोक या उपक्रमास सकारात्मक प्रतिसाद देत असल्याची माहिती सुशील हिरस्कर यांनी दिली.

प्लास्टिक, थर्माकोलच्या पत्रावळींचा कचरा पर्यावरणासाठी घातक ठरू नये, यासाठी पश्चिम महाराष्ट्रात पूर्णम इको व्हिजन या संस्थेतर्फे एक थाळी, एक थैली हा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमा अंतर्गत कुंभमेळ्यात रोजच्या जेवणासाठी आत्ता पर्यंत स्टीलची तब्बल ५० हजार ताटे संकलित झाली असल्याची माहिती पश्चिम महाराष्ट्र प्रांत वृक्षयानसह प्रमुख प्रवीण तळे यांनी दिली.

### २० डिसेंबरपर्यंत देणगी देण्याचे आवाहन

कुंभ मेळ्यासाठी जगभरातून सुमारे १०० देशातून ४० कोटींपेक्षा जास्त भाविक प्रयागराज येथे दाखल होणार आहेत. एक थाळी व एक पिशवी खरेदीसाठी १२५ इतका खर्च येतो. त्यामुळे १२५ रुपयांच्या पटीत आपण कितीही देणगी (डोनेशन) देऊ शकता. आत्तापर्यंत अक्कलकोटमधून हजारो भाविकांनी देणगी दिली आहे. येत्या २० डिसेंबरपर्यंत इच्छुक नागरिकांना या उपक्रमासाठी देणगी देण्याचे आवाहन संयोजक तथा निसर्ग सेवा फाउंडेशन प्रमुख सुनील बिराजदार यांनी केले आहे .

धाराशिव
# दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## पोलीस असल्याची बतावणी करुन ९८ हजारांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**

उमरगा तालुक्यातील कराळी पाटी येथे ७ डिसेंबर रोजी सकाळी साडे नऊ वाजण्याच्या सुमारास बलभिम लक्ष्मणराव माने (वय ६०, रा. कदेर) आणि त्यांच्या पत्नी यांची दोन मोटारसायकलवरील तिघांनी फसवणूक केल्याची घटना घडली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, बलभिम माने हे आपल्या पत्नीसह मोटारसायकलने कराळीकडे जात असताना तिघांनी त्यांना अडवले.

स्वतःला पोलीस असल्याचे भासवत त्यांनी खोटे ओळखपत्र दाखवले आणि काल रात्री येथे एका महिलेचे दागिने लुटून मारहाण झाली आहे, म्हणून तुमचे गळ्यातील सोने नाणे व्यवस्थीत सांभाळून तुमच्या जवळ ठेवा असे सांगितले.

यामुळे माने दांपत्य गोंधळले आणि त्यांची दिशाभूल करून फसवणूक करणाऱ्यांनी त्यांच्या गळ्यातील ३९ ग्रॅम वजनाचे, ९८ हजार ७५० रुपये किमतीचे सोने नाणे घेऊन पळ काढला.

याप्रकरणी बलभिम माने यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उमरगा पोलीस ठाण्यात भा.दं. वि. कलम ३१९(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### लालबहादूर शास्त्री विद्यालयात शिक्षक देण्याची पालकांची मागणी

**जळकोट, दि.१० डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील होर्टी येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयात तीन वर्गासाठी केवळ दोन शिक्षक शिकवत असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. विद्यार्थ्यांच्या पालकांनी संस्थेकडे शिक्षक देण्याची मागणी केली आहे. होर्टी येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयाच्या पालकांनी शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूरच्या अध्यक्ष, सचिवांना लेखी निवेदन दिले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संचलित लालबहादूर शास्त्री विद्यालयात आठवी ते दहावी असे तीन वर्ग नियमित चालतात. विद्यालयात सर्व विषयासाठी शिक्षक नाहीत. केवळ दोनच शिक्षक सध्या कार्यरत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. शाळेमध्ये शिक्षक कमी असल्याने सर्व विषय तीन वर्गासाठी केवळ दोनच शिक्षक शिकवतात. विद्यार्थ्यांच्या पालकांनी संस्थेकडे लेखी निवेदन दिल्याने संस्था काय भूमिका घेणार? याकडे पालकांचे लक्ष लागले आहे. या निवेदनावर जवळपास ८० पालकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



### पत्रकार सुरक्षा समिती अध्यक्षपदी पुनश्च यशवंत पवार यांची निवड

**जळकोट, दि.१० डिसेंबर -**

महाराष्ट्र पत्रकार सुरक्षा समिती संस्थापक अध्यक्ष यशवंत पवार यांची पत्रकार सुरक्षा समिती अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी पुनश्च फेरनिवड करण्यात आली आहे. सदरील नियुक्ती पत्रकार सुरक्षा समितीचे ज्येष्ठ सदस्य ॲड. दिलीप जगताप यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व नियुक्तीपत्र ओळखपत्र देऊन करण्यात आली. याप्रसंगी सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष सादिक शेख, जिल्हा उपाध्यक्ष अमर पवार, मोहोळ तालुका कार्याध्यक्ष सागर पवार, मोहोळ तालुका प्रसिद्धी प्रमुख अजय तोडकर, सोलापूर शहराध्यक्ष राम हुंडारे, अक्षय बबलाद, अरुण सिडगिद्दी, राजू वग्गु, आनंद गुंड, राजू पवार, गणेश कारंडे, योगीनाथ स्वामी, रक्षंदा स्वामी, अतुल भडंगे, वासिमराजा बागवान, तानाजी माने, राहुल जाधव, प्रवीण राठोड सह पत्रकार सुरक्षा समितीचे पदाधिकारी, सदस्य व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### हिंदुवरील अत्याचाराबाबत कळंबमध्ये सकल हिंदू समाजाची महारॅली

**कळंब, दि.१० डिसेंबर -**

बांगलादेशात झालेल्या सत्तांतरानंतर मोठ्या प्रमाणावर हिंसाचार झाला आहे. यामध्ये हिंदू समाजाला लक्ष केले जात असून हिंदूधर्मीय नागरिकावर अमानुष अत्याचार केले जात आहे. हे अत्याचार तात्काळ थांबवावे यासाठी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लक्ष घालावे त्यांच्या स्तरावरून घेतलेल्या बांगलादेशी नागरिकाच्या बाबतील प्रत्येक निर्णयात हिंदू समाज आपल्या सोबत आहे, असे निवेदन कळंब तालुका सकल हिंदू समाजाच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना कळंब उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत देण्यात आले. हे निवेदन वरिष्ठ लीपीक यशवंत हारकर यांनी स्विकारले. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून ही रॅली उपविभागीय अधिकारी कळंब यांच्या कार्यालयात पोहोचली व निवेदन देण्यात आले. निवेदनावर, प्रकाश भडंगे, मकरंद पाटील, अनिल यादव, सतपाल बनसोडे, विश्वभर पाटील, शितल चोंदे, दिलीप लोढा, विष्णू बारगुले, चत्रभुज भांडे, संदीप कोकाटे, शंभु कोकीळ, परशुराम देशमाने, शिवराज पाटील धनेगावकर, अजित गुरव, महेश जोशी, संतोष भांडे, संजय जाधवर, किरण फल्ले, अशोक क्षीरसागर, नाना शिंगणापूरे, सचिन क्षिरसागर यांच्या सह्या आहेत.

### कौडगाव तांड्यात घरफोडी; ८५ हजारांचे दागिने लंपास

**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**

कौडगाव तांडा येथे घरफोडीचा धक्कादायक प्रकार घडला आहे. विजय गणेश राठोड यांच्या घरातील कपाटातील डब्यात ठेवलेले २९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरट्यांनी लंपास केले आहेत. याप्रकरणी विजय राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, करण राजाभाऊ राठोड हा संशयित आरोपी असून त्याने १४ सप्टेंबर २०२४ ते १२ ऑक्टोबर २०२४ या दरम्यान ही चोरी केली आहे. पोलिसांनी या घटनेची नोंद घेत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# तुळजाभवानी मंदिराला मिळणार पुरातन झळाळी, जीर्णोध्दाराचे काम वेगाने सुरु

### आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या मंदिराला लवकरच पुरातन झळाळी लाभणार आहे. मंदिराच्या जिर्णोद्धाराचे काम सध्या वेगात सुरू आहे. भाविक आणि पुजारी बांधवांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेऊन नियोजित केलेत काम पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. हजारो वर्षांच्या अनमोल अध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा असलेल्या तुळजाभवानी देवीच्या मंदिरासह मंदिर परिसरातील उपदेवतांच्या मंदिरांनाही प्राचीन गतवैभवाचे रूप मिळणार आहे. लवकरच राज्यासह देशभरातील देविभक्तांना तुळजाभवानी देवीच्या मंदिराचा मूळ प्राचीन गाभारा याची देही याची डोळे मनभरून पाहता येणार असल्याची माहिती तुळजाभवानी मंदिर समितीचे विश्वस्त आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र केवळ मराठवाडाच नव्हे तर संपूर्ण राज्याची सांस्कृतिक राजधानी ठरावी इतके महनीय आहे. हा प्राचीन आणि वैभवशाली वारसा ठळकपणे देश आणि जगाच्या पर्यटकांसमोर मांडण्यासाठी आपण जाणीवपूर्वक प्रयत्न करीत असल्याचे सांगत आमदार पाटील यांनी तिर्थक्षेत्राचा संपुर्ण कायापालट करण्यासाठी दोन हजार कोटींची आराखडा अंतिम करण्यात आला असल्याचे स्पष्ट केले. दरम्यान मंदिर समितीच्या स्वनिधीतून ६० कोटी रुपयांची कामे सध्या वेगात सुरू आहेत. यातून तुळजाभवानी देवीच्या मंदिराला लक्षवेधी प्राचीन झळाळी लाभणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

तुळजाभवानी मंदिराच्या बाजूला असलेल्या टोळभैरव मंदिरातील टाइल्स फरशा काढण्याचे काम सध्या सुरू आहे. या फरशा काढून पुरातन आकार देण्याचे काम पुरातत्त्व विभागाच्या निगराणीखाली सुरू आहे. वर्षातून केवळ एक वेळा तुळजाभवानी देवीच्या मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या टोळभैरवाच्या मंदिराचे प्राचीन आणि आध्यात्मिक महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. मंदिर परिसरात असलेल्या दत्तमंदिराच्या कामांना देखील सुरुवात करण्यात आली आहे. त्यासाठी लोखंडी स्ट्रक्चर उभे करण्यात आले असून जुन्या कोरीव दगडांची साफसफाई सुरू करण्यात आली आहे. आकर्षक कोरीव काम असलेल्या या दगडांना अधिक ठळकपणे जीर्णोद्धाराच्या कामातून भाविकांसमोर आणले जाणार आहे. गोमुखतीर्थ आणि परिसरातही जीर्णोद्धाराचे काम वेगात सुरू आहे. त्या ठिकाणीही मोठे लोखंडी स्ट्रक्चर उभारून पुरातत्त्व विभागाच्या नियंत्रणाखाली मोठया वेगात काम सुरू आहे.

तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी राज्य आणि देशभरातून येणाऱ्या भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची काळजी घेवून कामाचे नियोजन करण्यात आले आहे. काम सुरू असताना भाविकांना तुळजाभवानी देवीचे दर्शन घेता येईल, याकडे विचारपूर्वक लक्ष देण्यात आले आहे. सर्वात महत्वाची बाब म्हणजे तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणार्या ज्येष्ठ आणि दिव्यांग भाविकांच्या सुविधेसाठी लिफ्ट आणि रॅम्पची व्यवस्थाही केली जाणार आहे. तुळजाभवानी देवीच्या दर्शनानंतर अत्यंत उत्साहामध्ये आणि समाधानाने प्रत्येक भक्त आपल्या घरी जावा, असे नियोजन आम्ही करीत असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले आहे.

### जिर्णोद्धारात या कामांचा समावेश...



मंदिरात नव्याने केलेले बांधकाम काढणे, भुयारी मार्ग, यज्ञमंडप, सभा मंडप व भवानी शंकर मंदिराचे जतन व दुरूस्ती केली जाणार आहे. त्याचबरोबर कार्यालयीन प्रशासकीय इमारती, पोलीस चौकी, खुला प्रेक्षा मंच आदी नव्याने केलेली बांधकाम काढली जाणार आहेत. गोमुखतीर्थ, दत्त मंदिर, मातंगी मंदिर, कल्लोळतीर्थ, निंबाळकर द्वार, मार्तंड ऋषी मंदिर, टोळ भैरव मंदिर, दीपमाळ, शिवाजी महाद्वार व खंडोबा मंदिर, यमाई मंदिराच्या जतन आणि दुरूस्तीचे कामही केले जाणार आहे. तिसऱ्या टप्प्यात तुकोजीबुवा मठाकडील दगडी संरक्षण भिंत, दगडी फरशा, आवश्यकतेनुसार दगडी पायऱ्या, महावस्त्र अर्पण केंद्राचेही जतन आणि दुरूस्तीचे काम नियोजित आहे. तुकोजीबुवा मठावरील ओव्हऱ्या, आराध्य खोली, दगडी फरशी आणि सर्वात महत्वाचे म्हणजे, तुळजाभवानी देवीचे मुख्य प्रवेशद्वार, त्याचबरोबर जिजामाता महाद्वाराची देखील दुरूस्ती आणि जतन केले जाणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

## भरधाव ट्रकच्या धडकेत शाळकरी विद्यार्थ्याचा मृत्यु





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**

शाळा सुटल्यानंतर सायकलवरून आपल्या घरी निघालेल्या पोद्दार स्कुलमधील ६ वीतील विद्यार्थ्याचा भरधाव ट्रकने चिरडल्याने जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना मंगळवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास घडली आहे. ही घटना डी-मार्ट या शॉपिंग मॉलसमोर घडली आहे. छत्रपती संभाजी नगर ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर धाराशिव शहराला येण्यासाठी या ठिकाणावरून बायपासला पर्यायी रस्ता नसल्याने चिमुकल्याचा बळी गेला आहे. सदरील घटनेनंतर प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होताना दिसत आहे.

याबाबत माहिती अशी की, तुळजापुर येथे पोलिस दलात कार्यरत असलेले अजय सोनवणे या कर्मचाऱ्याचा मुलगा पोदार शाळेत इयत्ता सहावीमध्ये शिकणारा अर्णव अजय सोनवणे (वय १२, रा. डेक्कन कॅम्प, धाराशिव) मंगळवारी दुपारी शाळा सुटल्यानंतर सायकलवरून शाळेतून घरी जात होता. तो डीमार्टसमोर आल्यानंतर सोलापूरहून छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या भरधाव ट्रकने (केए १३/बी १७७३) त्याला जोरदार धडक दिली. विद्यार्थ्याला धडक दिल्यानंतर ट्रक रस्त्याखाली जाऊन पलटी झाला. या धडकेत विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

गेल्या अनेक दिवसापासून या ठिकाणी अंडरपास करण्याचे मागणी या परिसरातील राहणारे लोक करत आहेत. यासाठी या परिसरातील रहिवासी यांनी रस्ता रोको आंदोलनही केले होते. मात्र या मागणीकडे प्रशासनाने सोयीस्कर रित्या दुर्लक्ष करत अनेकांचा जीव जाण्याची वाट पाहत असल्याचा सवाल नागरिकांतून उपस्थित केली जात आहे.

### संबंधितांना सहआरोपी करण्याची नागरिकांची मागणी...

डी मार्ट शेजारील भागात राहणारे रहिवासींनी अनेक वेळा प्रशासनाकडे या ठिकाणी अंडरपास किंवा पर्यायी मार्गाची मागणी केली होती. परंतु याकडे प्रशासनाने वेळोवेळी दुर्लक्ष केले. यात दोशी असणाऱ्या संबंधितांना सह आरोपी करण्याची मागणी या परिसरातील नागरिकांनी केली आहे.

### कडक सुरक्षा व्यवस्थेत चालक आणि क्लीनरचे उपचार...

घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थितीचा अंदाज घेत चालक आणि क्लीनरला ताब्यात घेतले. यानंतर या अपघातात जखमी झालेल्या चालक आणि क्लीनरला कडक सुरक्षा व्यवस्थेत जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. उपचार सुरू असलेल्या पुरुष शल्यचिकत्सा वार्ड समोर जिल्हा रुग्णालयातील सर्व सुरक्षारक्षकांची सुरक्षा लावण्यात आली होती.

## अपसिंगा येथे नवविवाहितेची आत्महत्या; चौघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**

तालुक्यातील अपसिंगा येथे एका नवविवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. मयत महिलेचे नाव मयुरी सुरज गुरव (वय २५) असे असून तिने ८ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास आपल्या राहत्या घरी आत्महत्या केली. या प्रकरणी तिचा पती सुरज गुरव, जाऊ धनश्री गुरव आणि दीर धीरज गुरव यांच्यासह सासू छाया गुरव यांच्याविरुद्ध हुंड्यासाठी छळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयुरीच्या माहेरच्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, सुरजचे त्याची जाऊ धनश्री हिच्याशी अनैतिक संबंध होते.

हा प्रकार मयुरीने माहेरच्यांना सांगितल्याने आणि प्रयोगशाळा सुरू करण्यासाठी माहेरहून पाच लाख रुपये आणण्यास नकार दिल्याने तिला सतत मानसिक आणि शारीरिक छळ केला जात होता. या छळाला कंटाळून मयुरीने आत्महत्या केल्याचा आरोप तिच्या वडिलांनी केला आहे.

पोलिसांनी मयुरीच्या वडिलांच्या फिर्यादीवरून भा.न्या.सं. कलम- १०८, ८०,८५ अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### किराणा दुकानातून १५ हजारांची चोरी; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**

शहरातील शिवाजी नगर येथील एका किराणा दुकानात चोरी झाल्याची घटना घडली आहे. अज्ञात चोरट्याने दुकानाचे पत्रे उचकटून आत प्रवेश केला आणि २४ इंची ओणीडा टीव्ही आणि डीव्हीआर असा एकूण १५ हजार रुपये किमतीचा माल लंपास केला.

शंकर भगवान कोकाटे (वय ६८) यांच्या फिर्यादीवरून परंडा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ट्रान्सफॉर्मरसाठी खामसवाडीकरांचा महावितरणला अल्टीमेटम

### महावितरणकडून ट्रान्सफॉर्मर दिरंगाई प्रकरण...

**तभा वृत्तसेवा**
**खासमवाडी, दि.१० डिसेंबर -**

खामसवाडी (ता. कळंब) येथील ३३ के.व्ही. सबस्टेशनमधील ट्रान्सफॉर्मर सतत बिघाड होत असल्याने गावकऱ्यांनी १९ जुन २०२२ ला धाराशिव महावितरण येथे जनआंदोलन केले होते. परंतु महावितरण कंपनीने याकडे दुर्लक्ष केल्यामुळे खासमवाडीकरांचा महावितरणला अल्टीमेट दिला आहे.

कांही दिवसांपूर्वी ट्रान्सफॉर्मर दिला गेला, परंतु तोही नादुरुस्त. त्यामुळे गावकऱ्यांनी विजवीतरण अधिकारी यांना विचारणा केली असता तोपर्यंत राहू द्या नवीन मंजुर झाला की देण्याचे आश्वासन दिले होते. तब्बल दोन वर्षांपासून विजवीतरण कढुन दुर्लक्ष होत असल्याने नादुरुस्त ट्रान्सफॉर्मरमुळे विद्युत पुरवठा सतत खंडित होत होता. परिणामी शेतकऱ्यांना याची तीव्र झळ बसत आहे.

वीजवितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सदरील सबस्टेशनकढे दुर्लक्षित केले असल्याने गावकरी यावर तिव्र नाराज असून ट्रान्सफॉर्मर जर वेळेत नाही बसविला. तर येत्या २० डिसेंबर पासून महावितरण कार्यालयासमोर धाराशिव येथे उपोषण करणार आहेत.

प्रभाकर शेळके, अशोक त्र्यंबक शेळके, शरद शेळके, अविनाश शेळके, दयानंद पाटील व गावातील शेतकऱ्यांच्या संयुक्त सह्याचे निवेदन महावितरणला दिले आहे.

महावितरण अधिकारी यांनी तात्काळ ट्रान्सफॉर्मर बसविण्याची व्यवस्था करावी अन्यथा शेतकरी उपोषण तर सुरूच ठेवणार असल्याचे ही सदरील निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## हिंदूवर अत्याचार : सकल हिंदु समाजाची धाराशिवमध्ये निदर्शने

### बांगलादेशमधील हिंदूवर होणारे अन्याय अत्याचार प्रकरणी तात्काळ कारवाईसाठी निवेदन





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**

बांगलादेशमध्ये मागील काही दिवसांपासून हिंदू समाजातील महिला पुरुषांवर अनन्वित अत्याचार होत आहेत. या अत्याचाराला पायबंद घालावा हिंदू समाजाचे मानवाधिकार या अत्याचारामुळे उल्लंघन होत आहे. हिंदू बांधवांच्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने आज धाराशिव येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

या निदर्शनासाठी धाराशिव शहरातील विविध सामाजिक संघटना सर्व राजकीय पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते.यात विश्व हिंदू परिषद ,अधिवक्ता परिषद, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सामाजिक समरसता मंच, हिंदू एकजूट, भारतीय जनता पार्टी, शिवसेना शिंदे, गट शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, शिवप्रतिष्ठान, इस्कॉन, धारासुर मर्दिनी महिला फेडरेशन, राष्ट्रसेविका समिती, यांच्यासह अनेक सामाजिक संघटना या धरणे आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. बांगलादेश मध्ये मागील काही महिन्यांपासून सुरू असलेल्या राजकीय तसेच सामाजिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर तेथील अल्पसंख्यांक असलेल्या हिंदू समाजावर अनन्वित अत्याचार अन्याय होत असून दिवसाढवळ्या हिंदूंची कत्तल तसेच महिलांची इज्जत लुटण्याचे काम सुरू आहे. तसेच हिंदूंची धार्मिक स्थळे नष्ट करणे गोमतीची हत्या आणि गोमातावर हल्ला करणे तसेच हिंदू धर्माची श्रद्धास्थाने यांना इजा पोहोचवणे नष्ट करणे यासारख्या क्रूर घटना घडत आहेत. तब्बल दोन तास चाललेल्या या निदर्शनादरम्यान बांगलादेश मधील हिंदू बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहण्याचा निर्धार करण्यात आला.

तसेच केंद्र सरकारने या राजक परिस्थितीत त्वरित हस्तक्षेप करून तेथील हिंदू बांधवांचे संरक्षण करावे अशी मागणी ही करण्यात आली. या धरणे आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांना धरणे आंदोलनात सहभागी झालेल्या पक्ष सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींच्या शिष्टमंडळानेआपल्या मागण्यांचे निवेदन ही सादर केले.

# मानवी हक्क आदर्श जीवन जगण्याची गुरुकिल्ली : डॉ. अनिल देशमुख




**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१० डिसेंबर -**
श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा (जि. धाराशिव) येथे एनसीसी विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालया पासुन बसस्थानका पर्यंत मानवी हक्का विषयी घोषणा देत ही रॅली शहरात काढण्यात आली. तदनंतर या कार्यक्रमास प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. अनिल देशमुख उपस्थित होते.

त्यांनी आपल्या भाषणात व्यक्ती प्रतिष्ठेसाठी मानवी अधिकाऱ्याचा लढा कसा सुरू झाला व दुसऱ्या महायुद्धानंतर जगभर मानव अधिकाराविषयीची जाणीव निर्माण झालेली आहे.

आदर्श जीवन जगण्यासाठी या हक्काची आज गरज आहे असे सांगितले. भारतीय संविधानाने मूलभूत अधिकाराच्या माध्यमातून भारतीयांना मानव हक्काचे हमी दिली आहे.

आज भारतीय संविधानाने सर्वांना समनतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा, शोषणापासुन स्वरक्षणाचा, धार्मिक स्वातंत्र्याचा, अल्पसंख्यांक स्वरक्षणाचा, घटनात्मक उपाय योजनेच्या अधिकारातुन हक्काच्या स्वरक्षणाची हमी दिली आहे.

याविषयी सर्वांनी जागरूक राहण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणुन डॉ. गिरीधर सोमवंशी व प्रमुख उपस्थिती उप्राचार्य डॉ. विलास इंगळे, डॉ. पदमाकर पिटले तसेच ५३ महाराष्ट्र बटालियन लातूरचे हवालदार राजेंद्र झाला, कोतकर, सोनटक्के नायक सुनिल काळे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक कॅप्टन ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी केले कार्यक्रमाचे आभार कॅडेट ओमकार वाघमोडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, कॅडेटस मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कावलदाऱ्यात बिबट्या; नागरिकांत घबराटीचे वातावरण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**
तालुक्यातील कावलदरा राष्ट्रीय महामार्गालगत चार चाकी गाडी समोरून बिबट्या निघून गेल्याची घटना मंगळवारी सायंकाळी पावणे सात वाजण्याच्या सुमारास आढळून आली. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून याबाबत वन विभागाचे अधिकारी कर्मचारी घटनास्थळी रात्री उशिरा रवाना झाले आहेत.



त्यामुळे परिसरातील शेतकरी तसेच गावातील रहिवासी यांनी सावध राहावे असे आवाहन वन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे याबाबत अधिक माहिती अशी की धाराशिव जिल्ह्यात अनेक ठिकाणी बिबट्या आढळून येत आहे तसेच अनेक शेतकऱ्यांची जनावरे व वासरे या बिबट्याने फाडल्याच्या घटना घडली आहे त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

हे त्यातच मंगळवारी दि.१० डिसेंबर रोजी सायंकाळी पावणे सात वाजण्याच्या सुमारास धाराशिव तालुक्यातील बावी कावलदरा या राष्ट्रीय महामार्ग लगत एका चार चाकी गाडी समोरून हा बिबट्या पसार झाला राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुरेश बिराजदार यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी हा बिबट्या पाहिला. त्यामुळे हे बातमी वाऱ्यासारखे सर्वत्र पसरली वन विभागासही खबर देण्यात आली.

त्यामुळे वन विभागाचे अधिकारी या बिबट्याच्या शोधात रात्री उशिरा घटनास्थळाकडे रवाना झाले त्यामुळे या परिसरातील नागरिकांनी रात्री सावध राहावे असे आवाहन वन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# बांगलादेशात हिंदूवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ परंड्यात सकल हिंदू समाज बांधवांचा मोर्चा

## पंतप्रधान मोदी यांना तहसीलमार्फत निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१० डिसेंबर -**
बांगलादेश मध्ये गेल्या काही महिन्यापासून अल्पसंख्याक असलेल्या हिंदू बंधू-भगिनीवर साधू संतावर प्रचंड अन्याय अत्याचाराच्या घटना सुरू आहेत. या अन्याय अत्याचाराच्या घटनेला प्रतिबंध घालून तेथील हिंदू बांधवांना तात्काळ न्याय द्यावा. तसेच भारत सरकारने हिंदूंच्या न्याय हक्कासाठी पुढाकार घेऊन तातडीने पावले उचलावीत या प्रमुख मागणीसाठी मंगळवार दि.१० डिसेंबर रोजी बांगला देशाचा निषेध करीत परंडा शहरातून सकल हिंदू समाज बांधवांनी मोठा मोर्चा काढून तहसीलदार मार्फत पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांना मागण्याचे निवेदन दिले आहे.

यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी सारंग खंडागळे, लक्ष्मण गोरे, विशाल काशीद, अशोक जाधव, उमेश पालखे, पांडुरंग भवर, सुधीर गटकुळ, शंकर धनवे, राजेश काळे, धीरज ठाकूर यांनी बांगलादेशाच्या निषेधार्थ मोठ मोठ्या घोषणा देत बांगलादेशाचा निषेध केला.



तसेच मोर्चात निवेदन देण्यासाठी शिवसेना ठाकरे गटाचे नेते रणजीत ज्ञानेश्वर पाटील, मेघराज दादा पाटील भाजपाचे राजकुमार पाटील, गणेश खरसुडे, उमाकांत गोरे, बाळासाहेब गिरी, शिवसेना शिंदे गटाचे अण्णासाहेब जाधव, बाळासाहेब गायकवाड आदिसह परंडा शहर व तालुक्यातील सकल हिंदू समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उमरग्यात डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१० डिसेंबर -**
डॉ. बाबासाहेबांच्या शिकवणीप्रमाणे आपण सर्वजण वागलो तर स्वतःचा व समाजाचा, तसेच देशाचा निश्चितच विकास होतो आणि म्हणूनच आजच्या बालसभेच्या दिनानिमित्त आपणही सर्वजण खूप अभ्यास करावा आणि आपले, आपल्या कुटुंबाचे व समाजाचे नाव आजारावर करावे, असे प्रतिपादन समीक्षा सूर्यवंशी यांनी केले.

महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर मध्ये बाल सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी समीक्षा सूर्यवंशी इयत्ता सहावी क ही विद्यार्थिनी अध्यक्षपदावरून बोलत होती.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून संजीवनी श्रीकांत पाटील, सरोजा धोंडीराम राठोड, मुख्याध्यापिका सविता लोहार, सहशिक्षक दत्तात्रय कोकणे, मार्गदर्शक शिक्षक दाजीबा बिराजदार उपस्थित होते. सूत्रसंचालन स्वराली बिराजदार तर आभार प्राप्ती लुल्ले यांनी केले.

# गोसेवा आयोग, पशुसंवर्धनच्यावतीने राज्यस्तरीय प्रशिक्षण नियोजन बैठक

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१० डिसेंबर -**
महाराष्ट्र गोसवा आयोग, पुणे व पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सोशल रिस्पॉन्सिबिलिटी यांच्या सहकार्याने औंध, पुणे येथील पशुसंवर्धन आयुक्तालयाच्या पहिल्या मजल्यावर दि.११ डिसेंबर २४ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत राज्यस्तरीय गो आधारित शेती प्रशिक्षक चिंतन व महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण नियोजन बैठक आयोजित करण्यात आली आहे.

या राज्यस्तरीय गो आधारित शेती प्रशिक्षक चिंतन व महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण नियोजन बैठकीसाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, अहमदाबाद येथील बन्सी गीर गोशाळेचे गोपालभाई सुतारिया, महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या सदस्य सचिव मंजुषा पुंडलिक, गोसेवा आयोगाचे सदस्य सनत गुप्ता, गोसेवा आयोगाचे सदस्य उद्धव नेरकर, गोसेवा आयोगाचे सदस्य नितीन मार्कंडेय, गोसेवा आयोगाचे सदस्य मनीष वर्मा, गोसेवा आयोगाचे सदस्य संजय भोसले, गो कृषी तज्ञ तात्या मगर, गो कृषी तज्ञ श्रीमती पुनम राऊत, राष्ट्रीय कर्तव्य अभियानचे मुख्य संयोजक विजय वरुडकर हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

तरी राज्यस्तरीय प्रशिक्षण नियोजन बैठकीसाठी निमंत्रितांनी उपस्थित राहण्याचे आवाहन पुणे येथील पशुसंवर्धन आयुक्तालयाने केले आहे.

# हिंदुवरील अत्याचार थांबविण्यासाठी नळदुर्गमध्ये पोलिस निरीक्षकांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१० डिसेंबर -**
बांगलादेशात सध्या हिंदूवर जो अन्याय, अत्याचार सुरु आहे. त्याबाबत केंद्र सरकारने तात्काळ यामध्ये हस्तक्षेप करुन तेथील हिंदूंचे रक्षण करावे अशी मागणी नळदुर्ग शहर सकल हिंदु समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांना देण्यात आले आहे.

बांगलादेशात हिंदूवर होत असलेले अत्याचार तसेच मंदिरांवर होत असलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ नळदुर्ग येथे दि. १० डिसेंबर रोजी सकाळी ११ वा. नळदुर्ग शहर सकल हिंदु समाजाच्या वतीने भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला.

या मोर्चामध्ये हिंदु समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. हा मोर्चा आंबाबाई मंदिरापासुन काढण्यात आला. मोर्चा अंबाबाई मंदिरापासुन निघाल्यानंतर नानीमाँ दर्गाह मार्गे माऊली नगर, राष्ट्रीय महामार्ग, संविधान चौक, लोकमान्य वाचनालय, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, शास्त्री चौक, भवानी चौक, महात्मा बसवेश्वर चौक, चावडी चौक, क्रांती चौक मार्गे पोलिस ठाणा असा काढण्यात आला.

या मोर्चामध्ये, सकल हिंदु समाजाचे गणेश मोरडे, राजकुमार गाढवे, अजय दासकर, अक्षय भोई,विजय ठाकुर, माजी नगरसेवक संजय बताले, बसवराज धरणे, नितीन कासार,विनायक अहंकारी,संजय विठ्ठल जाधव, सुधीर हजारे, नळदुर्ग शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सतीश पुदाले, भाजयुमोचे जिल्हा सरचिटणीस श्रमिक पोतदार, अॅड. धनंजय धरणे, शिवप्रतिष्ठानचे गजानन कुलकर्णी, शहर भाजपचे अध्यक्ष धीमाजी घुगे, विलास येडगे, सुहास येडगे, सागर हजारे,व्यापारी महासंघाचे सुभाष कोरे, पंचायत समितीचे माजी सदस्य साहेबराव घुगे, वी पिस्के, अजय ठाकुर, श्रीकांत कुलकर्णी, अंकुश चिनकरे, सागर कलशेट्टी, संदीप गायकवाड यांच्यासह हिंदु बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. मोर्चात सहभागी झालेल्या हिंदु बांधवांनी बांगलादेशात हिंदूवर होत असलेल्या अत्त्याचार, अन्यायाच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त केला असुन एक है, तो सेफ है हा नारा देत हिंदु बांधवांनी एकसंघ राहिले पाहिजे असे म्हटले आहे.हा मोर्चा पोलिस ठाण्यात आल्यानंतर मिर्चाचे विसर्जन करण्यात आले.

यावेळी सकल हिंदु समाजाच्या वतीने पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी मोर्चा जाणाऱ्या मार्गावर पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# परंडा तालुक्यातील अवैध दारु दुकाने बंद करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१० डिसेंबर -**
परंडा तालुक्यातील वडनेर (ता. परंडा) येथील रहिवासी पप्पूलाल लांडे यांनी जिल्हाधिकारी उपविभागीय कार्यालय या ठिकाणी रितसर निवेदना द्वारे अशी मागणी केली आहे की परंडा तालुक्यात अवैध दारू दुकान्याचा सुळसुळाट सुटलेला आहे.

तरी या अवैध दारू दुकानदारांच्या त्रासामुळे आम्ही लायसनधारक दुकानदार यांना खूप त्रास होत आहे.

अशा अवैध दारू धंद्याच्या दुकानामुळे आमचे खूप मोठे आर्थिक नुकसान होत आहे. यामुळे शासनाचा परवाना असुन देखील बार बंद करावा लागला तरी अवैध दारू विकणारे यांच्यावर त्वरित प्रशासनाने कारवाई करावी, अशी मागणी या निवेदनात जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

तसेच राज्य उत्पादन शुल्क महसूल देखील बुडत आहे. त्यामुळे याकडे त्वरित लक्ष देऊन राज्य उत्पादन शुल्क अधिकारी यांनी व पोलीस प्रशासन यांच्या मदतीने त्वरित कार्यवाही करावी, अशी मागणी यांनी निवेदनाद्वारे केले आहे. याच्या प्रती पोलीस अधीक्षक, शुल्क उपादन अधिकारी, तहसी-लदार व पोलीस निरीक्षक यांना देण्यात आल्या आहेत.

शेवटी कार्यवाही झाली नाही तर जिल्हाधिकारी कार्यालयसमोर आमरण उपोषणाला बसणार असलेल्याचा मनोदय व्यक्त केला.

# तेरखेडा येथे श्री दत्त जयंती सप्ताहास स्टेट बँक अधिकाऱ्याची अनोखी अभंगवाणी सेवा

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.१० डिसेंबर -**
दरवर्षी प्रमाणे यंदाही वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे सुतार गल्लीतील जाज्वल्य दैवत श्री.दत्त मंदिरात दत्त जयंतीनिमित्त दि.७ डिसेंबर ते १४ डिसेंबर नाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

विलास महाराज यांच्या मार्गदर्शना नुसार तसेच उमेश महाराज यांचे नेतृत्वात किर्तन, हरिपाठ, हरिजागर, संगीत भजन व अन्नदान आदि कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये ह.भ.प. उमेश महाराज यांच्या काल्याचे किर्तनाने व महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल. दि. ९ डिसेंबर रोजी भूम येथे वास्तव्यास असलेले स्टेट बँक अधिकारी अंबादास देशपांडे यांच्या संगीत विशारदया



अभंगवाणीने हा सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात यमन रागात पारंपरिक भजन जय जय राकृष्ण हरि ने केली त्या नंतर विविध संतांचे अभंग यामध्ये अमृताहुनी गोड नाम तुझे देवा वेढा वेढा रे पंढरी, अमृताची फळे अमृताचे वेली, ज्ञानराज माझी योग्याची साऊली, पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी, निघालो घेऊन दत्ताची पालखी , निर्गुणाचे भेटी आलो सगुणा संगे इत्यादी अभंग अतिशय ढंगदारपणे गाऊन वातावरण भक्तिमय केले. शेवटी संत तुकाराम महाराजांच्या शेवटची विनवणी ह्या भैरवीने कार्यक्रमाची सांगता केली.

कार्यक्रमास तबला साथ उल्हास जवाहिरे, बाळासाहेब चव्हाण, पखावज श्रीरंगबापू पौळ तर सहगायन दत्ता गोळे व टाळ साथ बप्पा जोशी, भगवान पवार यांनी केली.

# व्यापारी महासंघाच्या अध्यक्षपदी सतीश पुदाले यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१० डिसेंबर -**
नळदुर्ग शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष म्हणुन सतीश पुदाले यांची तर सचिव म्हणुन संतोष मुळे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे नळदुर्ग शहरातील सर्व व्यापाऱ्यांनी स्वागत केले आहे.

व्यापारी महासंघाच्या धाराशिव जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची दि.८ डिसेंबर रोजी धाराशिव येथे बैठक पार पडली. या बैठकीस महासंघाचे मराठवाडा विभागाचे अध्यक्ष बंब, मराठवाडा महिला संघटनेच्या अध्यक्षा सीता मोहिते पाटील, गोविंद साकला हे प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होते. या बैठकीत व्यापारी महासंघाच्या नळदुर्ग शहराची कार्यकारीणी जाहीर करण्यात आली.

यामध्ये शहराध्यक्ष म्हणुन सतीश पुदाले यांची तर सचिव म्हणुन संतोष मुळे यांची निवड करण्यात आली आहे.पुदाले आणि मुळे यांची निवड झाल्याबद्दल व्यापारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचा सत्कार करून त्यांचे स्वागत केले. यावेळी बोलतांना व्यापारी



महासंघाचे नुतन नळदुर्ग शहराध्यक्ष सतीश पुदाले यांनी म्हटले की, नळदुर्ग शहरातील व्यापाऱ्यांच्या अडचणी व समस्या सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करणार असुन येणाऱ्या काळात नळदुर्ग शहर व्यापारी महासंघ एक मजबुत महासंघ व्हावा यासाठी आपण प्रामाणिकपणे प्रयत्न करणार असल्याचे सतीश पुदाले यांनी म्हटले आहे.

या बैठकीस व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत जाधव, सचिव महेश वडगावकर, मराठवाडा उपाध्यक्ष संजय मोदानी, नळदुर्ग शहरातील व्यापारी मुकुंद नाईक, सुभाष कोरे व विशाल डुकरे आदीजण उपस्थित होते.

# सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांचे महाराष्ट्र लोकविकास मंचकडून कौतुक



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१० डिसेंबर -**
कळंब तालुक्यातील दाबा गावच्या ऊसतोड कामगारांना लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील मुकादम तुळशीराम गायकवाड यांनी उत्तर सोलापूर मध्ये सोलापूर तुळजापूर रोडपासून आत असलेल्या उळे गावं ठरवड ऐकूर्ग गावाच्या बाजूला धरनातं तुळशीराम गायकवाड या गुत्तेदाराने ऊसतोड कामगाराना बंदिस्त केल्याचा निरोप महाराष्ट्र लोक विकास मंचचे राष्ट्रीय अध्यक्ष विश्वनाथ तोडकर यांना लागला. त्यांच्याकडून तातडीने भूमिपुत्र वाघ यांना या संदर्भात कार्यवाही करण्यासाठी माहिती देण्यात आली.

वाघ यांनी या संदर्भातिल माहिती मिळाल्यावरून, एसपी अतुल कुलकर्णी यांना फोन करून माहिती देऊन विनंती करण्यात आली. सोबत संबंधित पोलीस स्टेशनला अतुल कुलकर्णी यांनी निरोप दिला. संबंधित पोलीस स्टेशनचे पीएसआय, राहुल देशपांडे, एपीएम माने साहेब यांनी तातडीने कार्यवाही केली. बंदिस्त करून ठेवलेल्या ऊसतोड कामगारांना मुक्त केले. सोबत छत्रपती संभाजी नगरच्या कॉन्स्टेबल पार्वती भोसले यांचीही हे कार्यवाही करण्यासाठी आणि संपर्क करण्यासाठी मदत झाली. तेव्हा वरील सर्व अधिकारी आणि पोलीस प्रशासनातील सर्व कर्मचाऱ्यांचे महाराष्ट्र लोक विकास मंचचे राष्ट्रीय अध्यक्ष विश्वनाथ तोडकर, भूमिपुत्र वाघ, यांचे कडून कौतुक होत.

# गुळ पावडर उत्पादकांची विक्रेत्यांसोबत बैठक संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**
महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील गुळ पावडर उत्पादक कारखान्यासाठी काम करणारी इनोवेटिव्ह जॅगरी मॅन्यूफॅक्चर्स असोसिएशन यांच्या वतीने विविध भागातील गुळ पावडर विक्रेत्यांबरोबर बैठकीचे आयोजन सोलापूर येथे करण्यात आले होते.

यावेळी पुढील काळासाठी गुळ पावडर विक्रीचा तसेच उसखरेदीचा दर ठरवण्यात आला. तसेच व्यापारी व कारखानदार यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी कृती समितीची स्थापना करण्यात आली.

यावेळी विविध विषयावर चर्चा करण्यात आली व गुळपावडरचे आगामी काळात दर कमी होणार नाहीत व गुळ पावडरचे मार्केट सर्वांना कसे परवडेल याबद्दल चर्चा करण्यात आली.

अनेक महत्वपूर्ण विषयावर चर्चा करण्यात आली.

यावेळी इज्माचे कार्यकारी अध्यक्ष अॅड. व्यंकटराव गुंड यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडलेल्या मिटिंगमध्ये संघटनेचे पदाधिकारी तसेच व्यापारी सहभागी झाले होते. दराबाबत व्यापार्यांशी सकारात्मक चर्चा करण्यात आल्याचे गुंड यांनी सांगितले.

यावेळी संघटनेकडून सुरेश पाटील, सचिव दत्ताभाऊ कुलकर्णी, विजय नाडे, मधुकर तावडे, दिनकरराव माने, अनिल काळे, संजय खरात, मारोतराव कवळे गुरुजी, सतीश दंडनाईक, बबनराव गवते, खुरपे, प्रवीण प्रजापती यांच्या हस्ते बलरामजी, शशिधरजी, अशोक या व्यापाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

## ▶▶ क्राईम वृत्त...



### चाकूर येथे हिंदू संघटना आक्रमक; प्रतिकात्मक पुतळ्याचे केले दहन

**चाकुर, दि.१० डिसेंबर -**

चाकूर येथील विवेकानंद चौक येथे सकल हिंदू संघटनेच्या वतीने बांगलादेशी हिंदूच्या मानवाधिकार,मालमत्ता आणि जिवाचे संरक्षण करण्यात यावे यासाठी तहसीलदार यांना दि.१० डिसेंबर रोजी निवेदन देण्यात आले. चाकूर शहरातील सर्व हिंदू संघटना विवेकानंद चौक येथे एकत्र येऊन बांगलादेशात हिंदूवर होत असलेल्या आमाणूष आत्याचाराच्या निषेधार्थ हिंदू संघटना आक्रमक होत घोषणाबाजी देण्यात आली. तसेच संबंधित घटनेचा निषेध नोंदवत प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले. यावेळी चाकूर शहरातील सर्व व्यापार्यांनी आपली दुकाने बंद ठेऊन बांगलादेश येथील हिंदूवर होत असलेल्या घटनेचा तिव्र निषेध करून या आंदोलनात व्यापारी सहभागी झाले होते. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ तालुका संघचालक गुणवंतराव जानकर, सुरज सोनटक्के, बालाजी कोईलवाड बजरंग दल जिल्हा संयोजक हणमंत शेळके, नितीन जानकर, मेघराज बाहेती, युवराज पाटील, संतोष माने, राजीव डिगोळे, माणषी सराफ, ॲड.श्रिधर सोनटक्के, बालाजी पासीमे, बालाजी गोडभरले, मोहन कुलकर्णी, अर्जुन भोईटे, महेश सोमवंशी, ॲड. पुरूषोत्तम शेटे सह विविध हिंदू संघटना व हिंदू बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



### इनरव्हील क्लबच्या वतीने लक्ष्मीबाई शाळेत दातांची तपासणी

**उदगीर, दि.१० डिसेंबर -**

लक्ष्मीबाई प्राथमीक शाळा गोपाळनगर येथे इनरव्हील क्लब ऑफ उदगीरच्या वतीने मंगळवारी शालेय विद्यार्थ्यांची दंत तपासणी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना दाताची काळजी कशी घ्यावी, ब्रश कसे करावे, किड लागु नये म्हणुन काय काळजी घ्यावी या संदर्भात दंतरोगतज्ञ डॉ. सुप्रिया सोनटक्के, डॉ. शितल दापकेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन दातांची तपासणी करण्यात आली. यावेळी क्लबच्या वतिने ब्रश, पेष्ट, फळांचे वाटप करण्यात आले. इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा मानसी चन्नावार, सेक्रेटरी पल्लवी मुक्कावार, आयएसओ प्रिया नारखेडे, सदस्या रोहीनी साठे, सुजाता कोनाळे, तुलसी देशमुख, स्वाती बिरादार, मुख्यध्यापक मंगेश तोडकर शिक्षक कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### औशात पद्मश्री सतीश व्यासांचे संतूर वादन सोहळ्याचे आयोजन

**औसा, दि.१० डिसेंबर -**

समर्थ सद् गुरु श्री ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांच्या २५ व्या पुण्यतिथीनिमित्त जागतिक कीर्तीचे संतूर वादक पद्मश्री पंडित सतीश व्यास यांचा संतूर वादन सोहळ्याचे आयोजन समाधी मंदिर गोपाळपूर येथे शनिवार दि.१४ रोजी आयोजित करण्यात आले आहे. शास्त्रीय गायन संगीत क्षेत्रातील जाणकार रसिक स्रोत्यांनी तसेच नाथ भक्तांनी या संगीत, गायनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन हभप. ज्ञानराज गुरुबाबा महाराज औसेकर यांनी केले आहे. सद्गुरु श्री ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांच्या वार्षिक पुण्यतिथी उत्सवानिमित्त संगीत, गायन क्षेत्रातील जगविख्यात कलाकारांची कला सेवा दरबाराचे आयोजन करण्यात येते. यावर्षी दि.१४ रोजी समाधी मंदिरात सायंकाळी ४ वाजता या शास्त्रीय संगीताचा सेवा दरबार सोहळा संपन्न होत आहे.



### स्मशानभूमीच्या रस्त्यासाठी चापोली येथील ग्रामस्थांचा आत्मदहनाचा इशारा

**चाकूर, दि.१० डिसेंबर -**

चाकूर तालुक्यातील चापोली येथील सार्वजनीक स्मशानभूमीकडे जाण्यासाठी रस्ता द्यावा या मागणीचे निवेदन ग्रामस्थाच्या वतीने उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे यांना देण्यात आले. चापोली येथील सार्वजनीक स्मशानभूमीत अंतवीधी साठी जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे ग्रामस्थांनी निवेदन देऊन उपोषण करूनही प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्यामुळे ग्रामपंचायत कार्यालयासमोर सामुहिक आत्मदहन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी उपविभागीय अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे. या निवेदनावर सुर्यकांत शेवाळे, निलेश मद्रेवार, रमेश पाटील, भाऊसाहेब हुलगुंडे, नवनाथ गोरगिळे, गणपत तेलंगे, लक्ष्मण पेटकर, गंगाप्रसाद मद्रेवार, नारायण काचे, युवराज भोसले यांच्या स्वाक्षरी आहेत.

### शांताबाई निटुरे यांचे निधन

**उदगीर, दि.१० डिसेंबर -**

माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे यांच्या मातोश्री श्रीमती शांताबाई प्रभूअप्पा निटुरे (वय ९६) यांचे वृध्दापकाळाने मंगळवार दि.१० डिसेंबर रोजी पहाटे ३.३० वाजता निधन झाले. शांताबाई प्रभूअप्पा निटुरे या धार्मिक आध्यात्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे व रामेश्वर निटुरे, तीन मुली, सुना, नातवंडे, पत्रवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर मंगळवार दि.१० डिसेंबर रोजी दुपारी ३.३० वाजता राजराजेश्वरी मंदिर मल्लापूर देगलूर रोड उदगीर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



# बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचाराच्या निषेधार्थ औशात आंदोलन






**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१० डिसेंबर -**

बांगालादेशात राहणाऱ्या हिंदू बांधवावर होत असलेल्या असहिष्णू आणि अमानवीय अत्याचारांमुळे हिंदू बांधव त्रस्त आणि व्यथित झाले आहेत. या अत्याचाराच्या निषेधार्थ सरकार व समाजकंटकांचा निषेध करुन जय श्रीरामच्या घोषणांनी शहरातील चौक दणाणुन गेला होता. हनुमान मंदीरासमोर मंगळवार दि.१० रोजी सकाळी ११ ते २ वाजेपर्यंत धरणे आंदोलन करीत औसा तालुक्यातील सकल हिंदू बांधवांच्या वतीने तहसिलदार यांच्या मार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे अनेक मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

बांगला देशातील हिंदूच्या मंदीराची तोडफोड करुन अल्पसंख्यांक हिंदू अबालवृध्द व महिलावर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनेत दिवसेदिवस वाढ होत आहे. अशा मानवधिकार वृत्तीना रोखण्यासाठी तात्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी उपस्थितांनी एकमुखाने यावेळी केली. चिन्मय कृष्ण महाराज यांच्यावर खोटा गुन्हा दाखल करुन जबदरस्तीने आणि हिंसात्मक पध्दतीने अटक केली. हे निंदनीय व शासनास अशोभनीय कृत असून अशा अत्याचारिक कारवाई नंतर हिंदू समाजाने लोकशाही पध्दतीने केलेल्या आंदोलनास सरकारने हिंसात्मक पध्दतीने व अत्याचाराने चिरडले आहे. याचबरोबर चित्तागोंग मध्यवर्ती कारागृहात त्यांच्यावर अत्याचार करण्यात येत आहेत, असा आक्षेप यावेळी हिंदू सकल बांधवांनी घेतला आहे. यावेळी उपस्थित अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. दुपारी २ वाजता हनुमान चौकातून तहसिल कार्यालयापर्यंत बांगलादेश सरकारच्या विरोधात व हर हर महादेव, जय भवानी जय शिवाजी, वंदे मातरम्, जय श्रीराम जय जय श्रीराम च्या घोषणांनी शहरातील मुख्य रस्ता दणाणुन गेला होता. यांनतर तहसिलदार यांना निवेदन देण्यात आले. भारतीय हिंदू समाज बांगलादेशातील हिंदूवर होत असलेल्या अत्याचारा बद्दल सजग आहे. आणि औसा तालुक्यातील सकल हिंदू बांधवांच्या वतीने करण्यात आलेल्या मागण्या या जागतिक स्तरावर मान्य असलेल्या मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी केलेल्या आहेत.

या अत्याचाराच्या विरोधात व हिंदूच्या संरक्षणासाठी भारत सरकारकडून होणाऱ्या प्रत्येक निर्णयासोबत ठामपणे सोबत राहण्याचा निर्धार केला असल्याचे या निवेदनात सकल हिंदू बांधवांनी म्हटले आहे. यावेळी औसा शहरासह तालुक्यातील हिंदू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निलंगा येथे कडकडीत बंद...
# हिंदूचे छत्रपती शिवाजी महाराज चौकात धरणे आंदोलन




**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१० डिसेंबर -**

बांगलादेशातील हिंदू समाजावर, महिलांवर अत्याचार व साधू संतांचा छळाच्या विरोधात मंगळवार दि.१० डिसेंबर रोजी सकल हिंदू समाजाच्या वतीने निलंगा येथील बाजारपेठ कडकडीत बंद ठेवण्यात आला. येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये सकल हिंदू समाजाच्या वतीने धरणे आंदोलन करत हिंदू बांधवांच्या वतीने बांगलादेशातील हिंदू वरील अन्याय अत्याचाराचा जाहीर निषेध नोंदविण्यात आला आहे.

बांगलादेशातील हिंदू समाजावर सातत्याने होणारे अन्याय, अत्याचार, महिलावर बलात्कार, साधु संतांचा अमानुष छळ या सारखा घटनां घडत आहेत. याच्या निषेधार्थ निलंगा येथील सकल हिंदूसमाजाच्या वतीने पुकारण्यात आलेल्या बंद मध्ये येथील व्यापारांनी सहभाग नोंदवत आपले दुकाने बंद ठेवून या बंदमध्ये १०० टक्के सहभागी झाले. याबाबत येथील सकल हिंदू समाजाच्या तहसिलदारांना निवेदन देण्यात आले.

निलंगा शहरातील निषेधार्थ पुकारण्यात आलेल्या बंदला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला आहे. आज सकाळपासूनच हिंदू बांधव रस्त्यावर उतरत बांगलादेश सरकारच्या जाहीर निषेधच्या घोषणा देण्यात आल्या व होणारा अत्याचार तात्काळ थांबवावा अशी एकजुटीने मागणी करण्यात आली. या धरणे आंदोलनात मोठ्या संख्येने हिंदू बांधवांची उपस्थिती होती. या कडकडीत बंदमध्ये चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# उदगीरात दुकानाला आग; २८ लाखाचे नुकसान

## अग्निशामनचे वाहन वेळेवर न आल्याने नुकसान जास्त झाल्याचा दुकानदाराचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१० डिसेंबर -**

येथील भाजी मंडई परिसरात रविवारी रात्री साडेअकरा वाजता लागलेल्या आगे मध्ये दोन दुकाने जळून भस्मसात झाली आहेत. या आगीमध्ये दोन्ही दुकानाची मिळून २८ लाख ५० हजार रुपयाचे नुकसान झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. अग्निशामन दलाची गाडी वेळेवर आली नसल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा आरोप पीडित दुकानदाराने केला आहे.

याबाबत थोडक्यात माहिती अशी की उदगीर शहरातील भाजी मंडई परिसरात बॉम्बे शूटिंग, शर्टींग नावाचे दुकान आहे. या दुकानांमध्ये ग्राहकांना त्यांच्या पसंतीचे कपडे खरेदी केल्यानंतर मोजमाप घेऊन शिलाई करून देण्याचे दुकान आहे. तर यांच्या बाजूलाच उबेद एअर कंडिशनर रेफ्रिजरेटर रिपेरिंग सेंटर नावाचे दुकान आहे. या ठिकाणी ग्राहकांचे फ्रिज, वॉशिंग मशीन, एसी, कुलर दुरुस्ती केल्या जात असे. रविवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास ही दोन्ही दुकाने नेहमीप्रमाणे बंद करून दुकान चालक घरी गेले होते. रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास यांच्या दुकानाला आग लागल्याचे प्रत्यक्ष दर्शनी नागरिकांनी पाहिले व आजूबाजूच्या दुसऱ्या लोकांनी दुकानदाराशी संपर्क करून झालेली घटना फोनवरून सांगितली. दरम्यान नगरपालिकेच्या अग्निशामक विभागाला सदरील घटना सुद्धा कळविण्यात आली होती. कपड्याचे दुकानात आगीने रौद्ररूप धारण केले बघता बघता ही दोन्ही दुकाने आगीच्या भक्षस्थानी पडली. आग लागून माहिती झाली असताना सुद्धा नगरपालिकेच्या अग्निशामक दलाचे वाहन तब्बल ४५ मिनिट उशिरा आल्याचा आरोप बॉम्बे शूटिंग शर्टींगचे मालकहमीद बागवान यांनी केला आहे. या आगीमध्ये विक्रीसाठी आणलेले कपडे, तसेच ग्राहकांच्या मापाचे शिवून तयार असलेले कपडे, शिलाई मशीन, टेलरिंगचे साहित्य व दिवसभर कपडे विक्रीतून आलेले २ लाख रुपये रोख असा २५ लाखाचा एवज जळाल्याचे त्यांनी पोलिसात माहिती देऊन कळवले असून उबेद एअर कंडीशनर रेफ्रिजरेटर रिपेरिंग सेंटरच्या दुकानात विविध प्रकारचे ग्राहकांचे दुरुस्तीसाठी आलेले फ्रिज, वाशिंग मशीन, एसी, कुलर दुरुस्ती करून ठेवलेले फ्रिज असा एकूण ८ लाख ५ हजार रुपयाचे नुकसान झाल्याची त्यांनी पोलिसांना कळवले आहे.

रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास नगरपालिकेचे वाहत आल्यानंतर त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवल्याचे तेथे उपस्थित असलेल्या नागरिकांनी सांगितले.

# शिरूर अनंतपाळ येथे सकल हिंदू बांधवाकडून रॅली




**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अ., दि.१० डिसेंबर -**

बांगलादेश मधील हिंदु व दलित समाजा वरील होत असलेल्या अत्याचार व दिनांक २६ नोव्हेंबर रोजी इस्कॉनच्या संबंधीत चिन्मय कृष्ण महाराज यांना खोट्या गुन्ह्यात अडकवून जबदरस्तीने आणि हिंसात्मक पध्दतीने केलेली अटक ही निंदनीय आणि कुठल्याही शासनास अशोभनीय आहे.

सदरील अटकेनंतर बांगलादेशातील हिंदू समाजाने लोकशाही पध्दतीने केलेल्या आंदोलनास हिंसात्मक पध्दतीने आणि अत्याचाराने चिरडण्यात आले.

याचबरोबर असेही लक्षात आले आहे की, चिन्मय कृष्ण महाराजांना चित्तागोंग मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे, जिथे त्यांना योग्य तो औषधोपचार आणि शाकाहारी भोजन मिळण्यास जाणीवपूर्वक अडचणी निर्माण करण्यात येत आहेत. ह्या बाबी जागतिक स्तरावर मान्य अशा मानवाधिकारांचे उल्लंघन करणाऱ्या आहेत.

म्हणून याच्या विरोधात आज शिरूर अनंतपाळ शहर व ग्रामीण भागामधील हिंदुसमांजाकडून धरने आंदोलन करुन तहसीलदार यांच्या मार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी तालुक्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते. माजी सभापती गोविंदराव चिलकुरे, भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, अनिल शिंदे, विकास शिंदे, गोविंद पोद्दार, सुभाष मर्डे, अचुतराव कुलकर्णी, रवींद्र कुलकर्णी, रत्नाकर सुगावे, सुरेश लोंडे, ॲड. योगेश बरदाळे, माधव चलमले, भागवत गड्डीमे, गणेश धुमाळ, गोविंदराव पाटील, राजनारायण बिरादार व तसेच सकल हिंदू समाजाकडून यावेळी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सव्वा लाखाच्या गुटख्यासह चार चाकी वाहन जप्त

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१० डिसेंबर -**

शहरातील नवी आबादी नागुरे मंगल कार्यालय जवळ एका घरातील गुटखा कारमधुन जिल्हा पोलीस अधीक्षकाच्या पथकाने कारवाई १ लाख २५ हजार रुपयांचा गुटखा व एक चार चाकी वाहन असा एकूण ६ लाख २५ हजार ३६५ रुपयाचा ऐवज जप्त करण्यात आला असून एकाविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रविवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास शहरातील नवी आबादी भागातील नागुरे मंगल कार्यालय जवळ आरोपीने महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेले सूगंधीत पान मसाला ज्याची किंमत १ लाख २५ हजार ३६५ रुपयांचा माल हा त्याचे घरातून कार क्र.एम.एच.१२, के. जे. २७१७ ज्याची अंदाजे किमत ५ लाख रुपये असे एकुण ६ लाख २५ हजार ३६५ रुपयांचा माल आपले कब्जात बाळगुन वाहतुक करण्याच्या तयारीत असताना मुद्देमालासह मिळून आला. पोलीस अधीक्षक यांचे अवैध प्रतिबंधक पथकातील पोलीस उपनिरीक्षक आनंद नामदेव श्रीमंगल यांच्या फिर्यादीवरुन रविवारी शहर पोलीस ठाण्यात सिध्देश्वर उर्फ पंतू भालके (रा. नवी आबादी उदगीर) याच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# देवर्जन येथे दहा मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पाचे भूमिपूजन



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१० डिसेंबर -**

तालुक्यातील देवर्जन येथील ३३ केवी वीज उपकेंद्र अंतर्गत महादेव बेटाच्या जवळ दहा मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्प क्षमता असलेल्या प्रकल्पाच्या कामाचा भूमिपूजन सोहळा देवर्जनचे सरपंच अभिजित साकोळकर यांच्या हस्ते बुधवारी झाले.

यावेळी सिध्दलींग शिवाचार्य स्वामी विरक्त मठ देवणीकर यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली.

देवर्जन ग्रीन एनर्जी प्रायवेट लि.चे संस्थापक मलिकार्जुन मानकरी, सिद्धेश्वर सहकारी बँकेचे संचालक विजयकुमार मानकरी, देवर्जन सहकारी सोसायटीचे अध्यक्ष दयानंद रोडगे, संचालक तानाजी रोडगे, राजकुमार गरीबे, दत्ता खटके, उपसरपंच वैजनाथ वाडीकर, श्रीनिवास धोतरे, विनायक धोतरे, गंगाधर गरीबे, विरभद्र धोतरे, प्रभुराव कोरे, रमेश कोतवाल, रेवण स्वामी, रणजीत मानकरी, विजयकुमार विळेगावे, संगप्पा कडगे, राम रुपनुरे, बालाजी बिरादार, बाळासाहेब पाटील, कमलाकर पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी मानकरी म्हणाले, देवर्जन उपकेंद्र अंतर्गत देवर्जन ग्रीन एनर्जी कंपनीच्या वतीने तीस कोटी रुपये खर्चुन दहा मेगावॅट निर्मितीचा प्रकल्प उभारण्यात येत आहे.

येत्या चार महिन्याच्या काळात हा प्रकल्प कार्यवाहीन्वित होणार आहे. या उपकेंद्रांतर्गत असलेल्या सर्व शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी या प्रकल्पाची निर्मिती होत असून अवघ्या पाच सहा महिन्याच्या काळामध्ये या भागातील शेतकऱ्यांचे दिवसा वीज मिळण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कल्पक दृष्टिकोनातून व मंत्री संजय बनसोडे यांच्या पुढाकारातून राबविण्यात येत असलेल्या धोरणानुसार येथे हा प्रकल्प मंजूर झालेला आहे.

# बांगलादेशातील हिंदूवरील अन्यायाविरोधात उदगीर येथे मानवी साखळी आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१० डिसेंबर -**

बांगला देशातील हिंदू समाजावर होत असलेले हल्ले व इस्कॉनचे धार्मिक नेते चिन्मय कृष्णदास यांनी बांगला देशातील हिंदू समाजाला जागृत करण्यासाठी केलेल्या आवहानामुळे बांगलादेशाने त्यांना देशद्रोहाच्या गुन्ह्यात अटक केली आहे.

न्यायालयातून सुध्दा त्यांना जामीन मिळला नसून त्यांच्यासाठी केस लढणाऱ्या वकीलावरही जवीघेणे हल्ला करण्यात आला आहे. यामुळे तेथील परिस्थिती खूप बिकट असून बांगलादेशाच्या सरकारने चिन्मय कृष्णदास यांना सध्या कोठे ठेवले आहे व ते कोणत्या परिस्थितीत आहेत याचीही माहिती सरकार देत नाही. आरक्षणाच्या नावाखाली बांगला देशात सुरु झालेल्या हिंसाचारामध्ये थेट हिंदू, दलित, जैन, शिख आदी धर्मावर हल्ले होत असून महिलांचे अपरहरण, बलात्कार, कत्तली केल्या जात आहेत. मंदिरे उद्ववस्त होत आहेत. पूर्णपणे षडयंत्र करून इस्लामीक राष्ट्र बवण्याची तयारी आहे.

तेथील हिंदू समाज भयभीत झाला असून त्यांना वाचवण्यसाठी व बांगलादेशावर दबाव आणावे यासाठी मानवी साखळी आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनात उदगीर तालुक्यातील सर्व राज्यकीय पक्षाचे पदाधिकारी, हिंदुत्ववादी संघटना, सामाजिक संघटना, मठ मंदिरातील पुजारी, संत, महंत, ट्रस्टी, ला.ब.शा.प्रा.चे मुख्याध्यपक, शिक्षक व शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी छ. शाहू महाराज चौक ते तहसिल कार्यालयापर्यंत मानवी साखळी आंदोलनात विविध घोषणा देत राज्य व केंद्र सरकारचे हात बळकट करून बांगलादेशातील हिंदूना न्याय देण्यासाठी व चिन्मय कृष्णदास यांना जेलमधून बाहेर काढून त्यांना सुरक्षा देण्यास भाग पाडावे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तहसीलदार यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

या साखळी आंदोलनाचे प्रमुख विश्व हिंदू परिषदेचे, शहराध्यक्ष महादेव घोणे, संतोष कुलकर्णी, सहमंत्री श्रीपाद करंजीकर, सह मंत्री आनंद महामुणी, उध्दव महराज, सतिश पाटील, प्रशांत ममदापूरे, अभिजीत पाटील, बाळासाहेब बिरादार, रोहित बोईनवाड, अनिकेत कोळी, रमेश सदानदे, बुर्ले, आनंद, सिद्धु अभंगे, रामेश्वर चांडेश्वरे हे प्रमुख होते. तर प्रमुख उपस्थिती साईनाथ चिमेगावे,



शंकरलिंग मठाचे मठाधिश सुखदेव महाराज, विश्वकल्याण यतीन्द्र आश्रम, विश्वसेवा विश्वकल्याण आश्रम, बालाजी महाराज जकनाळ यांच्यासह पतंजलीचे सुरेंद्र अन्कनगिरे, भाजपा माजी नगराधाक्ष बस्वराज बागबंदे, उपाध्यक्ष सुधीर भोसले, शहराध्यक्ष मनोज पुदाले, तालुकाध्यक्ष शिवशंकर धुप्पे, माजी जि.प. अध्यक्ष राहूत केंद्रे, भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे, वसंत शिरसे, जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे, तालुकाधक्षा उषा माने, विधानसभा प्रमुख तथा ग्राप .सोमथपूर सदस्या शिवकर्णा अंधारे, बवीता पांढरे, अरुणा चिमगांवे, मनसे लातूर जिल्हाध्यक्ष संजय राठोड, मनोहर भंडे, सचिन साबणे, बंडेप्पा स्वामी, विश्वनाथ गायकवाड, आनंद बुंदे, ॲड. दत्ताजी पाटील, सावन पस्तापूरे, रामेश्वर पवार, पंडित सुर्यवंशी, कल्लप्पा स्वामी, पप्पू गायकवाड, डॉ. चंद्रकांत कोठारे, मोतीलाल डोईजोडी, यलमटे मामा, राम जाधव आदी शेकडोच्या संख्याने हिंदु प्रेमी उपस्थित होते.

या आंदोलनासाठी पोलिस प्रशासनाने वाहतूक व्यवस्था सुरळीत पार पाडली व आंदोलनातील हिंदु प्रेमींनी योग्य ते सहकार्य केल्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नागरिकांनी आपल्या मानवी हक्काबाबत जागरूक राहावे

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० डिसेंबर-**
आपल्याला सन्मानाचे जीवन जगावयाचे असल्यास नागरिकांनी आपल्या मानवी हक्काबाबत जागरूक असले पाहिजे, असे प्रतिपादन येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. यशवंत वळवी यांनी केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, व्यक्तिमत्त्व विकास व स्पर्धा परीक्षा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मानवी हक्क दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते, तर विचारपीठावर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. संजय पवार, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. मनोहर चपळे, प्रा. किसनाथ कुडके, प्रा. डॉ. अश्विनी रोडे, नामदेव बेंदरगे आदीची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन झाले. पुढे बोलताना डॉ. वळवी म्हणाले की, भारतीय संविधानात स्वातंत्र्य, समता न्याय, बंधुता, मानवता, धर्मनिरपेक्षता या मूल्यांसोबतच हक्क आणि अधिकार याविषयी तरतुदी केल्या आहेत. संविधानाने माणसाला माणूस म्हणून जगण्याचे संपूर्ण अधिकार दिले आहेत, तरीही समाज जीवनामध्ये नेहमी हक्कांची पायमल्ली होताना दिसत असते. कामगार, महिला, बालक, अंध-अपंग, ज्येष्ठ नागरिक, मागासवर्गीय, दलित हे नेहमी हक्कापासून वंचित असतात. होणाऱ्या अन्याय अत्याचाराचा विरोध केल्याशिवाय हक्क कोणालाही प्राप्त होत नाहीत जगभरात संघर्षातूनच माणसाला हक्क प्राप्त झाले आहेत. असे शेवटी वळवी म्हणाले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.



## संक्षिप्त वृत्त...

### माजी आमदार कव्हेकर यांच्याकडून पाटील कुटुंबियाचे सांत्वन

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० डिसेंबर-**
लातूर येथील औसा रोड भागातील शिवराज सोपानराव पाटील कामखेडकर(वय ६८ वर्ष) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुन-नातवंडे असा परिवार आहे.

या घटनेची माहिती मिळताच भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा व गुजरात राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी त्यांच्या लातूर येथील औसा रोड भागातील निवासस्थानी भेट देऊन कामखेडकर-पाटील कुटुंबियाचे सांत्वन केले. यावेळी त्यांचे चिरंजीव पुनीत शिवराज पाटील, शार्दूल मेघराज पाटील, श्रीजीत प्रेमराज पाटील उपस्थित होते. माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या समवेत जेएसपीएमचे समन्वयक विनोद जाधव, वैद्यकीय अधिकारी डॉ.बाळासाहेब जाधव, माजी रेणापूर तालुका कृषी अधिकारी देवेंद्र जाधव, सूरेंद्र जाधव उपस्थित होते.

### मालमत्ता कर वसुलीसाठी मनपाचा कारवाईचा धडाका

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० डिसेंबर-**
मालमत्ताधारकांकडे असणारा थकीत कर वसूल करण्यासाठी मनपाने



हाती घेतलेली धडक वसुली मोहीम ६ जप्ती पथकामार्फत सुरू आहे.या अंतर्गत शहरातील चारही झोनमध्ये गाळ्यांना सील ठोकणे, नळजोडण्या खंडित करणे अशी कारवाई पालिकेकडून केली जात आहे.मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे, उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांच्या निर्देशानुसार वसुली मोहीम सुरू आहे.

झोन ए अंतर्गत १ लाख ६ हजार २४८ रुपयांच्या थकित मालमत्ता करापोटी एक गाळा सील करण्यात आला.एका मालमत्ता धारकाकडे ९९ हजार ६८५ रुपये कर थकलेला असल्याने त्याच्याही गाळ्याला सील ठोकण्यात आले.बी झोनमध्ये एका मालमत्तेवर कार्यवाही करताच संबंधिताने २ लाख ८१ हजार २९ रुपयांचा धनादेश अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला.सी झोनमध्येही असाच अनुभव आला. कार्यवाही करताच मालमत्ताधारकाने १ लाख ५४ हजार ६६२ रुपयांचा धनादेश अधिकाऱ्यांना दिला.आणखी एका प्रकारात ४१ हजार ४१९ रुपये व ८७ हजार ६५३ रुपये थकीत करापोटी नळजोडण्या खंडित करण्यात आल्या. नागरिकांनी आपल्याकडे थकीत असणारा मालमत्ता कर पालिकेकडे जमा करून सहकार्य करावे,अन्यथा वसुलीची मोहीम अधिक तीव्र करण्यात येईल,असा इशारा मनपा उपायुक्त डॉ.पंजाब खानसोळे यांनी दिला आहे.

### लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० डिसेंबर-**
जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये लातूर जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश ११ डिसेंबर, २०२४ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते दि. २५ डिसेंबर, २०२४ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.
या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे.

## महायुतीच्या आमदारांना लागले मंत्रिपदाचे वेध

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० डिसेंबर-**
नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत लातूर जिल्ह्यात महायुतीच्या उमेदवारांनी दणदणीत यश मिळविले. सहा पैकी पाच विधानसभा मतदारसंघ युतीच्या ताब्यात आले असून आता या आमदारांना मंत्रिपदाचे वेध लागले आहेत.

जिल्ह्यात सहा विधानसभा मतदार संघापैकी लातूर शहर मतदारसंघ वगळता उर्वरित पाच जागा महायुतीच्या पारड्यात पडल्या. येथून काँग्रेसचे अमित देशमुख यांनी विजय मिळविला. लातूर ग्रामीण मतदार संघातून भाजपचे रमेश कराड, औसा येथून अभिमन्यू पवार तर निलंगा विधानसभा मतदार संघातून संभाजी पाटील निलंगेकर यांनी विजय मिळविला.

राष्ट्रवादी काँग्रेसने दोन मतदार संघ आपल्या ताब्यात घेतले असून अहमदपूरची जागा बाबासाहेब पाटील आणि उदगीरची जागा संजय बनसोडे यांनी आपल्याकडे ठेवण्यात यश मिळविले. येत्या दोन - तीन दिवसात मंत्रीमंडळ विस्तार होणार असून आता हे आमदार मंत्रिपद मिळण्याच्या अपेक्षेत आहेत. प्रत्येक जण आपल्या गॉडफादरच्या मदतीने 'फिल्डिंग' लावत आहेत.



औश्याचे आमदार अभिमन्यू पवार हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू म्हणून परिचित असल्यामुळे त्यांना मंत्रिपदाची लॉटरी लागू शकते. निलंग्याचे आमदार संभाजी पाटील यांनी यापूर्वी कॅबिनेटमंत्री म्हणून काम केले असून ते सलग तीन वेळा निवडून आले आहेत. त्यामुळे त्यांचा अनुभव लक्षात घेता तेपण मंत्रिपदाच्या शर्यतीत आहेत. लातूर ग्रामीणचे भाजपचे आमदार रमेश कराड यांनी प्रथमच आमदारकी मिळविली असून तेही मंत्रीपदाच्या अपेक्षेत आहेत. भाजपच्या या तीन आमदारापैकी कोणाची मंत्रीपदी वर्णी लागेल याकडे त्यांच्या कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

राष्ट्रवादीचे अहमदपूरचे आमदार बाबासाहेब पाटील हे जेष्ठ आमदार आहेत तर २०१९ च्या निवडणुकीत पहिल्यांदा आमदार झालेले संजय बनसोडे यांना राज्य मंत्री पद मिळाले होते. राष्ट्रवादी काँग्रेसमधून बाहेर पडून सत्तेत सामील झाल्याने अजित पवार यांच्या सोबत बनसोडे गेले. त्याचे बक्षीस म्हणून बनसोडे यांना कॅबिनेट मंत्रीपद मिळाले. काल - परवाच्या विधानसभा निवडणुकीत बनसोडे यांनी विक्रमी मताधिक्य घेवून विजय मिळविल्यामुळे बनसोडे यांची मंत्रिपदावर भक्कम दावेदारी मानली जात आहे. राष्ट्रवादीच्या वाट्याला कमी मंत्रिपदे असल्यामुळे कोणाची वर्णी लागते याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे

## हिंदूवरील अत्याचाराच्या विरोधात लातुरात निदर्शने

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० डिसेंबर-**
बांगलादेशात हिंदूवर अत्याचार होत आहेत. तेथील हिंदूची मंदिरे, धार्मीक स्थळं उध्वस्त करण्यात येत आहेत. हिंदू संत, तसेच महिलांवर अत्याचार होत आहेत. याचा निषेध म्हणून आज लातूरसह जिल्हाभरात सकल हिंदू समाज या बॅनरखाली निषेध आंदोलन करण्यात आले.



लातूर येथे महात्मा गांधी चौकात मोठ्या प्रमाणात हिंदूनी एकत्रीत येऊन बांगलादेश सरकार व तेथील राष्ट्रपती मोहमद युनूस यांचा तीव्र निषेध व्यक्त केला.

त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावे एक निवेदनही दिले असून त्यात बांगलादेशातील हिंदूचे मानवाधिकाराचे हनन, त्यांच्या मालमत्तेचे नुकसान, त्यांच्यावरील अन्याय थांबवावा, तेथील हिंदूची धार्मीक स्थळं, मंदिराचे संरक्षण करावे, हिंदू धर्मीयांची अटक थांबवावी आदी मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.

शहरातील गांधी चौक येथे येथे हिंदू कार्यकर्ते अत्यंत आक्रमक झाले होते. ते मोठ-मोठ्याने घोषणा देत होते. काही आंदोलकांनी तर बांगलादेशचे राष्ट्रपती मोहमद युनूस यांच्या प्रतिमा रस्त्यावर टाकून त्याना चपलांचा प्रसाद दिला.

## लातुरात क्षयरोग शोध मोहिमेचे उद्घाटन

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० डिसेंबर-**
राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात १०० दिवशीय क्षयरोग मोहीम राबविण्यात येत आहे. लातूर जिल्हा क्षयरोग केंद्र व वसंतराव काळे होमिओपॅथीक महाविद्यालय व हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्यमाने वसंतराव काळे होमिओपॅथीक महाविद्यालय व हॉस्पीटल येथे आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते निक्षय वाहनास हिरवा झेंडा दाखवून व क्षयरुग्ण शोध मोहीमेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिपक लांडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.तांबारे एस.एन., मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती, वसंतराव काळे होमिओपॅथीक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. खामितकर एस.सी., उपप्राचार्य डॉ.अतुल कुलकर्णी उपस्थित होते.

वसंतराव काळे होमिओपॅथीक महाविद्यालय व हॉस्पीटल येथील विद्यार्थ्यांनी क्षयरोगाची लक्षणे, निदान व उपचार याबाबत पथनाट्य सादर केले. आमदार विक्रम काळे यांनी, उपस्थितांना जिल्हा क्षयरोग मुक्त करण्यासाठी गावपातळीवर मोहीम राबवित असताना १०० दिवशीय क्षयरोग मोहीमेअंतर्गत जनजागृती व क्षयरोग रुग्ण शोधण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी सर्व आरोग्य संस्थेमध्ये गाव पातळीवर क्षयरोग शोध मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी अतिजोखमीच्या व्यक्तीमध्ये, तसेच जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरीकांनी क्षयरोगाबाबतची तपासणी करुन निदान निश्चितीनंतर संपूर्ण उपचार करुन घ्यावे. क्षयरोगाबाबतच्या गैरसमजूती समुपदेशनामार्फत दूर कराव्यात असे आवाहन केले.यावेळी अनेकांनी मार्गदर्शन केले.

## लातूर-पुणे इंटरसिटी सुरू करा

### खा. काळगे यांची रेल्वेमंत्री वैष्णव यांच्याकडे मागणी

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० डिसेंबर-**
खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी लातूर लोकसभा मतदारसंघासह राज्यातील अनेक प्रश्न लेखी स्वरूपात सभागृहात मांडले आहेत. ते सभागृहाबाहेर विविध मंत्रालयात जाऊन आपल्या मतदारसंघातील योजनांसाठी पाठपुरावा करीत आहेत. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन त्यांनी लातूर-पुणे इंटरसिटी रेल्वे सेवा सुरू करण्याची मागणी केली.

रेल्वेमंत्री वैष्णव हे आकाशवाणी मंत्रीही आहेत. लातूरला आकाशवाणी केंद्र सुरू करावे, सोबतच लातूर रोड-नांदेड, लातूर रोड-बोधन नवीन रेल्वे मार्ग सुरू करावा, तसेच वैष्णोदेवी, नवी दिल्ली, अजमेर, तिरूपतीसाठी लातूरहून सेवा सुरू करावी.



कोल्हापूर-नागपूर रेल्वे रोज चालवावी, तसेच मुंबई, पुणे, हैद्राबादशी कनेक्टीव्हीटी द्यावी अशी मागणी केली आहे. सभागृहात अनेक प्रश्न उपस्थित केले जातात. मात्र, प्रश्न विचारण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाहीत अशा अनेक खासदारांच्या तक्रारी आहेत त्यामुळे संबंधित मंत्र्यांना त्यांच्या कार्यालयात जाऊन गाठीभेटी घेऊन मागण्यांविषयी खा. शिवाजी काळगे हे पाठपुरावा करीत आहेत.

## द्राक्ष बागांची नोंदणी करण्याचे शेतकऱ्यांना आवाहन

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० डिसेंबर-**
लातूर जिल्ह्यामध्ये २०२४-२०२५ या हंगामात निर्यातक्षम द्राक्षबागांची नोंदणी सुरु करण्यात आली आहे. युरोपियन व इतर देशांमध्ये लातूर पटट्यातून दरवर्षी द्राक्ष निर्यात होत असतात अपेडाच्या सहकार्यालयाने ग्रेपनेट प्रणालीद्वारे निर्यातक्षम द्राक्षबागांची नोंदणी करता येणार आहे.

द्राक्ष निर्यातीला चालना देण्यासाठी राज्यात निर्यातक्षम द्राक्ष बागांची नोंदणी, तपासणी, कीड व रोगमुक्त हमी, गमार्क प्रमाणीकरण, फायटोसानिटरी प्रमाणीकरण या सर्व बाबींची ग्रेपनेट प्रणालीद्वारे प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. लातूर जिल्ह्यात २०२३-२०२४ मध्ये १५० निर्यातक्षम द्राक्ष बागांची नोंदणी करण्यात आली होती. सन २०२४-२०२५ वर्षामध्ये फळे व भाजीपाला निर्यातीस चालना देण्यासाठी कृषि विभागामार्फत खास उपक्रम राबतवण्यात येत आहे. यामध्ये जिल्हास्तरावर कृषीमाल निर्यात मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्यात आले आहे. ऑनलाईन नोंदणीसाठी मोबाईल पचा वापर करण्यावर भर देण्यात येत आहे.

निर्यातीबरोबरच स्थानिक बाजारपेठेत ग्राहकांना कीड व रोगमुक्त फळे व भाजीपाला उपलब्ध करुन देण्यासाठी लातूर जिल्ह्याला या वर्षी ३०० द्राक्ष बागांची नोंदणी लक्षांक देण्यात आले आहे. यासाठीच निर्यातक्षम द्राक्ष बागांची अपेडा च्या ग्रेपनेट या ऑनलाईन कार्यप्रणालीवर १ ऑक्टोबर २०२४ पासून मोफत नोंदणी सुरु झाली आहे. त्यामुळे अधिकाधिक द्राक्ष व आंबा बागायतदार शेतकऱ्यांनी बागांची नोंद करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## मुलींचे व्यक्तिमत्त्व चौफेर असावे: जिल्हाधिकारी

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० डिसेंबर-**
जीवन घडवण्यासाठी मुलींनी आपले ध्येय ठरवले पाहीजेत. एक चांगले व्यक्तीमत्व घडवण्यासाठी आपण सर्व क्षेत्रांमध्ये सक्रिय होण्याचे ठरवले पाहीजे तेंव्हाच मुलींचे चांगले व्यक्तिमत्व घडते असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी केले.

कलापंढरी संस्थेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात ग्रामीण भागातील मुलीना जिल्हाधिकारी कार्यालयाची माहीती व्हावी म्हणून अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी रेणापूर, चाकूर, उदगीर तालुक्यातील किशोरी मुलींशी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी संवाद साधला.

या वेळी कलापंढरीचे अध्यक्ष बि. पी. सुर्यवंशी, सविता कुलकर्णी, मधुकर गालफाडे,प्रमोद कांबळे, फरजाणा शेख, शालू साके आदींची उपस्थिती होती.



पुढे बोलताना जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर घुगे म्हणाल्या की, मुलींना ज्या विषयात आवड आहे त्या विषयात कोणाचेही दडपण न घेता चांगले करीअर केले पाहीजे. अभ्यासात आवड निर्माण केली पाहीजे, तसेच मोबाईल मध्ये जास्त वेळ घालवण्याऐवजी अभ्यासाचे नियोजन करुन आपले ध्येय साध्य करण्यासाठी मुलींनी प्रयत्न करणे गरजेचे असा सल्ला जिल्हाधिकारी ठाकूर यांनी मुलींना दिला.

वेळेचे योग्य नियोजन करा. धाडसाने वेळ प्रसंगी आपल्यावर आलेल्या संकटाचा सामना करता आला पाहीजे, तसेच न आवडणाऱ्या काही गोष्टीला विरोध करता आला पाहीजे. आपल्या चेहऱ्यावरचे हावभाव बोलले पाहीजे, आपल्यातला संघर्ष बोलला पाहीजे. आपण सर्व प्रकारचे दागीने घालतो या पैकी आपणासाठी सर्वात मोठा दागिना आत्मविश्वास असला पाहीजे असेही यावेळी त्या म्हणाल्या. आज जिल्हाधिकारी कार्यालयात काय शिकायला मिळाले यावर एक निबंध लिहण्याच्या सुचनाही यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी किशोरी मुलीशी बोलताना केल्या.

## अल्पसंख्याक मुलांच्या वसतिगृहाचा प्रश्न दहा वर्षांपासून प्रलंबित

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० डिसेंबर-**
केंद्र शासनाच्या एमएसडीपी योजनेअंतर्गत अल्पसंख्याकबहुल शहर म्हणून लातूरला २०१३ मध्ये शंभर मुलांच्या वसतिगृहासाठी १२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. २०२० मध्ये मनपाच्या सर्वसाधारण सभेत खोरी गल्ली येथील शाळा क्रमांक ६ ची जागा वसतिगृहासाठी निश्चित करून तसा प्रस्ताव अल्पसंख्याक मंत्रालयाला दिला. मात्र, त्या प्रस्तावाला वेळेत मंजुरी न मिळाल्याने २०२३ मध्ये सदरील निधी गेला. परत वसतिगृहासाठी निश्चित केलेल्या जागेत इतर काम करू नका, यासाठी सोमवारी शिष्टमंडळाने आयुक्तांची भेट घेतली.

अल्पसंख्याकबहुल शहर म्हणून लातूरला केंद्र शासनाने निधी दिला; पण मनपाकडून जागा निश्चित करण्यासाठी बराच कालावधी लागला. मनपाच्या मालकीची असलेल्या खोरी गल्ली येथील शाळा क्रमांक ६ येथे जागा उपलब्ध करून देण्यात आली. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयातून ८ सप्टेंबर २०२० रोजी वसतिगृह बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता मिळावी म्हणून मुंबई मंत्रालयात अल्पसंख्याक विभागाकडे प्रस्ताव सादर केला. मात्र, स्थानिक काही रहिवाशांनी वसतिगृहास विरोध म्हणून उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. याचिकेत वास्तविकता नसल्याने त्यावर उच्च न्यायालयाने स्थगिती दिली नव्हती. शासनाने होत असलेल्या विकासकामात बाधा निर्माण होऊ नये, यासाठी एमपीजे व इतरांच्या वतीने उच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले.

**माजी मंत्री आ. अमित देशमुख यांचे शासनाला पत्र**

अल्पसंख्याक मुलांच्या वसतिगृहाची जागा खोरी गल्लीच निश्चित करावी, उपसचिवांचे पत्र रद्द करण्यासाठी माजी मंत्री आ. अमित देशमुख यांनी २१ सप्टेंबर २०२३ रोजी राज्य शासनाला पत्र दिले आहे.

त्यामुळे या जागेवर इतर कोणतेही काम करण्यात येऊ नये, अशी मागणी सोमवारी एका शिष्टमंडळाने मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांची भेट घेऊन केली. यावेळी ॲड. समद पटेल, रजाउल्लाह खान, अहेमदखाँ पठाण, युनूस मोमीन, आयुब मणियार, इम्रान सय्यद, डॉ. असद पठाण, डॉ. सय्यद खय्युमअली, तबरेज तांबोळी, फैसलखान कायमखानी, ॲड. अल्ताफ काजी यांची उपस्थिती होती.

## मित्राला शिव्या दिल्याने डोक्यात फरशीच घातली

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० डिसेंबर-**
मित्राला शिव्या का दिलास? या कारणावरून शिवीगाळ करून डोक्यात फरशी घालत जखमी केल्याची घटना लातुरातील जुना औसा रोड परिसरात घडली. याबाबत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी करण गोपाळ बेंबडे (रा. धनेगाव, ता. लातूर, ह.मु. सुशीलादेवीनगर, जुना औसा रोड, लातूर) यांना मित्राला शिव्या का दिलास? या कारणावरून तसेच जुन्या भांडणाची कुरापत काढून शिवीगाळ करून फरशीने डोक्यात मारून जखमी केले. तू आमच्या नादी लागल्यास तुला जिवंत सोडणार नाही, असे म्हणून जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत ज्ञानेश्वर नागरगोजे याच्याविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेची कार्यकारिणी जाहीर

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० डिसेंबर-**
सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी श्रीधर सांबय्या स्वामी यांची तर सचिवपदी संतोष करमले यांची निवड करण्यात आली आहे. सार्वजनिक ग्रंथालयात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या उद्देशाने सदाशिव बेडगे यांनी पुढाकार घेऊन राज्यव्यापी विकास परिषदेची स्थापना केली आहे.

लातूर येथे सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे मराठवाडा विभाग उपाध्यक्ष विद्यासागर हणमंते यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालय कर्मचाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीचे सार्वजनिक ग्रंथालयात काम करणाऱ्या ग्रंथपाल, ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या मागच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असणाऱ्या वेतनश्रेणी, सेवानियम , अनुदान वाढ आदी प्रश्नांवर विस्तृत चर्चा करण्यात आली. शासन सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रश्नांकडे फारसे गांभीर्याने पाहत नसल्याबद्दल या बैठकीत चर्चा करण्यात आली.

सोलापूर येथील ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे लढाऊ नेते सदाशिव बेडगे यांनी याकरिता पुढाकार घेऊन सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास कर्मचारी परिषदेची स्थापना केली आहे. या परिषदेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य असणार आहे.

या परिषदेच्या लातूर जिल्हा कार्यकारिणीची या बैठकीत सर्वानुमते निवड करण्यात आली. कार्यकारीणीतील अन्य पदाधिकारी पुढीलप्रमाणे आहेत. उपाध्यक्ष सूर्यकांत कमलाकर जाधव, वैशाली दुरुगकर , चंद्रशेखर हणमंतराव ढगे , सहसचिव नागेश्वरी ज्ञानोबा पांचाळ, गुप्तलिंग शिवमूर्ती स्वामी, खजिनदार विद्यासागर गुलाब गायकवाड, सदस्य : हणमंत गोपाळराव भवाळ, रेहान नबीसाब सय्यद, निवृत्ती विठ्ठलराव सूर्यवंशी, गजयसिंह माधवसिंह चौहान, गोविंद गुणवंतराव पाटील, विलास व्यंकटराव नागरगोजे, गिरीधर रंगनाथ जंगाले , सोपं तुळशीराम सूर्यवंशी, शिवहार गुंडेराव बिराजदार, मनिषा दत्तात्रय भिसे, नागनाथ सुग्रीव नागरगोजे, अमरसिंह गंगाधर चव्हाण, कृष्णा विश्वनाथ पिंजरे.

नूतन कार्यकारिणीचे परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे, कार्याध्यक्ष सुनीलदत्त पाटील, उपाध्यक्ष विजय पाटील, सचिव धोंडीराम जेऊरकर यांसह ग्रंथालय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

## कारला धडक देऊन धक्काबुक्की

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० डिसेंबर-**
शिवाजी चौक ते साईनाका जाणाऱ्या रोडवर रॉंग साईडने येऊन फिर्यादी दशरथ तात्यासाहेब सरवदे (रा. पोहरेगाव, ता. रेणापूर) यांच्या कारला धक्का देऊन समोर गाडी लावून गाडीतून खाली उतरून धक्काबुक्की केल्याची घटना घडली. तसेच शिविगाळ करून गाडीच्या डिक्कीतून काठी काढून थांब, आता तुला दाखवतो असे म्हणून मारण्यासाठी धावून आला.
मागे सरकल्यामुळे काठी लागून गाडीच्या काचाचे नुकसान झाले, असे सरवदे यांनी एमआयडीसी पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. त्यानुसार संबंधीत कार चालकाविरुद्ध एमआयडीसी पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोहेकॉ. गुजारे करीत आहे अशी माहिती पोलीसांनी दिली.